
सदाफुली
डॉ. वसुधा विनोद देव

# सदाफुली

ISBN - 32-978-93-84801-14-4

http//:www./chinmayasanskar.com
ह्या पुस्तकातील मुळ लेखांचा स्त्रोत
http//:www./facebook.com/sadaphuli/

(ISBN : 978-93-84801-14-4)

**सुनंदा प्रकाशन क्रं. ३२, ता. २१ मे २०१८**

# सदाफुली

**लेखक :**

डॉ. वसुधा विनोद देव, ०९४२२९५९७६४

३ चिन्मय, शंकर नगर,

घाटोळ लेआउट, जठारपेठ, अकोला. ४४४००५

श्री. विनोद दत्तात्रय देव ०९४२२९५९७६३

(सर्व हक्क सुरक्षित)

**प्रकाशक :**

श्री. मनीष शांताराम बुटे

सुनंदा प्रकाशन

राजेश्वर अपार्टमेंट, जलाराम शाळेजवळ,

तापडिया नगर, अकोला.

दूरध्वनी :- ०७२४-२४२१२९९

भ्रमनध्वनी :- ०९४२२९२०२२५

**आवृत्ती पहिली : दि. २१ मे २०१८**

**अक्षर रचना :**

संजय आर. अन्नदाते

चिराग ग्राफीक्स, जठारपेठ,अकोला.

९८५०६४७९९२

**मुद्रण :**

अश्विनी प्रिंटर्स, दत्त मंदिर समोर,

रामदासपेठ,अकोला. ९८२३१०९१९३

**मुल्य :**

रु. १५०/-

# समर्पित




सद्गुरु प.पू. श्रीकृष्ण दत्तात्रय देशमुख

।। जो शब्दज्ञाने पारंगतु ब्रह्मानंदे डुल्लतु
शिष्य प्रबोधनी समर्थु यथोचितु निजभावे ।।

मी अशी टवटवीत तुजसी पाहिली
तू हसत रहा सदाचि सदाफुली ।।
ही शिकवण देऊन जीवनाचा अर्थ शिकविणारे
प.पू. डॉक्टर काका ह्यांच्या चरणी समर्पित

तसेच माझे विद्यार्थी व फेसबुकवरील
माझ्या वाचक वर्गाला समर्पित



# चिन्मय सदाफुली
# (डॉ. वसुधा विनोद देव)


सहयोगी प्राध्यापक व

समन्वयक स्वामी चिन्मयनानंद अभ्यास केंद्र ,

शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला.


**अध्यापनाचा अनुभव –२८ वर्ष**

**शिक्षण:–** **M.COM,** M.A. (MARATHI,ECONOMICS,SUBJECT COMMUNICATION), M.ED. PhD.

**प्रकाशन;–**

१.एकूण ७ पुस्तके प्रकाशित

२.एका पुस्तकाला उत्कृष्ट पुस्तक पुरस्कार

३.दोन पुस्तके शासनमान्य

४.एका पुस्तकाचा अमरावती विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश

५.एकूण २०० लेख प्रकाशित

६.जागतिक आंतरराष्ट्रीय राज्यस्तरीय चर्चा सत्रात सक्रिय सहभाग

७.२०१४ मध्ये अथेन्स ग्रीस येथे जागतिक तत्वज्ञान परिषदेत "SWAMI CHINMAYANAND ON RELIGION" ह्या विषयावर व्याख्यानाला आमंत्रित

८. हा जागतिक स्तरावरील पहिला प्रबंध मानव संसाधन विकास मंत्रालयाकडून

९.विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत शासकीय अध्यापक महाविद्यालयात स्वामी चिन्मयनानंद अभ्यास केंद्राची स्थापना

१०.स्वत: ची वेबसाईट **www.chinmaysanskar.com**

११.चिन्मय मिशन ची सक्रिय कायकर्ती

१२.संतगाडगेबाबाअमरावती विद्यापीठ अमरावती येथे Ph.D ची मार्गदर्शक एकूण ५ विद्यार्थ्यांना Ph.D प्राप्त

# मनोगत

हरिओम,,सदाफुली हा लेखसंग्रह वाचकांच्या सेवेत सादर करताना मला अतिशय आनंद होतो आहे,,ह्या लेख संग्रहातील लेख म्हणजे प्रत्यक्ष लेखिकेचे अनुभव आहे,,अध्यापक महाविद्यालयात कार्य करताना आणि विद्यार्थ्यांशी सुसंवाद करताना अनेक अनुभव आलेत,,,त्यांच्याशी सुसंवाद म्हणजे एक पर्वणीच असते,,,आणि माझ्या विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधणे ही माझ्यासाठी आनंदाची पर्वणी असते,,

बऱ्याचदा काही मुद्द्यावर मनात खूप काही विचार असतात,,आणि हे विचार खरंच सार्वभौम असतात,,,आणि हे सार्वभौम असतात असे मी ह्यासाठी म्हणते कारण त्यात सर्व समावेशक दृष्टिकोन असतो,,आणि ह्यादृष्टीकोण माझ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधून विकसित व्हायला मदत झाली हे मी येथे प्रामाणिक पणे नमूद करते,,

ह्या पुस्तकाचे नाव सदाफुली आहे,,ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे त्यामागे एक सकारात्मक विचारधारा आहे,,ती अशी की आपण अनेक झाड फुलझाडे पाहतो,,त्या सर्वांना मशागती ची गरज असते पण एक सदाफुली हे झाड व त्याचे फुल हे मात्र कायम फुललेले असते,,त्याला कोणत्याही निगरणीची गरज नाही,,त्याला सुगंध नाही त्याला सौन्दर्य नाही,,पण त्याची त्या सदाफुलीला काहीही पर्वा नाही,,तिचे जीवनध्येय एकच आहे ते म्हणजे केवळ आणि केवळ फुलणे,,,किती छान,,आणि ह्याच अशयावर आधारित एक गीत जे प पू सद्गुरू डॉ श्रीकृष्ण देशमुख ह्यांनी लिहिले आहे,,ह्या गीताचा प्रभाव माझ्या मनावर खूप झाला,,,आणि मग उरले फक्त आणि फक्त फुलणे,,,माझ्या कार्यासाठी,माझ्या ध्येयासाठी,,जीवनात प्रत्येक दिवस समान राहणार नाही कारण ते माझ्या हाती नाही,,पण प्रत्येक परिस्थितीत जीवनातील वसंत कायम ठेवणे हे मात्र माझ्याच हाती आहे न,,,खूप छान भावना आहे ही,,

हे लेख मी फेसबुक वर टाकत असे आणि ह्या लेखांच्या माध्यमातून मला वाचक वर्ग जोडला गेला,,आणि त्यांनी सदाफुलीला स्वीकारले,,मी त्या सर्वांच्या प्रति ऋण व्यक्त करते,,ही सदाफुली मी माझ्या विद्यार्थ्यांना व माझ्या वाचकांना अर्पण करते.......


*चिन्मय सदाफुली*

(डॉ. वसुधा विनोद देव,)

सहयोगी प्राध्यापक ,

शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | मुखपृष्ठ | १ |
| | समर्पित | ४ |
| | परिचय | ५ |
| | मनोगत | ६ |
| | अनुक्रमणिका | ७ |
| १ | नकारात्मकतेकडून सकारात्मकतेकडे | ९ |
| २ | व्यक्तिमत्व | १२ |
| ३ | माझा चिन्मय | १५ |
| ४ | व्यक्तिमत्व–भारतीयविचारधारा | १९ |
| ५ | कार्य प्रेरणा | २२ |
| ६ | सुखाचे रहस्य | २५ |
| ७ | आदर्श कोण ?? | २८ |
| ८ | वेदना:तरुण मुलींची | ३२ |
| ९ | वर्गातील सर्वधर्म परिषद | ३६ |
| १० | तिरस्कार | ३९ |
| ११ | वृद्धाश्रमातील एकभेट | ४३ |
| १२ | Be bold for change | ४६ |
| १३ | आधुनिक भारताचे निर्माता,,डॉ हेडगेवार | ४९ |
| १४ | शिक्षण म्हणजे काय | ५३ |
| १५ | spread the wings and fly | ५६ |
| १६ | संकल्प गुडीपाडव्याचा | ५९ |
| १७ | धागे,सुख दुःखाचे | ६१ |
| १८ | Goal of life<br>The Game of Life | ६३ |
| १९ | **यु टर्न च्या निमित्ताने** | ६६ |
| २० | स्वामी चिन्मयनानंद ,, | ६९ |
| २१ | आधुनिक युगातील द्रष्टे,,, | ७१ |
| २२ | नि:स्वार्थ जीवन | ७३ |
| २३ | स्वामी चिन्मयानंद......एक द्रष्टे | ७५ |
| २४ | मा डॉ बाबासाहेब आंबेडकर चळवळीतील अनभिज्ञ पृष्ठ | ७७ |
| २५ | कोष?? नको | ७९ |
| २६ | माणसे ओळखा | ८० |

| | | |
|---|---|---|
| २७ | माझा फळा | ८१ |
| २८ | कच्चा लिंबू<br>(उत्तर एका मानसिक गुंतागुंतिचे) | ८३ |
| २९ | ब्रह्मसूत्र | ८६ |
| ३० | ब्रह्मसूत्र प्रवचन | ८८ |
| ३१ | ब्रह्मसूत्र | ९१ |
| ३२ | मैत्री?? राहूनच गेली | ९४ |
| ३३ | आम्हाला स्पेस द्या | ९६ |
| ३४ | मन्मथ ,एकदा तरी ये,,!! | ९९ |
| ३५ | प,पू,गुरुजी–एक ज्ञान तपस्वी,,(१) | १०२ |
| ३६ | प पू गोळवलकर गुरुजी<br>एक ज्ञान तपस्वी (२) | १०५ |
| ३७ | निकष विवाहाचे | १०८ |
| ३८ | आपण हे कराल ??? | ११० |
| ३९ | विशेष चिऊ | ११२ |
| ४० | जागतिक महिला दिन २०१८ | ११५ |
| ४१ | खरच मराठी भाषा उपेक्षित आहे का?? | ११७ |
| ४२ | उपक्रमशील शिक्षकानो शिक्षण शास्त्रज्ञ बना | ११९ |
| ४३ | हम करे राष्ट्र आराधन | १२१ |
| ४४ | Valentine Week | १२४ |
| ४५ | Valentines day and Human<br>Resource Development | १२६ |
| ४६ | मा. प्रधानमंत्री महोदयांना<br>एका सामान्य नागरिकांचे पत्र | १२८ |
| ४७ | संन्यस्त वृक्ष | १३१ |
| ४८ | साथ ! स्वत: ची स्वत: ला!! भाग १ | १३३ |
| ४९ | साथ स्वत: ची स्वत:ला –भाग २ | १३५ |
| ५० | साथ स्वत: ची स्वत: ला–भाग ३ | १३६ |
| ५१ | साथ स्वत: ची स्वत: ला –भाग ४ | १३८ |
| ५२ | साथ स्वत: ची स्वत: ला –भाग ५ | १४० |
| ५३ | साथ स्वत: ची स्वत:ला –भाग –६ | १४२ |
| ५४ | गा कोकिळा गा,,,, | १४४ |
| ५५ | सदाफुली | १४५ |

# १ नकारात्मकतेकडून सकारात्मकतेकडे

एक काही विद्यार्थ्यांचा एक ग्रुप माझ्याकडे आला,,,त्यांनी मला प्रश्न विचारला ,‘‘‘मॅडमजीवनात दृष्टिकोन असावा,आणि तो सकारात्मक असावा,तुझा दृष्टिकोन चांगला आहे,तुझा दृष्टिकोन बदलावं,असे विधाने आपण व्यवहारात नेहमी ऐकतो,,पण नेमके दृष्टिकोन म्हणजे काय ? आणि तो कशावर अवलंबून असतो ?सकारात्मक दृष्टिकोन म्हणजे काय ? आणि नकारात्मक दृष्टिकोनाला सकारात्मकतेकडे कसे न्यायचे ?‘‘‘त्याचा हा प्रश्नांचा पाऊस ,,,,त्यांना मी शांततेने बसायला सांगितले आणि त्यांना सांगितले की,,‘‘‘आपल्याला दैनंदिन जीवनात अनेक घटना प्रसंग ह्यांना तोंड द्यावे लागते,त्यावेळी आपला दृष्टिकोन पणाला लागतो,,ह्या सगळ्या घटनांना आपण ज्या पद्धतीने सामोरे जातो किंवा त्या घटनांना आपण ज्या पद्धतीने तोंड देतो त्या सर्व आपल्या दृष्टिकोनावर अवलंबून असतात,,,आपला दृष्टिकोन कसा आहे हे आपल्या प्रतिसादावरून कळते,,आणि हा प्रतिसाद आपण भावनेच्या स्तरावर देतो कि बुद्धीच्या स्तरावर देतो त्यावर आपला दृष्टिकोन ठरतो,,,भावनेच्या स्तरावरची प्रतिक्रिया बरेचदा अपरिपक्व असू शकते पण जसजसा मनाचा विकास होतो आणि मन हे बुद्धीच्या अधिपत्याखाली येते तसतसा हा दृष्टिकोन अघिक परिपक्व होत जातो,,, पण त्यासाठी मनही बुद्धी च्या अधिपत्याखाली यायला तयार हवे,,,बरेचदा बुद्धीच मनाच्या अधिपत्याखाली येते मग आपल्या प्रतिक्रिया अतिशय भावनिक होतात,,,कधी कधी त्या नकारात्मक होतात,,अशावेळी मग माझा दृष्टिकोन नकारात्मक आहे असे म्हटले जाते कारण मनाला निर्णय घेता येत नाही,,,मनाला विवेक माहित नाही,,अशावेळी केवळ भावनांचा उद्रेक करून मन प्रतिसाद देते,,,हा अपरिपक्व दृष्टिकोन झाला,,अशा लोकांचे जीवन हे दुःखदायक ठरते,,,बऱ्याचदा असेही

घडते कि आपण खूप चांगले वागतो पण तरीही जीवनात दुःख येतात,,पण बुद्धियुक्त अंत:क्करणाने जो त्या दुःख कडे बघतो तो अधिकच सकारात्मक बनतो,,,बऱ्याचदा आपण चालताना पडतो ,,,आणि एक सहज कृती घडते कि कुणी मला बघत तर नाही,आणि आपण उठतो आणि पुन्हाचालायलालागतो,,, पडल्यानंतरचा हा सकारात्मक दृष्टिकोन,,,पडलो म्हणून आपण चालणे सोडत नाही,,,पण पुन्हा पडू नाही ही काळजी घेतोच,,,ह्यात तीन दृष्टिकोन दडले आहेत ,,पहिला म्हणजे जेव्हा आपण अनोळखी रस्त्यावरून जातो तेव्हा काळजी घ्यायला हवी कारण त्या रस्त्याचे ज्ञान मला नाही,,,दुसरी गोष्ट माझ्या आयुष्यात नेहमीच राजमार्ग असेल असे नाही ,कारण मला कधी पायवाट पण मिळेल,त्यात काटे असतील पण ती पायवाट मला जपून चालावी लागेल,,पण बुद्धीचा वापर करून आपण ती पायवाट चाललो तर आपला महामार्ग आपल्यालाच सापडेल,,तिसरे म्हणजे नंतर जेव्हा जेव्हा आपण नवीन रस्त्यावर चालत राहू तेव्हा तेव्हा आपल्याला संभाव्य अडचणीची कल्पना येईल,,,हे उदाहरण विद्यार्थ्यांना खूप पटले होते,,,आता त्यांच्या समोर प्रश्न होता की सकारात्मक दृष्टिकोन आणि नकारात्मक दृष्टिकोन म्हणजे काय ?मला वाटत कि प्रत्येक व्यक्तीच्या दृष्टिकोन हा त्याचा वृत्तीवर अवलंबून असतो. ,,म्हणजे काय ? मानवाच्या तीन वृत्ती असतात,,,,सात्विक,,राजसिक,,,आणि तामसी,,,,आता मात्र विषयाला वेगळेच वळण लागले होते,,,,आजपर्यंत फक्त सकारात्मक व नकारात्मक दृष्टिकोन एवढेच माहित असणारे विद्यार्थी गोंधळात पडले,,,,पुन्हा प्रश्न‘‘‘म्हणजे काय‘‘‘‘बघा पुष्कळदाआपण एक संपूर्ण घटक पाहतो पण त्यातील फक्त आपल्या उपयोगाचे काय ह्याचाच विचार करून फक्त त्यावरच लक्ष केंद्रित करतो,,,आपण त्यावेळी स्वार्थी असतो ,,,स्वार्थापोटी आपण मग काहीही करायला तयार होतो,,हा तामसी दृष्टिकोन,,,,बऱ्याचदा आपण बाह्य जगात

विविधातच पाहतो,,विविधते मागे काही ऐक्य असेल हे आपल्याला माहीतही नसते आणि कुणी सांगितले तर आपण त्यावर विश्वासही ठेवत नाही,,,आपण जातीभेद करतो धर्म भेद करतो,,विषमता मानतो,,तेव्हा आपला राजसिक दृष्टिकोन असतो,,,,,आणि जेव्हा सर्व सृष्टी मध्ये आपण ऐक्य मानतो,,,एक तत्व मानतो,ह्या परिवर्तनशील जगाचे अधिष्ठान अपरिवर्तनीय आहे,,अचल तत्व आहे असा आपला दृढ विश्वास असतो तेव्हा आपला सात्विक दृष्टिकोन असतो,,,तामसी दृष्टिकोनाचा परिणाम असा होतो की व्यक्ती आयुष्यात छोट्या छोट्या गोष्टींना महत्व देऊन चुकीच्या कल्पनांना कावटाळतो गैरसमज करून घेतो,,,स्वयंकेंद्रित होतो,राजसिक दृष्टिकोनाची व्यक्ती मुळातच भेद करीत असल्याने तिची दृष्टी भेदाचीच होते अशी व्यक्ती कुटुंबात समाजात ताणतणाव निर्माण करते,,,देशाचे समाजाचे कुटुंबाचे विघटन करायला सुद्धा हि व्यक्ती मागेपुढे पाहत नाही,,,सात्विक दृष्टिकोनात आपण अखंडत्व बघत असतो,,अर्थात आपण छोट्या छोट्या वस्तूवर वेगवेगळे प्रेम न करता सर्वांच्या प्रति आपण सारखा प्रेमभाव ठेवतो,,,त्यामुळे आपण वस्तू परिस्थिती,व्यक्ती आहे तशी अखंड स्वीकारतो,,अनेकत्वात एकत्व पाहतो पुन्हा प्रश्न कि ह्याचा अर्थ आपण सगळे नकारात्मक विचारांचे आहोत का ?कारण आपण फक्त स्वतः पुरता विचार करतो,,,मग मीच विद्यार्थ्यांना प्रश्न विचारला कि नकारात्मक विचारांचे सकारात्मक विचारात रूपांतर करायचे म्हणजे काय ?विद्यार्थ्यांचे उत्तर ऐकून मला खूप समाधान झाले,,,उत्तर होते,‘‘‘देहबुद्धी पासून स्वतः ला वेगळे करणे,,,द्वंद्वातून स्वतः ची सुटका करून घेणे,,आणि स्वतःची दृष्टी व्यापक वैश्विक बनविणे म्हणजे नाकारात्मकतेकडून सकारात्मकतेकडे जाणे,,,,कितीतरी वेळ आम्ही सर्व शांत आणि स्तब्ध बसलो होतो.

२

# व्यक्तिमत्व

बी एड च्या अभ्यासक्रमात Understanding the self नावाचा विषय समाविष्ट झाला आहे,,होणाऱ्या शिक्षकाकरिता अत्यंत उपयुक्त असलेला हा अभ्यासक्रमाचा भाग आहे,,ह्या विषयावरची १५ दिवसाचे workshop मी घेतले,,,विविध विषयांनी असलेली ही कार्य शाळा,,,ह्यात एक मुद्दा होता तो म्हणजे स्वतः च्या व्यक्तिमत्वाचे विश्लेषण,,व्यक्तिमत्व हि संकल्पना समजावून झाली होती,,विद्यार्थ्यांना ती समजली होती,,पण आता स्वतः च्या व्यक्तिमत्वाचे विश्लेषण करायचे हे अत्यंत किचकट काम हे काम पूर्ण करण्यासाठी सिलॅबस मध्ये JOHARI WINDOW दिलेले आहे, हि johari window म्हणजे,स्वतः च्या व्यक्तित्वाबाबत स्वतः किंवा इतरांनी म्हणजेच आपल्या निकट असणाऱ्या व्यक्तीने विश्लेषण करायचे,,,हि बाब कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटी च्या मानसशास्त्रज्ञांनी शोधून काढली,,,त्याचे म्हणणे असे कि आपल्या व्यक्तिमत्वाचे चार घटक असतात,,,पहिला घटक जो मला आणि इतरांनाही माहित असतो त्याला Open Self असे म्हणतात,,,व्यक्तिमत्वाचा दुसरा घटक जो इतरांना माहित असतो पण मला त्याची जाणीव नसते त्याला Blind Self असे म्हणतात,,,,व्यक्तिमत्वाचा तिसरा घटक जो मला माहित असतो पण तो इतरांपासून लपून असतो त्याला Hidden Self असे म्हणतात,,आणि व्यक्तिमत्वाचा चौथा घटक जो मलाही आणि इतरांनाही Unknown असतो ह्याला Unknown सेल्फ असे म्हणतात,,,आपल्या व्यक्तिमत्त्वातील open self ची परिसीमा परीघ वाढायला हवा,,त्यासाठी जे blind सेल्फ आहे त्याबाबत फीडबॅक घेणे व जो hiden सेल्फ आहे त्याबाबत discloser करणे आवश्यक आहे,,,,आपल्या व्यक्तिमत्त्वातील जेवढा open self स्ट्रॉंग असेल तेवढे आपले व्यक्तिमत्व strong राहील,,मग ही माझी johari window एकतर

मी johari window वापरणं किंवा माझ्या सहकाऱ्यांनी माझे अनालिसिस करायचे,,,खूप छान संकल्पना आहे,,,मी माझ्या प्रत्येक विद्यार्थ्याला त्याची स्वत:ची दिली आणि गटकार्य घेतले,,,खूप इंटरेस्टिंग झाले,,,व्यक्तिमत्वाचे विश्लेषण करण्यासाठी त्यात ५६ adjectives पण दिले होते गटकार्य झाले presentation झाले,,,मतभेद झालेत,,,पण discover the self वर येऊन सर्वांची गाडी थांबली,,,आता काय करायचे? सर्वांच्या मनात प्रश्न उपस्थित झाला,,,कारण ही self actualisation ची स्टेप होती,,,कितीही पाश्चात्त्य तत्वज्ञान अभ्यासा मानसशास्त्र अभ्यासा पण कुठेतरी भारतीय विचारधारेचा अभ्यास करावाच लागतो त्याशिवाय विचारांना पूर्णत्व येत नाही हा माझा अनेक वर्षांचा अनुभव आहे,,

मला आठवली ती chinmay window अर्थात स्वामी चिन्मयनंदानी स्वत: कडे अंतर्मुख होऊन स्वत:चे विश्लेषण कसे करायचे हि ती विंडो,,,अजून हि विंडो शिक्षण शास्त्राला माहित नाही,,

पण स्वत: चा शोध घेण्याकरिता खूप उपयुक्त,,,ह्यातील पहिला टप्पा म्हणजे Introspect yourself अर्थात स्वत: कडे वस्तुनिष्ठ पद्धतीने स्वत: चे केलेले आत्मनिरीक्षण,, कारण मी स्वत: ला जेवढे ओळखतो तेवढं मला कुणीच ओळखू शकत नाही,,,,दुसरा भाग म्हणजे, Detect yourself आपल्या

व्यक्तिमत्त्वातील असे भाग शोधायचे जे माझ्या जीवनाला हानिकारक ठरतील,,,अगदी आपण आपल्या शरीरातील रोगाचे निदान करतो तसेच,,,एकदा निदान झाले की आपण तो रोग आपल्यातून कसा निघेल हा विचार करतो ,,,अगदी तसेच तिसरी पायरी येते ती Negate false values व्यक्तिमत्त्वातील चुकीचा भाग अनावश्यक भाग आपण काढून टाकायला हवा,,,पण हा भाग काढून टाकल्यावर त्याठिकाणी ताबडतोब चांगल्या गुणांची मूल्यांची स्थापना करावी लागते अन्यथा व्यक्तिमत्व अधांतरी होत,म्हणून चौथा

भाग येतो तो Substitution चा,,,आणि अशा चार टप्प्यामधून स्वतः चे केलेले analysis आणि त्यानुरूप केलेली उपाय योजना हि व्यक्तिमत्वाला वेगळीच झळाळी आणते,,,स्वामी चिन्मयनानंद म्हणतात,,,‘‘Introspect ,,,,,detect,Negate,,Substitute and grow’हि सगळी प्रक्रिया मी विद्यार्थ्यांकडून करून घेतली,,,‘‘पण आमच्या ह्या व्यस्ततेच्या परिस्थितीत आम्ही हे सर्व केव्हा करायचे ?आम्हाला दिवसभर वेळ नसतो,,,‘‘‘‘विद्यार्थ्यांचा प्रश्न,,,,पण हे सर्व करण्यासाठी सर्वात चांगली वेळ आहे जेव्हा आपण सर्व कामे आटोपून छान झोपण्यापूर्वी आपण दिवसभरातील सगळ्या घटनांचे टेन्शन घेऊन झोपण्या पेक्षा ह्या चार कृतींचा विचार करीत अगदी Introspection,Detection,, Negation,, Sabstitution ह्याचा रोजचा हिशेब केला तर येणारी दुसऱ्या दिवशीही पहाट आपल्यासाठी काहीतरी नवीन प्रेरणा देणारी असेल आणि आपण रोज स्वतःचे व्यक्तिमत्व खुलावू शकू,,,मुलांनो जमेल तुम्हाला ?द्याल स्वतः साठी एवढा वेळ ?विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर खूप समाधान होते,,,कारणसगळे विद्यार्थी Open Self ह्यात आले होते,,,सर्वांच्या मनाचे आभाळ मोकळे झाले होते,,सगळे व्यक्त झाले,,,आजपर्यंत साठवून ठेवलेल्या भावनांना वाट मिळाली होती,,,हि CHINMAYA WINDOW त्यांचा हाती देताना अक्षरशः गुरुदेवांनी जे दान मला दिले ते माझा हात धरून माझ्या विद्यार्थ्यांना दिले होते,,,,आता त्यांचे व्यक्तिमत्व समाजात एक वेगळी छाप पडणार ह्याबद्दल माझ्या मनात आत्मविश्वास निर्माण झाला

३

# माझा चिन्मय

आज मी आपल्याशी एका दिव्यांग मुलाची आई म्हणून व्यक्त होणार आहे,,मी काही विशेष केले आहे असे नाही पण आज समाजात अशी विशेष आणि दिव्यांग बालके जन्माला येतात,,त्यांच्या आईवडिलांची दुःख ,त्यांना होणार त्रास,संपूर्ण जीवनात आता काहीच स्वारस्य नाही,,,आमच्याच पोटी हे मूल का ?हा त्यांना सातत्याने पडणारा प्रश्न,,आपले मुल कायम अपंग आहे हे मान्य करताना त्यांची होणारी घुसमट,,जीवनात येणारे नैराश्य,,आमच्या माघारी ह्याचे किंवा हिचे कसे होणार ह्या काळजीत व्यतीत होणारे त्यांचे उमेदीचे दिवस नव्हे संपूर्ण आयुष्य,,,स्वतः ला अपत्य असल्याचा आनंद पण त्याचसोबत त्याला कायम अपंग म्हणून सतत न दिसणारी पण भाळभळात वाहणारी जखम,,,हे सगळं जेव्हा मी खूप जवळून बघते तेव्हा एका दिव्यांग बालकाची आई जो बहू विकलांग आहे,मला माहित आहे तो कधीही चालू शकणार नाही,,,पण त्याचा होणार प्रत्येक छोटेछोटे milestone बघताना होणारा आनंद,,,आता हा व्यक्तिगत समस्या नाही ही सामाजिक समस्या आहे,,आणि म्हणूनच माझ्या सारख्या दिव्यांग बालकांच्या आईवडिलांचा दृष्टिकोन सकारात्मक बनविण्याचा माझा नेहमी प्रयत्न असतो तोच प्रयत्न आजही आहे होय चिन्मय,,माझा २४ वर्षाचा छकुला,,, मनाने अजूनही ५ वर्षाचा,,अतिशय आनंदी,, माझ्या प्रेरणेचा स्रोत१९९४ साली जन्म झाला,,घरात मुलगा झाला म्हणून किती आनंद,,चिन्मय अतिशय सुंदर गोरा ,,,संपूर्ण कुटुंब आनंदात असतानाच त्याच्याबद्दल ते भयानक सत्य समोर आले,,त्याचे ब्रेन डॅमेज झालेले आहे,,,सर्व कुटुंबाला हा धक्का होता,,आई म्हणून ही घटना स्वीकारायला जड होती,,पण फक्त ५ मिनिटे,,,त्यानंतर मात्र एकदम सावध झाले,माझं मूल हि माझे आहे ते अपंग मतिमंद राहू शकत नाही,,,आज जरी डॉ नि त्याला अपंग मतिमंद घोषित केले

असले तरी मी त्याला तसे राहू देणार नाही,,,मनात विचार आला की आज जर मी हे सत्य स्वीकारले नाही तर मी त्याच्यासाठी कधीही काही करू शकणार नाही,,मग मी खरंच अंतर्मुख झाले,,,आणि विचार केला की माझ्याच पोटी असे मूल जन्माला का यावे ? उत्तर मिळाले भगवंताने दिलेली सेवेची संधी आहे,,,प्रत्येकाचे जीवनात प्रयोजन असतेच,,आणि हे प्रयोजन ईश्वराने ठरविले असते,,,मग माझ्याही जीवनाचे प्रयोजन आहे,,,आणि तेच प्रथम आपण शोधायला हवे पण ते करण्यापूर्वी सर्वप्रथम चिन्मय ला आहे तसे स्वीकारले व त्याला त्याच्या जीवनात उभे करिन हा ठाम निर्णय घेतला,,त्याच्यात बहुविकालांगता आहे,,हे डॉ नि स्पष्ट सांगितले होते,,,असे मूल फक्त आईचे असते असे म्हणतात पण हे मूल पूर्ण कुटुंबांनी आपलेसे केले,,,पण त्याच्या विकासाचा प्रवास मात्र त्याचा आणि माझाच,,,ह्याप्रवासात काही दिवसांनी आपल्या चांगल्या नोकरीचा त्याग करून त्याचे बाबाही सामील झाले,,,आमच्या तिघांच्या संघर्षात आमच्यात ईश्वराने अजून एक व्यक्ती पाठविली,,,भीमा त्याचे नाव,,,त्याला घर नव्हते आई मोलकरीण पण भयंकर दारिद्र्य,,,ह्या मुलाचा आमच्या कुटुंबात झालेला प्रवेश चिन्मयचा विकासाच्या दृष्टिकोनातून खूप सकारात्मक ठरला,,,आमच्या बरोबरीने त्याने चिन्मयचा संगोपन केले,,,नोकरी, नोकरिमधील समस्या,चिन्मयचा विकास ह्यात खरंच खूप रमली मी,,,माझ्या विद्यार्थ्यांमध्ये मला माझा हरवलेला चिन्मय दिसतो,,,अशा मुलाचे समाज दैविकरन करतो,,पण त्यात समाजाला दोष देऊन नाही चालत,,,वर्षानुवर्षाचे संस्कार एवढ्या लवकर जात नाहीत,,,किती लोकांचे किती सल्ले,,, अगदी चमत्कारापर्यंत सुद्धा,,,पण मी वेदांताची अभ्यासक,,,चमत्कार मला नाही आवडत,,आपल्या प्रयत्नांना येणारे यश हा हि चमत्कारच असतो असा माझा प्रयत्न वादावर विश्वास आहेच पण त्याच सोबत माझे प्रारब्ध मी स्वीकारले पाहिजे, त्याला हसत सामोरे गेले पाहिजे,,हे

प्रारब्ध मला भोगूनच पूर्ण करायचे आहे,,हा माझ्या गुरूने दिलेला संदेश माझ्या मनात रुजला होता,,आहे ते प्रारब्ध स्वीकारायचे,आजचे कर्म छान करायचे आणि उद्याचा दिवसासाठी निश्चिन्त राहायचे,,,माझे गुरु स्वामी पुरुषोत्तमानंद ह्यांनी मला काही वाक्य सांगितले ते माझ्यासाठी महावाक्य ठरले,,,त्यांनी मला सांगितले की चिन्मय हा दुःखाचा विषय ठरू शकत नाही,,ईश्वराने तुला तुझे जीवन ध्येय दिले आहे,,चिन्मय म्हणजे सत चित आनंद,,,,त्याची प्राप्ती करून घे,,,त्याचा प्रसादबुद्धी ने स्वीकार कर do the best and leave the rest to the GOD हे शब्द आजही मनावर कोरले आहे,,आणि मग अतिशय क्षमतेने माझा कौटुंबिक व्यावसायिक प्रवास सुरु झाला,,,अनेक समस्या आल्यात पण त्या सोसण्याची ताकदही त्याने दिली,,,अनेक कठीण समस्येतून चिन्मय गेला,,पण त्याच्या आनंदी स्वभावानेच त्याला आणि आम्हालाही कार्य करण्याची प्रेरणा दिली,,,तो संगीताचा खूप चांगला उपासक आहे,,,सुधीर फडके श्रीधर फडके हे त्याचे दैवत आहे,,,आमच्या घरात अखंड नादब्रह्माचीही उपासना सुरु असते,,,श्रीधर फडके ह्यांनी खास चिन्मय साठी त्याच्या खोलीत गीत रामायणाचे पद गायले आहे आणि तेव्हापासून ती रूम म्हणजे बाबूजी व श्रीधरजी ह्यांचे मंदिरच झाले आहे,,,मनाची प्रसन्नता आनंद हा त्याचा स्थायीभाव Unconditional love हि त्याची वृत्ती,,,आई ये न अभ्यास कर असे सतत मला माझ्या कामाची जाणीव करून देणारा माझा चिन्मय,,,कुणीही त्याच्या संपर्कात या आणि आनंद घेऊन जा,,,निरपेक्ष आनंदाची अखंड वर्षा करतो,,,,स्वामी चिन्मयनानंद स्वामी पुषोत्तमानंद,स्वामी तेजोमायानंद,,श्रीराम,हनुमान,श्रीधर फडके,सुधीर फडके हे त्याचे आराध्य,,,आणि हो अमिताभ बच्चन सुद्धा,,,,आज तो २४ वर्षाचा आहे,,स्वतः चालत नाही,,तो निरक्षर नाही राहिला,,ह्याचे समाधान आहे,,रामरक्षा,गणपती स्तोत्र,गीतेचे अध्याय हे तो सहज मुखोद्गत करतो,,,,चिन्मय सारखे मूल मला आहे

ह्याचा मला खरंच अभिमान आहे,,त्यामुळे इतरांचे दुःख समस्या जाणण्याची कुवत माझ्यात निर्माण झाली,,,चिन्मय मिशन कार्याची प्रेरणा मिळाली,,आणि सर्वात महत्वाचे कि मला माझ्या जीवनाचे प्रयोजन मिळाले,,,मनात कोणतेही दुःख नाही खंत नाही,,आम्ही उभयता चिन्मय व चिन्मय मिशनच्या सेवेत स्वतःला धन्य मानतो,,,कारण आता आमचे जे हि भोग आहेत ते आम्ही अतिशय आनंदाने स्वीकारले व हे आपल्याला आनंदाने भोगून संपवायचे आहे हा हि निर्णय आहे,,,,परमेश्वर किती कृपाळू आहे त्याने आमच्यावर चिन्मयचा रूपात जो विश्वास दाखविला तो सार्थ ठरवायचा आहे,,,आयुष्यात आपण खूप डिग्र्या मिळवतो पण परमेश्वराच्या ह्या परीक्षेत नक्कीच पास होणार हा आत्मविश्वास पण आहे,,हा आत्मविश्वास चिन्मय ने दिला हे विशेष,,आज मनाला खूप समाधान आहे ,,,,कोणत्याही संकटाशी सामना करण्याची तयारी आहे,,,जीवन अतिशय आनंदाने जगतो आहोत आम्ही,,,,चिन्मय च्या रूपात एक अखंड आनंदाचा स्रोत ठेवा आमच्या जवळ आहे,,त्याने सर्वांवर सारखे प्रेम करायला शिकविले,,त्याने आनंद शिकविले,,,निस्पृह वृत्तीने कसे राहायचे हे शिकविले,,,अलिप्ततात शिकविली,,,दयाभावं, निर्लेप वृत्ती,,इतरांनाही दुःख असू शकते ते पाहण्याची वृत्ती,,संगीतप्रेमी,,,ईश्वर प्रेम। ,,,किती किती त्याच्यापासून शिकायला मिळतंय ,,,,,खरंच जीवन समृद्ध होतंय,,,,सार्थकी लागतंय,,,ह्या समधनापेक्षा आयुष्यात आणखी काय हवं असत,,,,,,माझ्यासारख्या दिव्यांग मुलांच्या आईबाबांना माझी ही विनंती आहे आपले मूल हे सर्वप्रथम स्वीकारायला हवे,,,आणि आत्मविश्वास ठेवा GOD HAS BETTER PLAN FOR ME हा विश्वास ठाम राहू द्या,,,आपल्या जीवनाचे काही प्रयोजन नक्कीच आहे ते प्रयोजन शोधून जीवन जगणे महत्वाचे आहे,,,जीवन सार्थकी लावणे आनंदाने जगणे आणि आपल्याही मुलाला मुलीला आनंदी जीवन देणे गरजेचे आहे.

# ४ व्यक्तिमत्व–भारतीयविचारधारा

व्यक्तिमत्व विकास हि कार्यशाळा सुरु होती,,दोन दिवसांची हि कार्य शाळा,,विविध विषयांचा त्यात अंतर्भाव होता,,संवाद कौशल्य,योग, वक्तृत्व कला,मुलाखत तंत्र,संचलन तंत्र,देहबोली,अशा कितीतरी विषयावर हि कार्यशाळा संपन्न झाली,,विद्यार्थ्यांना ह्या कार्य शाळेतून खूप काही मिळलेहोते,त्यात प्रामुख्याने समाजात नोकरीच्या ठिकाणी कसे वागायचे,,संवाद कसा करायचा,एखाद्या कार्यक्रमाचे संचालन कसे करायचे,प्राणायाम,योग,इत्यादी गोष्टी त्यांना मिळाल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर झळकत होत्या ,पण हे सर्व झाल्यावरही काही विद्यार्थी खूप अस्वस्थ वाटत होते,,,दुसऱ्या दिवशी माझा शैक्षणिक मानसशास्त्राची तासिका होती,,,आणि मला व्यक्तिमत्वाच्या विविध उपपत्ती शिकवायच्या होत्या,,,मला एक नेहमी आश्चर्य वाटत आलेलं आहे शिक्षण शास्त्रत मानसशास्त्रात व्यक्तिमत्व विकासाची भारतीय उपपत्ती नाहीये,,वास्तविक पाहता भारतीय मानसशास्त्राने मानवी व्यक्तिमत्वाची जी उपपत्ती मांडली आहे ती कोणत्याच मानसशास्त्रात नाही,,मानवी व्यक्तिमत्वाचा सखोल विचार भारतीय विचारात आहे,,मग ती पंचाकोशात्मक व्यक्तिमत्वाचे विवेचन असो की चार स्तरीय व्यक्तिमत्वाची उपपत्ती असो,किंवा एकात्म मानव दर्शन असो,ह्या आणि अशा अनेक भारतीय विचारधारा अभ्यासक्रमात आढळत नाही,,,वास्तविक ह्या विचारधारा जेव्हढ्या सखोल आहेत तेवढ्या पाश्चात्त्य विचारधारा नाही,,पण मुद्दा असा उपस्थित झाला की व्यक्तिमत्व विकास कळला पण व्यक्तिमत्व म्हणजे नेमकं काय? ह्याबाबत मात्र मला विद्यार्थी अनभिज्ञ वाटले,,,मी विद्यार्थ्यांना विचारले की ‘‘व्यक्तिमत्व म्हणजे काय ह्याबाबत मला प्रथम तुमचे मत कळू द्या‘‘‘विद्यार्थी म्हणाले एखादिव्यक्ती पाहताक्षणीच

आपल्याला वाटत न किती छान व्यक्तिमत्व आहे,,‘‘‘म्हणजे तुम्हाला असं म्हणायचं आहे का कि प्रथमदर्शनी जे रूप आपल्याला दिसते ते म्हणजे व्यक्तिमत्व ? उत्तर मिळाले होय,,,मग जी व्यक्ती दिसायला बेताची आहे,उंची बेताची आहे,,सुस्वरूप नाही,तिला व्यक्तिमत्वाच नाही का ? असे कितीतरी व्यक्ती आहेत की ज्यांना शरीर सौन्दर्य ईश्वरानें दिले नव्हते पण त्यांनी समाजात खूप कार्य केले,,,ते आदर्श जीवन जगले,,, आता मात्र विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर खूप उत्सुकता जिज्ञासा दिसली,आता मात्र मला त्यांना व्यक्तिमत्व संकल्पना सांगणे आवश्यक होते,,विद्यार्थ्यांची व्यक्तिमत्व संकल्पना केवळ बहिरंग पुरती मर्यादित होती,मी त्यांना विचारले की व्यक्तिमत्व हि स्थूल व सूक्ष्मची गोळाबेरीज आहे हे आपणास माहित आहे का? म्हणजे काय त्यांचा प्रश्न,,,जे शरीर घेऊन आपण जन्माला येतो ते आपले स्थूल व्यक्तिमत्व आहे,,जे जन्म घेते,,,वाढते,,,आणि एक दिवस संपुष्टात येते,,पण आपले सूक्ष्म व्यक्तिमत्व असते,,ते कोणते ? पुन्हा प्रश्न,,,आपले मन आणि बुद्धी,,,हे आपले सूक्ष्म व्यक्तिमत्व आहे,,,आणि नेमके ह्या व्यक्तिमत्वाची आपल्याला जाणीव नसते,,,मला मन आहे कारण मला सुख दुःखाची जाणीव होते,,,पण केवळ ह्यालाच मन नाही म्हणत,,,मन म्हणजे विचारांचा प्रवाह,,,विचार चांगले तर मन चांगले हा नियम आहे,,,आपल्या व्यक्तिमत्वाचा पोत चांगला करायचा असेल तर विचारांचा पोत सुधारावा लागेल,,अगदी स्वच्छ पाण्यासारखे,,,आणि विचारांचा प्रवाह हि आटोक्यात आणावा लागेल,,,जसे खळखळत्या पाण्यात चंद्राचे प्रतिबिंब हलताना दिसेल पण शांत पाण्यात हेच प्रतिबिंब शांत दिसेल,,अगदी तसेच विचारांची खळखळाट जेवढा कमी तेवढे सद्विचारांचे प्रतिबिंब त्यात पडेल,,आणि म्हणूनच मला सर्वप्रथम माझे विचारांचे शुद्धीकरण करणे गरजेचे आहे,,,त्यासाठी प्रयत्न करावे लागतील कारण आपल्याला जसे शारीरिक सौन्दर्य हवे आहे


तसेच मला मानसिक सौन्दर्य हि हवे आहे,,,‘‘‘मग हे व्यक्तिमत्व कसे विकसित होईल ह्याचे वर्ग कुठे आहेत ?’’विद्यार्थ्यांचा पुन्हा प्रश्न,,,,आपले धर्मग्रंथ,संतसाहित्य,सद्गुरू हे आपले मानसिक व्यक्तिमत्व सुंदर करण्याची संस्कार केंद्र आहेत,,,,,आपले दुसरे सूक्ष्म व्यक्तिमत्व आहे बुद्धी,,,मनाचे संकल्प विकल्प करण्याचे कार्य एका निर्णयावर येतो तेव्हा आपले बौद्धिक व्यक्तिमत्वाचे कार्य सुरू होते,,,जीवनात निर्णयक्षमता असणे खूप गरजेचे आहे,,,आपल्या जीवनात नेहमी द्वंद्वा असते,,चांगले काय वाईट काय,,श्रेयस काय प्रेयस काय,,,अशा वेळी योग्य श्रेयासाचा निर्णय घेऊन त्यावर ठाम राहणे हे प्रामुख्याने बुद्धीचे कार्य आहे,,आपण निर्णय घेतो पण ते बहुतांशी वरवर माझ्या प्रगतीचा वाटत असला तरी कालांतराने त्यातून दु:खाची निर्मिती होतेम्हणून योग्य निर्णय घेणारे आपले बौद्धिक व्यक्तिमत्व असते,,,ह्याही पुढे जाऊन ह्या बुद्धीला जेव्हा वैश्विक तेचा स्पर्श होतो तेव्हा ह्या सूक्ष्म व्यक्तिमत्वाचा विकास होऊन तेच व्यक्तिमत्व मग अध्यात्मिक व्यक्तिमत्वात विकसित होते,,,आणि मग सर्वांभूती परमेश्वर पाहण्याची सहजता ह्या व्यक्तिमत्वात येते,,,हा व्यक्तिमत्वाचा क्रमविकास आहे,,,स्थूलकडून सूक्ष्मकडे आपला व्यक्तिमत्व विकासाचा प्रवास असायला हवा,,,हाच खरा व्यक्तिमत्व विकास आहे,,,,,हे सर्व विवेचन सुरु होते,,,विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद मला जाणवत होता,,,आता व्यक्तिमत्व विकासाचा जेव्हा विचार करू तेव्हा आमचे सूक्ष्म व्यक्तिमत्व विकसित करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असू असे अभिवाचन विद्यार्थ्यांनी मला दिले,,,तासिका संपली होती,,,मी अत्यंत समाधानाने वर्गाच्या बाहेर निघाले.

# ५ कार्य प्रेरणा

प पू स्वामी चिन्मयनानंद अभ्यास केंद्रात युवा वर्ग सुरु होता,,नुकतीच स्वामी चिन्मयनानंद ,स्वामी विवेकानंद,ज्ञानेश्वर माउली ह्याच्या जीवन चरित्रावर त्यातील साम्य स्थळावर दोन दिवस सातत्याने चिंतन सुरु होते,,,त्यांनी आपल्या जीवनात केलेले कार्य,त्यांचा उत्साह ,मानवजातीच्या कल्याणाबाबत त्यांची तळमळ,वैश्विक दृष्टिकोन,भारतीय तत्वज्ञान बाबत त्यांनी केलेले कार्य,अशा अनेक पैलूं च्या बाबतीत त्यांना विदित केले होते,,,आता प्रश्नोत्तराचा तास होता,,,विद्यार्थ्यांच्या मनात कायम खूप प्रश्न असतात,,,एका विद्यार्थ्याने विचारले‘‘‘मॅडम आपण सांगितलेली थोर व्यक्तीची माहिती खरंच खूप प्रेरणादायी आहे,,पण ह्या त्यांच्या प्रेरणेचे रहस्य काय असते ?‘‘‘मी त्यांना सांगितले की ह्या सर्वांचा कार्य करण्याचा अखंड उत्साह हीच त्यांची कार्य प्रेरणा असते,,हाती घेतलेले कार्य पूर्णत्वाला जाईपर्यंत त्यांचा हा उत्साह टिकून असतो,,,एखाद्या कार्याचे वेड घेऊन त्या कार्याचा अखंड पाठपुरावा हि त्यांची कार्य शैली असते,,हे लोक कमालीचे आशावादी असतात,,,,ह्यावर माझ्या एका विद्यार्थ्याने लगेच प्रश्न केला की समाजात दोन्ही प्रकारचे लोक आढळतात,आशावादी आणि निराशा वादी ह्यातील नेमका फरक काय?‘‘‘ह्या मुद्द्यावर मी त्यांना प्रतिप्रश्न केला की तुम्ही आशावादी आहेत की निराशा वादी ?‘‘‘विद्यार्थ्यांना ते निराशावादी आहेत हे म्हटलेलं आवडत नाही,,त्यामुळे त्यांनी मला लगेच उत्तर दिले‘‘मॅडम अर्थात आम्ही आशावादी आहोत‘‘‘असे तुम्हास का वाटते ?माझा प्रतिप्रश्न,‘’‘कारण आम्ही उत्साही आहोत,‘‘‘,,,मी त्यांना विचारले ‘‘‘की तुमचा उत्साह किती काळ टिकतो‘‘‘’उत्तर मिळाले ‘‘‘हाती घेतलेल्या कार्यात यश मिळाले तर उत्साह वाढतो आणि अपयश मिळाले तर उत्साह कमी होतो‘‘‘मला हे उत्तर अपेक्षित होते,,मी त्यांना सांगितले की ह्याचा अर्थ हा आरंभ

शूर पणा आहे,,,तुम्ही आशावादी आहेत पण आरंभ शूर आहेत,,,काही लोक कार्याला प्रारंभ करतात त्या कामात अपयश आले की ते पुन्हा इतर कार्य क्षेत्र शोधू लागतात,,,असे एकदा नाही तर बऱ्याच दा घडते,,आणि मग मिळणाऱ्या प्रत्येक अपायशामागे उत्साह कमी कमी होत जातो आणि मग शेवटी कार्यप्रेरणाच राहत नाही,,,पण ह्या अपयशाची खरी मीमांसा केली तर प्रयत्न अपुरे असणे किंवा चुकीच्या दिशेने होणे हे अपयशाचे कारण असते पण आपण हि मीमांसा न करता कायम अपयशाचे खापर दुसऱ्यावर फोडतो,,,अपयश हा यशाकडे नेणारा महामार्ग आहे हे मला समजताच नाही'''विद्यार्थी खूप अंतरमुख होऊन ऐकत होते,,,'''म्हणजे आमची आशावादी असण्याची दिशा चुकीची आहे असे आपल्याला म्हणायचे आहे का?''तुमचा आशावाद चुकीचा आहे असे नाही पण तो मला थोडा वरवरचा वाटतो,तुम्ही कार्य करता आणि त्याबाबतची फलप्राप्ती निर्धारित करता ,,तुम्ही निर्धारित केलेली फलप्राप्ती तुम्हास मिळाली नाही की ते अपयश वाटायला लागते आणि कार्य करण्याचा उत्साह हि मावळतोपण महान लोकांमध्ये साततत्याने काम करण्याचा उत्साह ,फलप्राप्ती ची वाट पाहण्याची तयारी अचूक दिशेने केलेले प्रयत्न व प्रयत्नाचे सातत्य,अपायशाबाबत निराशा न ठेवता त्याची अचूक मीमांसा ह्या सगळ्या बाबी असतात त्यामुळे त्यांचा उत्साह टिकून तर राहतोच पण ते त्याचे जीवांध्येयाच बनते,,,उत्साहाने व चिकाटीने कार्याला वाहून घेणे व तेच जीवनध्येय बनविणे हे थोर लोकांच्या यशस्वी कार्य प्रणालीचे रहस्य असते,,त्यामुळे निराशा त्यांच्या जीवनात येत नाही,,,शिवाय हे सर्व कार्य करताना ते आपल्या सर्व कार्यावर स्वतः बारीक लक्ष ठेऊन असतात,,त्यांच्या व्यक्तिमत्वात हा जो सावधपणा येतो तोच त्यांच्या जीवनाचा समतोल राखतो,,,आपल्या व्यक्तिमत्वाला ते प्रयत्नपूर्वक शिस्त लावतात,,,आणि मग त्यांना आपल्या जीवनाचा सूर गावसतो,,,, आणि मग हीच त्यांची

अंत:प्रेरणा बनते,,,आणि ह्या व्यक्ती दुर्दम्य आशावादी बनतात,,,‘‘‘एका विद्यार्थ्याने चटकन उभे राहून प्रश्न केला की ह्याचाच अर्थ अचूक कर्म,,त्याबाबतची चिकाटी,,त्या कामाची गुणवत्ता,,कार्याची अंत:प्रेरणा,अपयशाची अचूक मीमांसा,कार्याचा उत्साहाचे सातत्य,,कार्यापासून मिळणारा निखळ आनंद,,प्रयत्नपूर्वक स्वत:ला लावलेली शिस्त,,विचार उच्चार ह्यातील आंतरिक सुस्पष्टता आम्हाला नक्की जीवनात यश प्राप्त करून देईल,,,कारण बाह्य संपत्ती आम्हाला नेहमीच उपलब्ध होईलच असे नाही पण आमची आंतरिक संपत्ती मात्र आमच्यापासून कुणीही हिरावून घेणार नाही‘‘‘‘’त्यांची ही विधाने मी ऐकली ,,,एक दृष्टी गुरुदेवांच्या फोटोकडे टाकली,,,प्रत्यक्ष गुरुदेव माझ्या विद्यार्थ्यांच्या ऱ्हिदयात प्रगट झाले होते,,,,आता मी निश्चिन्त होते,,,प्रत्यक्ष गुरुदेवानीच हात धरलाय,,,आता काळजी कशाची ?



६

# सुखाचे रहस्य

वर्गात गटचर्चा सुरु होती,,,‘‘‘‘‘विषय होता मानवाचे सुख‘‘‘‘एका विद्यार्थ्यांने प्रश्न केला समाजात बुद्धिमान माणसाची अपेक्षा काय असते,,,एक अचानक विचारलेला प्रश्न,,,दुसऱ्या विद्यार्थ्य ने उत्तर दिले,,,काय असणार,शारीरिक स्वास्थ्य मानसिक समाधान आर्थिक स्थैर्य ,,विषयापभोग,,, सर्व प्रकारच्या ऐहिक आनंद,,,,ह्यावर दुसऱ्या विद्यार्थ्याने उत्तर दिले‘‘‘हो न त्यासाठी आपल्याला गेले अनेक वर्षे किती धडपड करावी लागली,,,अनेक चांगल्या वाईट विचारप्रणालीन आपण स्वीकारले,,,त्यातील काही आपल्याला फायदेशीर होत्या पण काही विचार प्रणालीने विशेषत: भौतिकवादाने मात्र जेवढे संस्कृतीचे नुकसान झाले तेवढे नुकसान आजपर्यंत झाले नव्हते,,,काहीतरी चुकीची विचार प्रणाली वर आपण कसून मेहनत घेत आहोत असे तर नाही ? अगदी अष्मयुगीन काळापासून तर आज नॅनो युगापर्यंत मानवी सुखासाठी प्रयत्न सुरु आहेत पण सुखाच्या ध्येया पासून माणूस खूप खूप दूर जाताना दिसतोय,,,तो जेवढा सुखाच्या मागे जातोय तेवढे ते सुख त्याच्यापासून दूर जातंय असं का,,,ह्या प्रश्नाचे उत्तर त्यांना कळेना,,,आता ते माझ्याकडे आले,,,मी त्यांना विचारले की आपल्या भोवतालचे वातावरण चांगले कि वाईट हे कसे ठरविणार ? आपण कुठेही जातो तेव्हा आपण सर्व प्रथम विचारांनी पोहोचतो,,,म्हणजेच आपण जेव्हा कुठेही जातो तेव्हा आपण आपले विचार घेऊन जात असतो,,,आणि आपले विचार ठरवितात आपण जेथे गेलो तेथील वातावरण कसे आहे ते,,,,आपले जे वैचारिक व्यक्तिमत्व असते ते आपल्या आजूबाजूचे वातावरण निर्धारित करणारा घटक असतो,,,विचार हि आपली सर्वात मोठी संपत्ती आहे,,,आपले विचार जेवढे आनंदी तेवढे आपण बाह्य विश्वात आनंद अनुभवू शकतो,,,विचार विध्वंसक

असतील तर आपले वर्तनही विध्वंसक राहील,,,आपण जेवढे आनंदी तेवढे आपले बाह्य विश्व आनंदी,,,,कल्पना करा तुमच्या मनात दुःखाची द्वेषाची भावना आहे तेव्हा कितीही आनंदी वातावरणात तुम्ही आनंदी राहू शकणार नाही,,,,,माझे म्हणणे त्यांना पटत होते पण सध्या स्थितीत हा मनाचा आनंद कसा टिकवायचा ? विद्यार्थ्यांच्या मनात खरंच खूप प्रश्न असतात,,,मी त्यांना विचारले नदी स्वच्छ करण्यासाठी काय कराल ?लगेच उत्तर दिले भविष्यात त्यात प्रदूषण होणार नाही ह्याची काळजी घ्यावी लागेल,,,,,आणि सर्व आश्चर्याचा पडले कारण प्रश्नाचे उत्तर त्यांनीच दिले होते,,,मना मध्ये वाईट विचारांचा शिरकाव होऊ न देणे हा विचार शुद्ध बनविण्याचा मार्ग आहे,,,हे कसे शक्य आहे?मी सांगितले मुलांनो आपण सातत्याने अनेक विचार करतो त्यात काही प्रिय असतात काही अप्रिय,,,प्रिय गोष्टी आपल्याला आनंद देतात अप्रिय विचार आपल्याला त्रास देतात,,,,समजा आपण असे केले की प्रिय गोष्टींचा जास्त विचार करायचाच नाही कारण त्या आनंदच देतात,,,,आपण एक सराव आपल्या विचारांना देऊया,,,,,तो सराव म्हणजे जेवढे आपल्या मनात वाईट विचार येतात त्याच्या बाबतीत आपण तटस्थ भूमिका घेऊया,,,आपल्या विचारातील दुःखदायक विचारांकडे फक्त बघा,,,त्यात प्रामुख्याने इतरांचे दोष शोधणे इतरांना वाईट म्हणणे,,,मला कुणी बोलले,,,माझा कुणी अपमान केला,,,माझ्याबद्दल कुणी वाईट बोलतो,,,ह्याबद्दल तटस्थ राहायचे,,,अगदी नदीच्या काठावर उभे राहून आपण नदीतील कचरा बघतो न तसेच,,,त्या कडीकचऱ्याला आपण हातात घेत नाही,,,अगदी तसेच,,,लक्षात घ्या तो काडी कचरा हातात घेतला तर जखम तुम्हालाच होणार आहे,,,हात तुमचे खराब होणार आहेत,,,विचारामधील अशाच घातक बाबीना आपल्या विचारांचा ताबा घेऊ द्यायचा नाही,,,हे दुबळ्या व विध्वंसक विचारांचे उद्योग

आहे,,,जर आपण आपल्या विचारांचे कायम असेच दुबळे पैलू पाहत बसलो तर आपण खरंच दुर्दैवी ठरू,,,म्हणून आपले विचारांचेही शुद्धी कारण करणे आवश्यक आहे,,,,हे शुद्धीकरण सतत चांगले विचाराने होईल,,चांगल्या विचारांच्या अनुसंधानाने होईल,,,,,ह्यासाठी सातत्याने मनाला प्रशिक्षण द्यावे लागेल,,,,,ह्यासाठी वाईट विचार झटका व ताबडतोब त्या ठिकाणी चांगल्या विचारांची स्थापना करा,,,,लक्षात घ्या ह्या जगात काहीही शंभर टक्के वाईट नाही व चांगलेही नाही पण वाईट पैलू दूर करायचे आणि चांगल्या पैलूंवर ध्यान केंद्रित करायचे,,,,ह्यासाठी प्रार्थनेसारखा उत्तम मार्ग नाही,,,सतत दुःखाचा विचार करण्यापेक्षा त्यातील चांगली बाजू बघायची व आपले विचार पर्यायाने आपले जीवन समृद्ध बनवायचे,,ह्यासाठी आपण साधनेकडे वाळयालाच हवे,,,,आपण चुकीचे विचार चुकीची जीवन पद्धतीचा त्याग केलाच पाहिजे,,,,विद्यार्थ्यांना त्याच्या प्रश्नाचे उत्तर मिळाले होते,,,एकमेकांकडे ते पाहू लागले,,,आणि त्यांनी माझ्याकडे नजर फिरवली,,,त्यांच्या डोळयात दृढ निश्चय मला दिसत होता,,,माझ्यातील शिक्षिका खूप सुखावली,,,सदाफुली



७

# आदर्श कोण ??

माझ्या महाविद्यालयास २०१४ मध्ये प पू स्वामी चिन्मयनानंद अभ्याकेंद्राला विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिली आणि अनुदानही दिले,,हे अभ्यासकेंद्र केवळ भारतातीलच नव्हे तर जागतिक स्तरावरील पहिले शासकीय अभ्यास केंद्र ठरले,,,माझ्याकरता व माझ्या महाविद्यालायकरिता हि अतिशय सन्मानाची बाब आहे,,,ह्याच अभ्यास केंद्रात माझ्या विद्याथ्यांचा अभ्यास वर्ग सुरु होता,,,युवकांचा अभ्यास वर्ग,,,मी विद्यार्थ्यांना प्रश्न केला की ‘‘‘युवा कुणाला म्हणायचे‘‘‘‘काही विद्यार्थ्यांनी युवा हि संकल्पना वयोमर्यादेशी जोडली,,काही विद्यार्थ्यांनी हि संकल्पना शारीरिक क्षमतेशी जोडली,,,काहींनी हि संकल्पना सौन्दर्याशी जोडली,,,,,वरवर पाहता ह्या संकल्पना चुकीच्या नव्हत्या,,,पण माझ्या एक बाब लक्षात आली की हे सर्व विद्यार्थी केवळ बहिरंगलाच युवा समजत आहेत,,,प्रथम दर्शनी जो कमी वयाचा दिसतोय म्हणजे साधारणत: ४० वर्ष वयाचा तो तरुण समजायचा,असा त्यांचा म्हणण्याचा आशय होता,,माझ्या लक्षात आले की आता त्यांचा दृष्टिकोन बद्दलविणे गरजेचे आहे,,वास्तविक पाहता युवा हा आदर्शवादी असतो त्याच्यात प्रचंड उत्साह असतो,युवा हा नवनवीन संकल्पनांना निर्माण करणारा असतो,,प्रयोगशील असतो,,,परिश्रम करण्याची ताकद कुवत त्याच्या ठिकाणी असते,,,,हे मी सांगत असतानाच एका विद्यार्थ्याने प्रतिप्रश्न केला की‘‘‘मॅडम तुम्ही युवकांचे इतके छान वर्णन केले हे आम्हाला मान्यच आहे ,,,पण आज आपण पाहतो कि आमचेच भावंड व्यसनांच्या आहारी जात आहेत,,त्याचा उत्साह विनाशाकडे ओढला जातो,,,आमच्या युवा पिढीत नैराश्याचे प्रमाण वाढते आहे,,त्यामुळे काही युवक गुन्हेगारीकडे सुद्धा वळताना आम्हाला दिसतात,,,आणि आयुष्यात थोड्या थोड्या घटनेने स्वत: चे जीवन संपवितात,,,मग ह्यांना आपण काय म्हणायचे ? आणि

असे घडण्याचे कारण काय ?‘‘‘’’मी विद्यार्थ्यांच्या ह्याच प्रतिक्रियेची वाट बघत होते,,,कारण मी सांगितलेले युवकांचे गुण व प्रत्यक्ष समाजात दिसणाऱ्या घटना ह्या दोन्ही सत्य होत्या,,आणि विद्यार्थी गोधळले होते,,,युवकांसाठी आवश्यक आहे नव्हे प्रत्येकासाठी आवश्यक आहे की आपल्या डोळ्यासमोर एखादे उच्च आदर्श हवे,,पण हा आदर्श असा हवा कि जो आपल्या स्वत: च्या विचारांचे मूर्त स्वरूप असेल,,,हा आदर्श त्याच्या दृष्टीने उच्च स्थानावरचा असतो,,ह्या आदर्शची अनुकरण करता करता हाच आदर्श मग त्यांच्या उत्साहाचे स्रोत बनतो,,,त्यांच्या कार्याची स्रोत बनतो,,,आणि त्या आदर्शप्रत पोहोचणे हे त्याच्या जीवनाचे ध्येय बनते,,,ह्या ध्येयासाठी तो झपाटून जातो,,तो काहीही करायला तयार असतो,,,कारण त्याला त्या आदर्शच्याच माध्यमातून जीवनध्येय सापडलेले असते,,,आणि हे जीवन ध्येय त्याच्या जीवनाची वाटचाल निश्चित करते,,,आणि म्हणूनच जीवनात उच्च प्रतीचे आदर्श आपल्या डोळ्यासमोर असण्याची आवश्यकता आहे,,,पण आता प्रश्न पडला की हे आदर्श फक्त अध्यात्मिक क्षेत्रातीलच असावे का ? उत्तर आहे की ही आदर्श विविध क्षेत्रातीलच असायला हवे पण ते आपल्या अभिरुचिनुरूप असावे व त्याला अध्यात्मिक अधिष्ठान असावे,,,,विद्यार्थ्यांचा प्रश्न म्हणजे काय ? अध्यात्मिक अधिष्ठान असावे म्हणजेच कोणताही आदर्श डोळ्यासमोर ठेवा पण त्यातून माझे व अखिल मानव जातीचे कल्याण राष्ट्राचा विकास होणार आहे का ? जे आदर्श मी डोळ्यासमोर ठेवणार आहे त्याच्या अनुकरणातून माझ्यात सद्गुण रुजणार आहेत का? सद्गुणांचा विकास होणार आहे का?ह्या सर्वांचे उत्तर शोधण्याची विवेक बुद्धी आपल्यात असायला हवी,,ह्यातील प्रश्नाचे उत्तर होकारार्थीच असायला हवे,,,आणि हे सर्व माझ्या मनोवृत्तीशी जोडल्या गेले असावे,,,मग समाजात असे आदर्श आहेत का ? खूप आहेत,,,इतिहासात तर आहेच आहे,,पण वर्तमानातही ह्या आदर्श

व्यक्तिमत्वाची कमतरता नाही फक्त आमची पाहण्याची दृष्टी नाही,,,अगदी शेतात काम करणारा शेतमजूर अत्यंत प्रामाणिक पणे आपले कार्य निष्ठेने करून मिळालेल्या मजुरीला न्याय देणारा असेल तोही माझा आदर्श ठरू शकतो,,,जीवन संघर्षमय असून सुद्धा अत्यंत धैर्याने संकटांना सामोरी जाणारी एखादी स्त्री माझ्या दृष्टीने सक्षम आणि आदर्श ठरू शकते,,,अतिशय श्रीमंत पण विलक्षण दानशूर व्यक्ती माझ्यासाठी आदर्श ठरू शकते,,,आपल्या अपत्यावर सुसंस्कार करून चांगले शिक्षण देऊन राष्ट्राला एक सुसंस्कारित नागरिक देणारी गृहिणीही माझा आदर्श असू शकते ,,,,,त्याच बरोबर नोकरी घर सामाजिक कार्य अशा अनेक आघाड्या सांभाळणारी स्त्री पण माझा आदर्श होऊ शकते,,,आपल्या ध्येयासाठी विपरीत परिस्थितीत संघर्ष करणारा व्यक्ती,,,,,सुसंपन्न स्थिती असतानाही आपली सर्व संपत्ती समाजाच्या नावे करून स्वतः मात्र सर्वसामान्य जीवन जगणारे,,,उपेक्षितांच्या सेवा करणारे,,,इतरांच्या जीवन कल्याणासाठी धडपडणारे लोकं माझे आदर्श ठरू शकतात,,,,आपल्या अपंग मुलांमध्ये सकारात्मकता निर्माण करणारी आई आपले आदर्श असू शकते,,,आपले वैभव सोडून जगत कल्याणकरिता संन्यास घेऊन अध्यात्मिक कार्य करणारे अनेक युवक ज्यांच्यामुळे आज भारतीय तत्वज्ञान पुढच्या पिढीपर्यंत पोहोचत आहे ते माझे आदर्श असू शकतात,,,,अतिरेक्यांच्या हल्ल्याला न जुमानता शिक्षण घेणाऱ्या अनेक युवती आहेत त्या माझे आदर्श ठरू शकतात,,,दिवसभर राबून रात्रशाला करणारे माझी अनेक बालके आहेत ते माझे आदर्श असू शकतात,,,अगदी वयाच्या

८० व्या वर्षी आपला तरुण जवान मुलगा देशाची सेवा करताना शाहिद झालेल्या पित्याची नातवाला सुद्धा सैन्यात भरती करण्याची जिद्द ठेऊन संसाराचा गाडा ओढणारा सुद्धा माझा आदर्श ठरू शकतो,,,,किती किती उदाहरणे द्यायची समाजातील ? युवक

मित्रानो हि आदर्श आपल्या आसपास आहेत,,,फक्त तुम्हाला दृष्टी विकसित करायची आहेत,,,इतिहासातील आदर्श शोधा,,,समाजातील आदर्श शोधा,,,त्यांचा जवळून अभ्यास करा ,,त्यांना तुमच्या जीवनाचा प्रेरणा स्रोत बनवा,,,,आणि जीवनात बिनधास्त प्रवेश करा,,,हि आदर्शच तुम्हाला कार्याची प्रेरणा देतील,,,,, विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर खूप समाधान झळकले,,,,त्यांच्या डोळ्यात मला शोधक भाव दिसला,,,मलाही खूप समाधान मिळाले,,,माझे होणारे शिक्षक हे स्वतः तर आपली दृष्टी विकसित करतीलच पण त्यांच्या हातून ज्या पिढ्या घडतील त्यांची दृष्टी ते विकसित करू शकतील हा आत्मविश्वास मला वाटला,



# ८ वेदना:तरुण मुलींची

मागील आठवड्यात मनाला अत्यंत वेदना देणारी घटना घडली,,,माझी एक विद्यार्थिनी दोन दिवसांपासून सातत्याने रडत होती,,कॉलेज मध्ये आल्यावर तिचा चेहऱ्यावरून मी ओळखले,,,आणि तिला बोलाविले,,,तिला विश्वासात घेतले,,,तिच्या सतत रडण्याचे कारण विचारले,,,ते ऐकून माझ्या मनात खूप विचार आलेत,,ह्या तरुण मुलांनी आपले आयुष्य खरंच किती गुंतागुंतीचे बनविले आहे हे लक्षात आले,,मला काय करायचे आहे हे माहित नाही,,,मला कुठे जायचे हे माहित नाही,,,,मला काय हवंय हे हि माहित नाही,,जे हवाय ते अत्यंत तात्कालिक आहे,,,ते तरी खरंच हवाय का हे माहित नाही,,,जे आवडलं ते हवंय एवढंच माहित,,,,आणि जे पाहिजे आहे त्याचे कारण काय हे हि माहित नाही,,,फक्त हवंय,,, त्यासाठी त्याग करण्याची तयारी नाही,,,जीवन कसे जगायचे हे हि माहित नाही,,,वर्तमानात जगायचे पण वर्तमानातून भविष्य आकार घेते हे माहित नाही,,,स्वत: च्या जीवनाचे निर्णय घेताना ह्या निर्णय प्रक्रियेत मोठ्यांचा सहभाग असावा हे माहित नाही,,,घरातील जेष्ठ मंडळी आपल्या भल्याचा विचार करतील हा विश्वास नाही,,,स्वत: चे आयुष्य स्वत: च्या पद्धतीने जगायचे,,पण विचारात एवढी परिपक्वातही नसते,,,कारण ती विकसित करण्याची प्रणाली कमकुवत झाल्या आहेत,,,ह्यातील सर्वात पहिली प्रणाली कुटुंब प्रणाली,,,आज छोट्या कुटुंब पद्धतीने मुलांना नातेवाईक माहित नाही ,,,नात्यांमधील सुसंवाद हारविला,live in relationship,, contract marriage इत्यादी मुळे कुटुंबावर आघात होतायत,,,,आजी आजोबा नावाचे संस्कार केंद्र हरविले,,,जी जी संस्कार केंद्र कुटुंबात होती ती हरवली,,,शाळेत शिक्षक आणि विद्यार्थी हा सुसंवाद हरवलाglobalization च्या युगात माणूस मात्र खुजा

झाला,,,समाजात घडणाऱ्या घटना ह्याबद्दल तर मन अत्यंत सुन्न होते ,,,,रोज वर्तमान पत्र वाचावे असे वाटत नाही इतक्या मन सुन्न करणाऱ्या घटना,,,जाहिराती,,,,इतर प्रसार माध्यमे सुद्धा संपूर्ण कुटुंब एकत्र बसून tv पाहू शकत नाही सिनेमा पाहू शकत नाही,,शाळेमध्ये शिक्षकाकडून आपल्याच अपत्यावत विद्यार्थिनीवर होणारे अत्याचार,,,कुटुंबात स्त्रीवर होणारे अत्याचार,,,नको त्या वयात नको त्या फिल्म बघण्याचे inernet ने दिलेले स्वातंत्र्य,,आईबाबांच्या घरात होणारी भांडणे,,,पैशासाठी होणारी दोघांची ओढाताण,,अशा अनेक गोष्टी माझ्या डोळ्यासमोर आल्यात,,,मग त्या विद्यार्थिनीला मी रडण्याचे कारण विचारले,,,तिने जे सांगितले ते होते '''मॅडम मला बघायला मुलगा आला होता तो मला खूपआवडला ,,,,मी बी एड झाली मला भविष्यात नोकरी करायचीच आहे असे मी त्याला सांगितले,,,,पण त्याला माझी नोकरी करण्याचा निर्णय मान्य नाही,,,,,मी तिला विचारले मुलगा सुसंस्कृत वाटतो का,,,ती म्हणाली मॅडम मुलाला सुपारीचेही व्यसन नाही पण तो मला नोकरी नाही करू देणार,,घराणे खूप छान आहे,,मुलगा पण सुस्वभावी आहे,,,मुख्य मला नवरा म्हणून तो खूप आवडला पण त्याचे विचार जुनाट आहेत,,,मी त्याला नकार दिला,,,,पण आता इतर स्थळे अशी येतील का,,,,काय करू मला काहीही सुचत नाहीये,,,,,मला खूप आश्चर्य वाटले,,पण सध्या समाजात हीच परिस्थिती आहे,,,आपला जीवनसाथी कसा असावा ह्याचे सगळे निकष बदलले आहेत,,,ह्याला अपवाद आहेत,,,पण आज मुलींच्या दृष्टीने विचार केला तर त्यांना पॅकेज हवे,,पुणे मुंबईसारख्या ठिकाणी फ्लॅट हवा,,,घरात जास्त व्यक्ती नकोत,,,आयुष्य कसे स्वतंत्र जगायचे आहे,,,नोकरी म्हणजे करिअर हि भावना दृढ झाली आहे,,,त्यापलीकडे आयुष्यात संघर्ष करून काही मिळवायचे,,,काडी काडी करून घरटे तयार करायचे हे मान्यच नाही,,,मुलांना पत्नी म्हणून सहचारिणी पेक्षा मैत्रीण हवी

आहे,,,पूर्वी घराणे ,,मुलाचे कर्तृत्व,,,निर्व्यसनी पणा,,,सुसंकरितात ,,,घरात नातेवाईकांचे ऐश्वर्या ,,,ह्या चोकटीत केवळ दोन जीवांचेच नाही तर दोन घराणी संपन्न होत,,,आपला गृहस्थाश्रम आपल्या मुलाकडे निश्चिन्त सोपविता येत होता,,,पाश्चात्त्य राष्ट्रात लग्न हा चामड्याच्या करार असेल पण भारतात ती गृहस्थाश्रमाची सुरवात असते,,माझ्या विद्यार्थिनीने मला विचारले की मग मॅडम मी एवढी शिकले ते काय फक्त संसार करण्याकरिता ? मी तिला सांगितले की गृहिणी असणे हे तुला कमीपणाचे वाटते का,,,उलट तो सर्वात tough आणि तरीही समाधान देणारे कार्य आहे,,,आपल्याच माणसांची सेवा,,,आपल्या अपत्यांना घडविणे,,,आपल्या शिक्षणाचा उपयोग आपल्या सुसंकरित पिढी घडविण्यात नाही ? गृहिणीला एवढं कमी लेखण्याची काहीच गरज नाही,,,एकाच वेळी कितीतरी आघाड्या ती सांभाळू शकते नव्हे सांभाळते,,,सर्व कुटुंबाला एकत्र बांधून ठेवते,,,आपल्या मुलांवर सुसंस्कार करते,,अग ती घरात असते म्हणून तो जगात आपले कर्तृत्व गाजवू शकतो,,,लक्षात ठेव आई हि वडिलांची भूमिका वेळ प्रसंग आला तर करू शकते,,,,स्त्रीने हीच तर शक्ती स्वतः मधील ओळखली नाही,,,नोकरी करणे म्हणजे जीवन आहे असे समजू नको,,,,नावरबायकोचे नाते जरी शरीरापासून सुरु होत असले तरी त्याचा क्रमविकास हा आत्मिक स्तरापर्यंत आहे,,,एकमेकांना अध्यात्मिक स्तरावर उन्नत करण्याकरिता पितृ ऋण फेडण्याकरिता ह्या नात्याची योजना आहे,,,,तेव्हा केवळ नोकरी करू देणार नाही म्हणून सुसंस्काराना लाथाडू नकोस,,,ती मला म्हणाली मॅडम माझ्या वडिलांचे पण हेच मत होते,,,,मी म्हटले बरोबर आहे,,,वडील म्हणून त्यांना हेच वाटणार कि मी आजपर्यंत जी सुरक्षितता प्रेम आदर,सरंक्षण माझ्या मुलीला दिले,,तेच तिला तिच्या होणाऱ्या सहचाराकडून मिळावे,,,,,,ती म्हणाली ह्यात आपण स्त्री मुक्ती संकल्पना नाकारतो आहे असे तुम्हाला वाटत नाही का,,,,मी

तिला सांगितले की स्त्री मुक्ती म्हणजे फक्त नोकरी कारण आहे का तुझ्या कुटुंबाचे निर्णय तू घेऊ शकते,,तुझ्या कुटुंबाचा विकास तू तुझ्या शिक्षणाच्या माध्यमातून तू करणार हि स्त्री मुक्ती नाही ? तुझ्यामुळे सर्व कुटुंब एकत्र येणार हि स्त्री मुक्ती नाही,,,,कुटुंबाचे सर्व व्यवहार तू करणार हि स्त्री मुक्ती नाही?सर्वच स्त्रिया घराच्या बाहेर पडला तर समाजाचा तोल सांभाळला जाईल? हा विचार मनात येण हि स्त्रीमुक्ती नाही ?

आता मात्र तिच्या चेहऱ्यावर समाधान झळकत होते,,,मॅडम थँक्स,,,आता मी रडताना तुम्हाला कधीच दिसणार नाही,,,आणि जेव्हाही काही प्रसंग येईल तेव्हा मला नक्की तुमची आठवण येईल,,,,मी खूप सुखावले,,,,मला मुलगी नसल्याची खंत मिटली,,,माझ्या मुलीला मी उभे राहण्याची मानसिक ताकद देऊ शकले,



# ९ वर्गातील सर्वधर्म परिषद

माझ्या वर्गात शैक्षणिक तत्वज्ञान ह्या विषयातील धर्म हा विषयांश मला शिकवायच्या होता,,,प्रशिक्षणार्थींना विविध धर्म आणि शिक्षण असा मुद्दा शिकवायचा होता,,तो विषय मी स्वतः शिकविण्या पेक्षा विद्यार्थ्यांना ह्याबाबत काय वाटते हे पाहण्यासाठी मी वर्गांतर्गत सर्वधर्म परिषद घेतली ,,,विविध विद्यार्थ्यांकडे विविध धर्म विचार मांडण्याची जबाबदारी सोपविली,,,एका विद्यार्थ्याला त्या परिषदेचे अध्यक्ष केले,,,सर्व विद्यार्थ्यांनी प्रत्येक धर्मविचारावर खूप छान तयारी केली,,,प्रत्येक जण आपले धर्म मत अत्यंत हिरीरीने मांडत होता,,,धर्म विचारांचे समर्थन करीत होता,,खूप चांगला अभ्यास केला होता त्यांनी,,,,सर्वांचे विचार मांडणी झाली,,आता वेळ होती ती धर्मपरिषदेच्या अध्यक्षा च्या वक्तव्याची,,,,अध्यक्षवर मी एक जबाबदारी दिली होती,,,ती अशी की त्याने सभेचा कौल घ्यायचा,,,आणि कोणता धर्म श्रेष्ठ हे सभेकडून निर्धारित करायचे,,,आणि तो त्या दिवशीचा धर्म परिषदेचा निर्णय असेल,,,,शासकीय महाविद्यालयात अशा प्रकारची कृती घेणे हे आव्हानात्मक होते,,,,समोरचा विद्यार्थी हा होणार शिक्षक होता,,,सभेचा अध्यक्ष प्रशिक्षणार्थी त्याचे मत मांडायला उभा झाला,,,सुरवातच त्याने केली की धर्मांच्या संकल्पना ,,विविध धर्म संकल्पना मी ऐकल्या,,,सर्व धर्मांची मते ऐकली,,,माझ्या लक्षात आले की सर्व धर्मातील विचार सारखे आहेत फक्त शब्द बदलतात आहेत,,,सर्व धर्म मानवाच्या कल्याणकरिता आहेत,,,,सर्व धर्म मानवाला सुसंस्कारित करतात,,,अंतिम ध्येयाची वाटचाल शिकवितात,,,धर्माची परिभाषा कळली,,त्यातील तत्वज्ञान कर्म ह्या दोहींही बाजू समजल्या,,,मानव कल्याणकडून विश्व कल्याणकडे व्यक्तीला नेणं हा धर्माचा उद्देश्य आहे हेही कळले,,,धर्मामध्ये आपण भेद करू नये ,,,हे काही अंशी कळले,,,,ह्यापुढी त्याच्या मुद्द्याने

मात्र मी अंतर्मुख झाले,,,त्याने प्रश्न केला की मॅडम हे सर्व मला समजले तरीही नेमका धर्म म्हणजे काय हे मात्र मला नाही समजले,,,आणि माझा सर्व धर्म परिषदेचा उद्देश्य आंशिक सफल होतोय असे मला वाटले,,,कारण हाच प्रश्न त्याच्या मनात यावा हीच माझी अपेक्षा होती,,,,आता त्याच्या प्रश्नाचे उत्तर देण्याचे आव्हान मी स्वीकारले, प पू स्वामी चिन्मयनंदानी जी धर्माची अत्यंत व्यापक परिभाषा केली आहे,,,ते म्हणतात Law of being is dharma धर्माची हि परिभाषा मला खूपच व्यापक वाटते,,,ते म्हणतात अत्यंत घाईत केलेले प्रतिशब्द वाटतो,,,धर्माला प्रतिशब्द धर्मच आहे,,,अस्तित्वाचा नियम म्हणजे धर्म,,, ज्याचा जो अस्तित्वाचा नियम आहे त्याला धर्म म्हणायचे,,,,म्हणजे काय? ज्या ज्या गुणामुळे वस्तू व्यक्तीच्या अस्तित्वाला अर्थ येतो तो त्याचा धर्म,,,गोड असणे हा साखरेचा धर्म आहे,,,,तिखट असणे हा मिरचीचा गुणधर्म आहे,,,,उष्णता हा अग्नीचा गुणधर्म आहे,,,गोडव्याशिवाय साखर नाही,,तिखटाशिवाय मिरची नाही,,,,उष्णतेशिवाय अग्नी नाही,,,ते त्यांचा गुणधर्म सोडत नाही,,,हा अस्तित्वाचा नियम आहे,,,मग मनुष्याचा अस्तित्वाचा नियम काय ?ज्या वासनांचे गाठोडे घेऊन मानव जन्माला येतो तो त्याचा धर्म,,,ज्या ज्या गुणांमुळे त्याला मानव म्हटले जाते तो त्याचा धर्म,,,हि धर्माची परिभाषा मला जास्त व्यापक वाटते,,,निसर्गतही आपण पाहतो आंब्याला संत्र्याचा स्वाद येत नाही,,,संत्र्याला केळीचा स्वाद येत नाही,,,प्रत्येक फळाने आपला धर्म सोडला नाही,,,पक्षांनी आपला धर्म सोडला नाही,,जनावरांमध्ये वाघांचा आवाज कधीही मांजरीला येत नाही,,,कुत्रा मांजरीसारखा ओरडत नाही,,,ज्याचा त्याचा स्वतः चा आवाज रंग रूप स्वाद आहे तो कधीही बदलत नाही,,,जे निसर्गात सहज शक्य होते ते मानवी समाजात का घडू नये,,,गीते मध्ये म्हटले आहे ,,,‘‘‘परधर्म भयावह,,,‘‘‘‘म्हणजे काय,,,,,जसे गुलाबाला मोगऱ्याचा धर्म नाही

जमणार,,,,अग्नी हा शीतल झाला तर त्याला अग्नी म्हणता येणार नाही,,,साखर तिखट झाली तर तिला साखर म्हणता येणार नाही,,,ज्या ज्या गोष्टींमुळे माझे अस्तित्व सिद्ध होते ती गोष्ट जमणे शक्य नाही,,,तिथे अस्तित्वच राहत नाही,,,म्हणून परधर्म भयावह आहे,,,मानवाला मानावत्व प्राप्त करून देणारी जी गुण समुच्चय आहे ,जी मूल्य आहेत ती सोडून जर माणूस वागत असेल तर त्याच्या जीवनाची हानी आहे,,शांतता,प्रेम,सहिष्णुता,, सत्य,अहिंसा,थोडक्यात सत्य शिव सुंदर हि जीवन मूल्य आहेत ,,,सत्य हे बौद्धिक स्तरावरील,,,,शिव हे शारीरिक स्तरावरील,,,सौदर्य हे भावनिक स्तरावरील मूल्य आहे,,,शारीरिक मानसिक भावनिक स्तरावरील मूल्य आपल्या आचरणात आणून आपला अध्यात्मिक क्रमविकास करणे म्हणजे माणूस,,,ह्यालाच मानवता असे म्हणतात,,,ह्याच मूळ वासनांचे गाठोडे घेऊन माणूस जन्माला येत असतो,,आणि ह्या वासनांचे उन्नयन करणे म्हणजे धर्माचरण आहे,,,आम्ही ज्या धर्म कल्पना मांडतो त्यात म्हणूनच आम्हाला सार्वभौम तत्व दिसतात कारण ते सगळे मानवता ,सहिष्णुता, शांती ,प्रेम,शिकवितात,,,मानवाला जीवनाचे ध्येय देतात,,जीवन समृद्ध बनवितात,,,म्हणूनच आपणही वैश्विक असायला हवे,,स्वामी चिन्मयनंदांचे हे विचार माझ्या प्रत्येक प्रशिक्षणार्थींना पटले,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,हे सर्व ऐकत असताना सर्वांच्या चेहऱ्यावर एक वेगळेच समाधान होते,,,धर्म संकल्पना आचार परमो धर्म:हे त्यांना पटले होते,,,मानवता धर्माचा आशय त्यांना पटला होता,,,माझी सर्वधर्म परिषद यशस्वी झाली होती ,,,,मी खूप समाधानाने वर्गाच्या बाहेर गेले.

१०

# तिरस्कार

काल माझ्या एका मैत्रिणीचा फोन आला,,,,आणि मला तो खूपच अंतर्मुख करून गेला,,फोन वरील संभाषणात ती मला म्हणाली कि,,,''सर्वांवर प्रेम करणारी तू,,,मला नेहमी म्हणायची कि जेव्हा माझा अंतिम क्षण येईल तेव्हा माझा तिरस्कार करणारे माझा राग करणारे कुणीही ह्या जगात नसावे,,,,,आणि माझ्याही मनात कुणाबद्दल राग तिरस्कार नसावा,,,,,आणि त्यासाठी तू सतत प्रयत्नशील असतेस'हे अगदी खरंय,,,,मला नेहमी अस वाटते आणि हि बाब मी माझ्या विद्यार्थ्यांपर्यंत जे होणारे शिक्षक आहेत त्यांच्या पर्यंतहि पोचवत असते,,,,,कुणाचेही मन माझ्याकडून दुखावल्या जाणार नाही ह्यासाठी मी प्रयत्नशील असतेच,,,,तिचे पुढील वाक्य मात्र मला धक्कादायक होते,,,'''ह्या जगात तुझा तिरस्कार करणारी केवळ एकाच व्यक्ती नाही तर पूर्ण कुटुंब आहे''''क्षणभर धक्का बसला ,,,,पण पुन्हा विचार मनात आला कि सर्वांनी माझ्यावर प्रेम करावे असे मला वाटते,,,,पण माझी कृती प्रत्येकाला आवडेलच असे नाही,,,,सर्वांनी मला चांगले म्हणावे असा मी अट्टाहास का करावा ? माझा किती जण तिरस्कार करतात ह्यापेक्षा मला वाटत कि मी किती जणांचा तिरस्कार करते हे माझ्या जीवनासाठी आवश्यक आहे,,,असे प्रसंग तर आयुष्यात येणार आहेच,,,कुणी मला चांगले म्हणेल कुणी वाईट म्हणेल,,,,पण माझा रास्ता जर मला माहित असेल तर ह्या घडणाऱ्या घटनांचा माझ्यावर परिणाम व्हायला नको,,,,,असं म्हणतात जीवनाच्या चांगल्या वाईट प्रसंगा मध्ये आपल्या साधनेची कस लागते,,,आपण जीवनभर ज्या विचारावर साधना केली त्या साधनेची परीक्षा पाहण्याचे क्षण जीवनात येण हि परमेश्वराची योजना असते,,,आपण जीवनभर ज्या विचारांच्या सहवासात असतो ते विचार आपले जीवन बनतात,,,संतांच्या सान्निध्यात राहिलो तर सद्विचार स्थापित होतात,,,,विषयांच्या

सान्निध्यात राहिलो तर शड्रिपू आपल्यात स्थापित होतील,,,,हे सर्व आपल्यावर अवलंबून असते,,,माझ्या जीवनातील प्रत्येक घटनेला मग ती चांगली असो अथवा वाईट त्या सर्व माझ्याच कर्माच्या परिपाक असतात,,,,मग माझा कुणी राग करेल द्वेष करेल तिरस्कार करेल हा माझ्याच कर्माचा प्रतिध्वनी आहे हा निश्चय झाला कि मग राग कुणाचा करायचा,,,,स्वतःचा ?ते कुणालाही शक्य नाही,,,समर्थानी म्हटले आहे,,,,मन श्रेष्ठ धारिष्ट्य जीवी धरावे,,,,,मना बोलणे नित सोशीत जावे,,,,,,स्वये सर्वदा नम्र वाचे वदावे,,,,,,,मना सर्व लोकांशी रे निववावे,,,,,,ह्या श्लोकाचा अर्थ खऱ्या अर्थाने आज कळतेय,,,इतरांचा राग द्वेष तिरस्कार सहन करण्यासाठी खूप धैर्य लागत,,,,विशेषतः आपल्या प्रेमाच्या लोकांच्या बाबतीत,,,जीवलगांच्या बाबतीत तर खूपच कठीण,,,,हे धैर्य आपल्या अंगी येणे अत्यंत आवश्यक आहे नाहीतर जीवन जगणे कठीण होऊन जाईल,,,हे धैर्य तेव्हाच येईल जेव्हा इतर कुणीही अगदी प्रेमाच्या लोकांनी जरी माझा अपमान केला तरी त्यांच्या बद्दल माझ्या मनात राग येत नसेल आणि त्यांच्याही बाबतीत मी क्षमाशील बनत असेल तर माझी साधना योग्य दिशेला आहे,,,त्याच्या प्रति मी सहृदत भाव मनात कायम राहत असेल, माझ्या मनाची शांतता ढळत नसेल,त्यांच्याहीबद्दल क्षमाशील भाव माझ्यात येत असेल,ह्याही अवस्थेत माझा आनंद ढळत नसेल तर मी योग्य मार्गाने जात आहे,,,,माझ्या मनाचा वसंत ऋतू हा कायम फुललेला असायला हवा

मग ऊन असो व वारा पाऊस,,,,सर्व परिस्थितीत मनाचा आनंद कायम टिकायला हवा,,,पण प्रत्यक्षात तसे घडत नाही आणि माझ्या मनाचे रिमोट कंट्रोल मी इतरांच्या हातात देतो आणि मग घडणाऱ्या छोट्या छोट्या प्रसंगाने कोलमडून जातो,,,ह्या बाबतीत मला माझ्या बागेतली सदाफुली सतत मार्गदर्शन करीत असते,,,तिला मी कधीच

कोमेजलेली नाही बघितलं,,,कायम फुललेली,,,वसंत असो कि ग्रीष्म तिला काहीही फरक पडत नाही,,,,तिचा उपयोग कुणी देवकरिता करीत नाही,,,कुणी स्त्री तिच्या डोक्यात सदाफुलीचा गजरा मळत नाही,,,,सदाफुलीला सुगंध नाही,,,रूपही बेताचीच,,,,माळी येतो तो हि तिच्याकडे विशेष लक्ष देत नाही,,,खत पाणी कुंपण काहीही नाही,,,,कुणालाही ती विशेष आवडत पण नाही,,,जास्त वाढली तर तिला उखडून फेकून दिल्या जाते,,,पण सदाफुली कुणालाही तक्रार करीत नाही,,,तिला फक्त फुलणे माहित आहे ,,,,अगदी वर्षभर,,,,हाच नियम स्वत:ला लावता आला तर,,,काही फरक पडत नाही कोण माझ्याबद्दल काय बोलतं,,, कोण माझा तिरस्कार करतय,,, कोण मला वाईट म्हणताय,,,,ह्या सर्वांचा त्रास माझ्यापेक्षाही माझा तिरस्कार करणाऱ्याला अधिक होतो,,,कारण विचारांचे तरंग त्याच्या मनात आधी उठतात आणि त्याचा मनाचा ताबा घेतात,,,,त्याच क्षणी मी मात्र आनंदात असते,,,,कारण माझ्या मनात हे तरंग उमटले नसतात आणि ते उमटू द्यायचे कि नाही हे माझ्याच हातात असते,,,,कारण माझ्या मनाचे रिमोट कंट्रोल माझ्याच हातात आहे आणि मला आनंद देणाऱ्याच गोष्टी मला आवडतात,,,हा भाव दृढ झाला कि ,,,कोई वंदो,,,,,कोई निंदो,,, कोई कैसे काहो रे,,,,जब राम साथे प्रीत बांधी,,,, होय जैसे होय रे,,,,हा भाव जागृत होतो,,,माझा राग तिरस्कार करणाऱ्याला जर माझ्या मुळे आनंदाची प्राप्ती होते तर मला तेही मान्य असावे,,,आपल्या जीवनात सर्व लोकांना माफ करीत राहावे,,,त्यांच्या कल्याणाची प्रार्थना करीत राहावी,,,आपण आपला हा आनंद मिळवावा,,,,,हे सर्व चिंतन मनाला विचारांना पर्यायाने जीवनाला वेगळी दिशा देते आणि जीवनाला उंची प्राप्त करून देणारे ठरतात,,,,,आता माझ्या मनात भय नाही,,,मी खरच निर्भय बनले,,,आता माझ्या अंतिम क्षणी माझ्या मनात

कोणाबद्दलही राग नसेल,द्वेष नसेल,,,कुणाचाही तिरस्कार नसेल,,,सर्वांप्रति प्रेम आदर,आणि आनंद ,,,,,ह्या सर्वां ने माझे जीवन भारावलेले असेल,,,,माझ्या मैत्रिणीला मी हे सर्व कळविले खूप काळजीत होती माझ्याबद्दल ती तिची काळजी मी समजत होते,,,पण आता तीही नि:शंक आहे,,,,,,,,तिरस्कार करणार्यांनो तिरस्कार करा ,,,द्वेष करा राग करा,,अगदी करावासा वाटला न तर आणखी अपमानही करा,,,,खूपच राग आला तर माझ्यावर बहिष्कारही टका,,,,,,,पणमाझ्याकडून प्रतिध्वनी असेल फक्त आणि फक्त आनंद.



११

# वृद्धाश्रमातील एकभेट

काल माझ्या सर्व विद्यार्थ्यांसोबत मी वृद्धाश्रमात गेले होते,आम्ही येणार म्हणून सर्व तेथील वृद्धमध्ये एक प्रकारची उत्सुकता होती,,माझ्याही विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता होती,,तेथे गेल्यावर कोणकोणते कार्यक्रम करायचे सगळी यादी तयार झाली,,,तेथील अजीआजोबांशी काय बोलायचे त्यांची मुलाखत कशी घ्यायची त्यांना काय द्यायचे,,,सगळे नियोजन झाले,,,तेथे गेल्यावर खूप विचार माझ्या मनात आले,, माझ्यातील संवेदनशील शिक्षक जागा झाला,,,पहिला विचार आला तो हा कि एक काळ होता जेव्हा आईवडिलांना घरात मान सन्मान होता,सर्व कुटुंबाचा ते खांब होते मजबूत,,,काय घडलं असेल की ह्या आईवडिलांना येथे यावे लागले? वृद्धाश्रमाची अवस्था बघितल्यावर जीव अक्षरश: कासावीस झाला,,जुनाट खोल्या,,खिडक्यांना दारे नाहीत,,काळया भिंती,,स्वच्छतेचा अभाव,,,अजीआजोबांना मिळणारे एक वेळचे जेवण,,,खोल्यामध्ये जुनाट गाठोडे,,,डोळयातील करूण भाव,,,जीवनाचे वाटणारे ओझे,,नात्या वरील उडालेला विश्वास,,,जगापासून दूर,,, जीवलगांची वाट पाहता पाहता थकलेले त्यांचे डोळे,,थार्थरणारे हात जे आशीर्वाद देण्यासाठी आसुसले होते,,,येईल तो दिवस श्वास संपेपर्यंत घालवायचा,,,आयुष्याची संध्याकाळ जी त्यांच्या वाटेला आली आहे तिअसह्य करणारी,,,प्रत्येक आजी आजोबांच्या पलंगाखाली मला गाठोडे दिसले,,,काय असेल त्या गाठोड्यात,,,,त्यांच्या जीवनातील सगळया आठवणी,,,सुवर्णकाळ,,,,मुलांचे बालपण ,त्यांच्या साठी केलेले कष्ट,,,त्यांच्या सुखासाठी केलेली प्रार्थना,,,आज जेव्हाही त्यांना आठवण येते तेव्हा ते गाठोडं सोडायचं आणि आपल्या आयुष्यातील क्षण आठवायचे,,,ते गाठोडी आता मळकी झालीयेत,,,,सकाळी

मिळालेल्या अन्नातून एक पोळी काढून ठेवायची ती रात्री पाण्यात भिजवून खायची,,,ज्या वयात खूप छान छान खावेसे वाटते त्या वयात हि अवस्था,,,मुले लहान असताना ह्याच माउलीने त्याच्यासाठी किती आवडीचे पदार्थ आनंदाने केले असतील,,,,बाबांनी आपले पैसे बाजूला टाकून आपल्या मुलांचे लाड पुरविले असतील,,,,त्यांना त्यांच्या तरुणपणी किती मन मारावे लागले असेल,,,,आज त्यांच्याच मुलांनी हि वेळ त्यांच्यावर आणली,,,,काय करावे,,,आम्ही एका आजी जवळ गेलो,,,पायातील ताकद गेलेली,,आणि हाताला फ्रॅक्चर झालेले,,अशी असहाय आई पाहिली,,,मुले श्रीमंत आहेत पण वडिलांना ठेवायला तयार नाही,,औषधासाठी पैसे मागताना त्यांची लाचारी मला स्वस्थ बसू देत नव्हती,,,,एका आईचा अंगावर अंग झाकण्यापूरते हि वस्त्र नव्हते,,,तिला माझ्या अंगावरची ओढणी दिल्यावर ती माउली मला म्हणाली ,बेटा तुझ्या अंगावर काय घेशील ?अजून तुला घरी जायचे आहे,,,माझा संयमाचा बांध फुटला,,,श्रीरामा तू ह्याही रूपात असावं? आयुष्यभर आपल्या मुलीची लाज झाकणारी माय आज उघडी आहे,,,आणि तरीही तिला दुसऱ्या स्त्रीच्या अंग झाकण्याचा काळजी,,,किती हा विरोधाभास,,,,आज जग कुठे चाललंय,,,, आकाशाशी नाते जोडणारे ह्या जगाने खरंच मानावतेशी नाते तोडले आहे का ? स्मार्ट युगात वावरत असताना माझे अनेक आई बाबा अशा अवस्थेत आहेत,,,आम्ही खरंच यंत्र युगात वावरताना यांत्रिक झालो ?आमच्या भावना यांत्रिक झाल्या ? आई बाबा हे घराचं वैभव असत हे आम्ही विसरलो? शिक्षणाने इतक्या संवेदना बोथट होतात ? खरेतर वृद्धाश्रम कोणताही असो त्याची गरजच का भासावी ? आईबाबांना मुले जड नाही होत पण मुलांना आईबाबा जड व्हावेत,? किती दुर्दैव,,,,कायदे कितीही आणा ,,,परिस्थिती नाही बदलणार,,,मानसिकता बद्दलवावी लागेल,,,आता आईबाबा अनाथ व्हायला नको,,त्यांची

आयुष्याची संध्याकाळ अशी अंधारात जायला नको,,,अनाथ मुलांची दत्तक योजना आहे,,,अनाथ आईबाबांच्या दत्तक योजना ठेवा न,,,,त्यांना त्यांच्या हक्काची माणसे हवी आहेत,,,त्यांना मायचा स्पर्श हवा आहे,,,एका आईच्या डोक्यावरून जेव्हा मी हात फिरवत होते तेव्हा तिने नुसते डोळे मिटून घेतले होते,,,डोळ्यात अश्रू धारा वाहत होत्या,,,तो स्पर्श ती मनात साठवून घेत होती,,,,लहानपणी आपल्याला आईचा स्पर्श हवा असतो अगदी तसाच आईबाबांना म्हातारपणी आपला स्पर्श हवा असतो,,,ती आश्वासक ऊब हवी असते,,,त्यांच्या म्हातारपणी आपण त्यांचे आईबाबा व्हायला हवे,,,आईच्या कुशीत जसे आपले बालपण निश्चिन्त असते तसे आपल्या कुशीत आपल्या आईबाबांच्या म्हातारपण निश्चिन्त नको,,,समाजात हि संवेदना कधी जागृत होईल,,,,,माझे समाजातील अनेक आईबाबांना हक्काचे घर मिळेल,,,,आम्ही सर्वांनी माझ्या विद्यार्थ्यांनी ह्या सगळ्या बाबी खूप जवळून बघितल्या,,माझ्या प्रत्येक मुलाचा मुलींच्या डोळ्यात अश्रू होते,,,प्रत्येक मुलांनी माझ्या आईबाबांना सासुसासर्यांना अनाथ करणार नाही असे अभिवाचन दिले,,,माझ्या प्रत्येक मुलीने मी माझ्या आईबाबांना सासुसासर्यांना अनाथ होऊ देणार नाही आणि हे संस्कार आम्ही ज्या शाळेत शिक्षक होवु तेथे नेऊ,,,आमच्या आजूबाजूला आम्ही असे घडू देणार नाही,,,मला माझ्या मुलामुलींचा खूप अभिमान वाटला,,मी संपूर्ण जगात प्रकाश पसरवू शकली नाही पण एक छोटीशी ज्योत माझ्या मुलांच्या मनात जगवू शकली,,,पावलापूरता प्रकाश त्यांना मिळाला,,,त्यांच्या वाटचालीबद्दल मी निश्चिन्त झाले,,,माझ्या अनेक आईबाबांच्या भविष्य सुरक्षित होईल हि अशा मनात जागवली..

१२

# Be bold for change


जागतिक महिला दिन,,दरवर्षीह्या करीता एक theme ठरविली जाते ,ह्या वर्षी theme आहे ,, Be bold for change ह्या विषयावर अकोला येथील महावितरण कार्यालयात मला वक्ता म्हणून बोलविले,,मुळातच संशोधकांची दृष्टी असल्याने मी माझ्या काही विद्यार्थिनींना बोलाविले व त्यांना काही प्रश्न दिले,,,प्रश्न होते की परिवर्तन म्हणजे काय ? कोणत्या परिवर्तनासाठी आपल्याला बोल्ड व्हायचे आहे ? तुम्हाला कोणते परिवर्तन हवे आहे ?ह्या परिवर्तनासाठी तुम्ही स्वतः ला कसे तयार कराल ? मला जी उत्तरे मिळाली ती खूपच धक्कादायक होती,,,काही मुलींनी सांगितले की आम्ही मुळातच परिवर्तनाच्या काळात वावरतो आहोत,,कारण आम्ही पुरुषी वर्चस्व झुगारलें आहे,,आम्ही पेहराव बद्दलविला,,आम्ही पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करणार,,,आम्ही स्त्री पुरुष हा भेदाच करीत नाही,,,आम्हाला सामान संधी हवी,,असे अनेक विधाने,,,वरवर पाहता हि विधाने सर्व बरोबर होती,,,पण मी मात्र विचारात पडले आणि माझ्या मुलींना विचारले की हे सर्व तुम्ही करणार पण ह्यासाठी तुमची तुमच्या जवळ योजना आहे का ? प्रति प्रश्न झाला म्हणजे काय,,?,आता मात्र मी अचंबित झाले,,मग मी त्यांच्याशी मनमोकळी चर्चा केली,,,मुलांसारखे कपडे घालणे म्हणजे परिवर्तन असेल तर स्त्री दक्षिण्याची अपेक्षा का ?वागा मुलासारखे काय हरकत आहे? पण तुम्ही self defence करू शकता ? पुरुषी वर्चस्व नाकारायचे आहे मग स्वतः पेक्षा कमी शिकलेल्या मुलाशी लग्न कराल ? पुरुषी वर्चस्व नाकारायचे म्हणजे काय ? समस्त पुरुष जातीच्या विरोधात जायचे?ज्योतिबा फुले होते म्हणून सावित्री घडली,न्यायमूर्ती रानडे होते म्हणून रमाबाई घडली,,एका यशस्वी पुरुषाच्या मागे स्त्री असते तर यशस्वी स्त्री च्या मागे कोण?स्त्री पुरुष समाज रथाची चाके

आहेत ते समसमान नको ? पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करायचे म्हणजे काय,,आज ज्या ज्या क्षेत्रात पुरुषांची मक्तेदारी होती ती ती क्षेत्र स्त्रियांनी काबीज केलेलीच आहे उलट पक्षी अजून पुनरुत्पादनाची क्षमता जी स्त्री मध्ये आहे ती पुरुषात नाही ह्या दृष्टीने स्त्री स्रेष्ठ आहेच,,,आपण लहानपणापासून मुलींना हे कर ते करू नको सांगतो,,,हीच गोष्ट मुलांना का नाही सांगायची ?ह्या विद्यार्थिनींच्या प्रश्नाने मात्र मला खरंच नि:शब्द केले,,,बरोबर आहे माझ्या समाजात कुटुंबात शिक्षणात हे तर कधीच शिकविल्या गेले नाही,,,स्त्री कडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा असावा ह्यापेक्षा स्त्रीत्वाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा असावा हे माझ्या मुलांना मी कधी शिकवायचे ? आज आई म्हणून बाबा म्हणून मी सतत माझ्या मुलीवर बंधने घालते,,एका लोकशाही राष्ट्रात हे व्यक्ती स्वातंत्र्यावर बंधन आहे असे वाटेल कदाचित,,,पण एक स्त्री म्हणून आईला व पुरुष म्हणून वडिलांना माहित आहे की वस्त्र आणि स्त्री ह्याचे नाते काय असावे,,,,पण हे मुलांनाही शिकविण्याची गरज आहे,,,माझ्या देशात एक काळ असा होता जेव्हा स्त्री ला प्रतिष्ठा प्राप्त होती,,मातृसत्ताक कुटुंब आणि मातृप्रधान समाज होता,,,पण समाज परिवर्तन झाले आणि पुरुषप्रधान संस्कृतीने हि जागा घेतली,,आदिम काळात स्त्री ला प्रतिष्ठा होती कारण सर्व आघाड्या स्त्री सांभाळत होती,,ती शेती करीत होती,,ती बाजारपेठ सांभाळत होती,,,ती संपत्ती खरेदी करीत होती,,,ती निर्णय घेत होती ,,,ती विनिमय करीत होती,,,ती हस्तव्यवसाय करीत होती,,,ती उत्तम माता होती,,,ती उत्तम गृहिनीही होती,,,हे सर्व होत असताना तिला समाजात प्रतिष्ठाही होती,,,पण पुढे ह्या सर्वांचे रूपांतरण पुरुषप्रधान संस्कृतीत होत गेले,,,पण आज आपल्याला पुन्हा समाज परिवर्तन हवे आहे आपल्याला काय करावे लागेल ? लगेच माझ्या विद्यार्थिनींच्या उत्तर होते 'मॅडम ज्या ज्या गोष्टीने आदिम काळात स्त्री ला प्रतिष्ठा प्राप्त होती ते सर्व पुन्हा समाजात

रुजवावे लागेल,,फक्त युगानुकूल त्याचे संदर्भ परिभाषा बदलतील,,मुळातच आपली निसर्गदत्त भूमिका सोडून स्त्रीचा विकास नाही होणार,,,स्त्रीच्या विकासासाठी पुरुषांचेही सहकार्य लागेल,,सहभाग लागेल,,,आणि महत्वाचे कि ह्या सर्वासाठी शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रीत्वाकडे पाहण्याची भूमिका बदलावी लागेल,,,मग कोणतेही पेहरावांचा परिणाम होणार नाही ह्यासाठी काही काळ जाऊ द्यावा लागेल ,,तो पर्यंत स्त्रीचा कस लागेल,,,कदाचित व्यक्ती स्वातंत्र्यावर घाला पण होईल पण तो फारच तात्कालिक असेल,,,पण निश्चित पणे येणार काळ आमचा असेल ,,,स्त्री शक्ती मातृ शक्ती आहे,,,,हि मातृशक्ती समाज परिवर्तन घडवून आणेल,,, अशा परिवर्तनासाठी आम्हाला सिद्ध व्हायचे आहे,,,,एक शिक्षिका म्हणून मला खूप समाधान झाले,,,माझी मुलगी सुरक्षित होईल कारण तिने समस्त समाजाचा स्त्रीत्वाकडे बघण्याचा दृष्टिकोन बद्दलविण्याचे मान्य केले आहे.



## १३ आधुनिक भारताचे निर्माता,,डॉ हेडगेवार




सन १८८९,,१ एप्रिल,,प्रतिपदा,,,अर्थात गुडीपाडवा,,, सकाळीच भारत मातेला एक सुंदर स्वप्न दिसले,,छत्रपती शिवराया नंतर हिंदू धर्माचा तारणहार ह्या मातृभूमित जन्म घेतोय,,त्याच्या हाती भगवा ध्वज आहे,,जो राष्ट्रीय अस्मिता सांस्कृतिक परंपरेचा आणि वैभवशाली इतिहासाचा प्रतीक आहे,ज्यावेळी संपूर्ण महाराष्ट्रात गुढी उभारली जात होती,,भगवा ध्वज उभारला जात होता त्याचवेळी पुन्हा एकदा गीते मध्ये भगवंताने दिलेले अभिवाचन पूर्ण करण्याची वेळ येऊन ठेपली होती,,,भगवंताने वचन दिले आहे जेव्हा जेव्हा ह्या पृथ्वीवर अधर्म माजेल धर्माला ग्लानी येईल ,मतं मतांचा गलबला वाढेल तेव्हा तेव्हा मी ह्या पृथ्वीवर जन्म घेईल,,आणि ती वेळ आणि,,भारत माता सुखावली,,तिच्या पोटी आज एक अलौकिक बाळ जन्माला आले होते,,,,,,नागपूर येथील एका गरीब ब्राह्मण कुटुंबात बळीराम पंत हेडगेवार ह्यांच्या घरात हे बालक जन्माला आले,नावही केशव,,आपले नाव सार्थ करणारे हे बालक आपले व्यक्तित्व कृतीत्व संकल्प आणि साधना शुद्ध संस्कार चारित्र्य चिंतन शिलता अशा विविध गुणांचे प्रतिनिधित्व करणारे हे बालक,,, आधुनिक भारताचा पाया त्यांच्या जन्माच्या वेळीच रोवला गेला,,,नवीन सृजन नवीन संगठण, नवी रचना ,प्रखर राष्ट्रवाद,हि सर्व भारत मातेच्या उज्ज्वल इतिहासाची योजना होती असे म्हटल्यास वावगे होणार नाही,,अवघ्या ५१ वर्षाच्या आपल्या जीवन काळात अतिशय संघर्ष मग तो कौटुंबिक जीवनातील असो की सामाजिक

किंवा राष्ट्रीय हे पेलण्याची मजबूत खांदे व बाहू प्राप्त झालेले डॉ केशव बळीराम पंत हेडगेवार अत्यंत प्रसिद्धी पासून दूर,,,असा असे म्हटले जाते की शेकडो वर्षे आधी आद्य शंकराचार्य ह्यांनी हेडगेवार कुळातील व्यक्तीला धर्मसरक्षक म्हणून नेमले होते,,,धर्म संरक्षणाचा हा वारसा डॉ ना लाभला होता नव्हे तो त्यांच्या रक्तातच होता,,डॉ चे पूर्वज नागपूरला स्थायिक झाले कारण हैद्राबाद येथील निजामाचे शासन ज्यात धार्मिक भेदभाव होता,,डॉ च्या पूर्वजश्री नरहर शास्त्री ह्यांनी आपली शास्त्र परंपरा कायम राखण्यासाठी कुंडकुर्ती हे गाव सोडून नागपूर येथे स्थायी झाले,,आर्थिक दृष्ट्या जरी कौटुंबिक परिस्थिती नाजूक असली तरी कुटुंबाला अध्यात्मिक वारसा होता,,अध्यात्मिक ऐश्वर्य होते,,,

फार पूर्वी हेडगेवार कुटुंबाला राजाश्रय पण होता,पण१८५३ मध्ये नागपूर मधील भोसले शासन संपुष्टात आले आणि इंग्रजांचे राज्य स्थापित झाले,,,राजाश्रय संपुष्टात आल्यावर पौरोहित्य करण्याचा एकाच विकल्प होता,,त्यात दुष्काळी स्थिती,,,कुटुंबाची परिस्थिती अत्यंत खालावली,,,बंधू महादेव शास्त्री ह्यांच्या विचारांचा व व्यक्तिमत्वाचा प्रभाव डॉ वर अधिक जाणवतो, मल्ल युद्ध कला,संस्कृती प्रेम,शिस्तप्रियता,इ बाबी चे संस्कार महादेव शास्त्री ह्यांच्याकडून मिळाले,,,कलकत्ता येथून मेडिकल डिग्री प्राप्त झाल्यावर त्यांनाही चांगला पैसे कमावता आला असता पण त्यांच्या मधील मातृभूमी प्रेमाने त्यांना अत्यंत नि:स्वार्थी बनविले,मेडिकल ला असतानाच त्यांच्यात क्रांतीचे बीजारोपण झाले,,अनुशीलन समितीचे सदस्य ते हिंदू महासभा बंगाल चे उपाध्यक्ष हा त्यांचा प्रवास त्यांच्या नेतृत्व गुणांची ग्वाही देतो,,,२७ सप्टेंबर१९२५ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्थापना विजयादशमी चा शुभ दिवस,,,शक्तीची आराधना,,दुर्जनांचा नाश व सज्जनांच्या विजय,,आणि ह्याच दिवशी पुन्हा एकदा हिंदू राष्ट्राच्या पुनरुट्ठानाची घोषणा झाली,जातीच्या

नावावर विघटित झालेला हिंदू समाज एकत्र आणणे,भारताची संस्कृतीचे अध्यात्मिक परंपरेचे जागरण करणे,हिंदुत्वाची ओळख संपूर्ण जगाला देणे,किती उदात्त विचार आहे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेची,,,,ह्या देशात राहणारा कोणत्याही जातीचा असो धर्माचा असो तो हिंदूच आहे,भारताला सांस्कृतिक दृष्टिकोनातून वैभवशाली बनविणे हे संघाचे कार्य,,,संघ कुणालाही विरोध करीत नाही प्रत्येकासाठी संघाचे दरवाजे खुले आहे,,,,संघ राष्ट्र हितासाठी आहे,,,संघात कार्य करणारा स्वयंसेवक असतो हा स्वयंसेवक संघाची बुनियाद आहे,,,हिंदुत्व म्हणजे जो स्वतः ला हिंदू समजतो तो हिंदू,,,जो स्वतः ला मानव समजतो तो हिंदू,,,अशी एक छान परिभाषा त्यांनी केली,,,संघ हि विचार धारा आहे ,,,जो जसा आहे त्याला तसे स्वीकारून त्याला जसे घडायचे आहे तसे घडविणे,,,,दिव्यानेच दिवा लावायचा आहे,,,एक लक्ष्य एक विचार ,एक आचार,एकाच कार्य सातत्याने करणे आणि त्याचे अधिष्ठान राष्ट्र हित असणे हे संघ कार्य आहे,,,,किती उदात्त विचार धारा,,,,संघाला सत्ता कांक्षा नाही,,,संघ फक्त राष्ट्र हिताचेच कार्य करेल अशी अपार राष्ट्र प्रेम९ जून १९४० ,,,सकाळची वेळ,,,व्याधींनी ग्रासले असतानाही मानाचं प्रसन्नता न घालविता त्यांनी स्वयंसेवकांना सल्ला दिला नव्हे महामंत्र दिला'जाब भारत संघमय बानेगा तब कोई भी देश असे टेढी नजर से नही देख पायेगा,,,सभी समस्याये अपने आप नष्ट हो जयेगी,,,,भगवंतांनी दिलेले वचन पाळले,,,राष्ट्राला सुदृढ बनविणे,,हिंदू समाज संघटित करणे,,धर्मातील दांभिकता दूर करणे,सहयोग भावना निर्माण करणे,,मानवाचा एकात्मिक विकास,,,संस्कृती संरक्षण संवर्धन चारित्र्य निर्माण ,राष्ट्रीय अस्मितेचे संरक्षण अशा विविध तत्वाशी संघ कटिबद्ध आहे,,संघ एक विशाल कुटुंब आहे हे संघटन नाही,संघ हा विचार आहे संघ हाच आचार आहे,,असे युगप्रवर्तक डॉ केशव बळीरामपंत हेडगेवार ह्यांच्या

कार्याला शातशः वंदन,,,हम करे राष्ट्र आराधन,,तन मन धन जि० न से,,,,आज भारतात धर्मावरून प्रचंड मत भेद आहेत,,विविध धर्मामध्ये स्रेष्ठ कानिष्ठतेचे वाद आहेत,,अशा काळात हिंदुत्व हीच भारताची ओळख आहे,,हिंदुत्व हा राष्ट्राचा प्राण आहे,,असे हिंदुत्व जे जात धर्म संप्रदाय ह्याच्या पलीकडे जाऊन मानवाचा मानव म्हणून स्वीकार करते,vasudhaiv kutumbkam हि धारणा निर्माण करते,,विश्व बंधुत्वाची भावना निर्माण करते,,असे विचार समाजात रुजवून एका नवीन समाजाची संस्थापना करणारे डॉ हेडगेवार हे आधुनिक भारताचे निर्माते आहेत



# १४ शिक्षण म्हणजे काय

आज एका विद्यार्थ्याने मला प्रश्न केला की मॅडम मी पोस्ट graduate आहे,पण नेमके शिक्षण म्हणजे काय? त्याच्या ह्या प्रश्नाने मी खूप अस्वस्थ झाले,,,शिक्षण शास्त्र विषयात पदवी मिळवण्याकरिता आलेला माझा विद्यार्थी त्याला शिक्षण म्हणजे काय हे माहित नाही ? ह्याची महत्वाचे कारण कि तो शिक्षण घेतो आहे म्हणजे काय करतो आहे हे त्याला आजवर कुणीच सांगितलेलं नाही,,,घरी कुटुंबात कुणीच सांगितले नाही,समाजात सांगितले नाही,शाळेत नाही,,त्यामुळे मी शिक्षण घेतो आहे म्हणजे काय करतो आहे हे त्याला माहित नाही,,,,मी त्याला विचारले की तू जर शिक्षण घेतले आहे तर तूच सांग तू काय केले आणि कशासाठी ? त्याचे उत्तर ऐकून मी खूप विचारात पडले,,,त्याचे उत्तर होते की मी शिक्षण घेतले मी पदवी मिळवली,ह्या पदवीच्या आधारे मी नोकरी मिळवेन,,,पैसे कामवेन,,,, असा सगळा आमच्या दोघांचा संवाद सुरु होता त्याच वेळी इतरही विद्यार्थी त्या चर्चेत सहभागी झालेत,,,आणि सर्वांनी शिक्षणाचा अर्थ सांगायला सुरुवात केली,,,त्याचा सगळ्याचा आशय होता की शाळेत जाणे,,पुस्तकांचा दिलेल्या अभ्यासक्रमानुसार अभ्यास करणे,,,पदवी संपादन करणे,,,,ह्या सगळ्या चर्चे मध्ये खूप काही निसटत आहे हे माझ्या लक्षात आले,,,पण मी त्यांना दोष देऊ शकत नाही,,कारण माझ्या शिक्षण प्रणालीने मेकॉले च्या काळापासून मला हेच शिकवले आहे ,,,,,नोकरी करीता डोके तयार करायचे,,,हेच मी पण शिकले,,,,आजही मी काही मुलांना विचारते काय शिकणार ?उत्तर मिळत‘ज्या शिक्षणाने मला चांगले पॅकेज मिळणार ते शिक्षण मी घेईन,,,मला डॉक्टर व्हायचंय इंजिनिअर व्हायचंय,परदेशात जायचे आहे,,, ‘हि उत्तरे ऐकली कि खूप वाईट वाटत,,,आज भारतात मनुष्य बळ कमी नाही नोकऱ्याही कमी नाही ,,पण ह्या दोघांचा

ताळमेळ बसत नाही,,कारण विद्यार्थी म्हणून मला काय हवंय हे ठरविण्याचे स्वतंत्र मला नाही,,,माझ्यातील अंगभूत कौशल्याचा विकास मला प्राथमिक स्तरापासून करण्याचे स्वतंत्र शिक्षण पद्धतीने मला दिले नाही,,,माझ्यातील कौशल्य वेगळी आणि मी शिक्षण घेते नोकरी साठी ,,,,कसा बसावं ताळमेळ ? मला नेहमी असं वाटते की भारतात कितीतरी कला उगम पावल्या ,कलांचा विकास झाला,,ह्या कलांचा प्राथमिक स्तरापासून अभ्यासक्रम का तयार होऊ शकला नाही ? माझा मुलगा उत्तम गातो मग त्याला प्राथमिक स्तरापासून अगदी उच्च शिक्षण संशोधन गायनात करता येईल?विदेशी कलेच्या बाबतीत म्हणावं तर माझा मुलगा जर क्रिकेट चांगला खेळात असेल तर त्याला प्राथमिक वर्गापासून केवळ क्रिकेट चे शास्त्रशुद्ध शिक्षण घेऊन त्यातच करिअर करण्याचे स्वातंत्र्य आहे का ? खेळाडुकरिता जास्तीचे गुण आहेत पण अंगीभूत असणाऱ्या गुणांचा परिपूर्ण विकास करून त्यायोगे आपल्या मनाला जीवनाला आकार देणे ही शिक्षणाची संकल्पनाच नाही,,,मला कायम असं वाटते की अंगीभूत क्षमतांचा विकास करून जीवनाला आकार देत ते शिक्षण,,,अगदी प्राथमिक स्तरापासून तर उच्च शिक्षणाच्या संशोधन स्तरापर्यंत मला असा प्रत्येक क्षमताधिष्ठित अभ्यासक्रम तयार करता येईल ? भारताला जर महासत्ता बनायचे असेल तर शिक्षणाचे मॉडेल भारतीय लागेल,,पाश्चात्त्य विचारधारेतून उत्पन्न होणारी शिक्षण प्रणाली भारतीय ऱ्हिदायी घडवू शकत नाही,,,आज तंत्र ज्ञानाचा प्रस्पोट झाला,,पण माणूस तांत्रिक यांत्रिक झाला,,,संगणकाला मानवाने भावना दिल्या पण स्वतः भावना शून्य झाला,,,शिक्षणाने अहंकार वाढला,,,शिक्षकाची जागा संगणकाने घेतली,,,शिक्षक विद्यार्थ्यांचा सुसंवाद हारविला,,,, एक काळ होता की शिक्षक हा विद्यार्थ्यांचा अध्यात्मिक पिता होता,,आज ती भूमिका हरवलीय,,, नियमाला अपवाद असतीलही,,पण सर्वदूर चित्र भीषण आहे,,,तंत्र ज्ञानाचे फायदे आहेतच ते नाकारता येणार

नाही,,तंत्र ज्ञानाने मानवी जीवन सुसह्य केले पण मानवीय गुण यांत्रिक बनले ,,,संस्काराची जागा विकाराने घेतली,,,संस्कृतीची जागा विकृतीने घेतली,,,विनम्रतेची जागा अहंकाराने घेतली,,,कुठे चाललोय आम्ही ? माझ्या देशाचे शिक्षण हे माझ्याच देशाच्या विकासाकरिता असले पाहिजे,,भारत हाच विचार ,,,भारत हाच आचार,,भारत हाच धर्मभारत हाच संप्रदाय,,,भारत हाच विचार,,,ह्यातून निर्माण होईल तेभारतीयत्व,,,

प्रत्येक मनावर सुसंस्कार होतील,,प्रत्येक मन सुंदर होईल कारण ते शिक्षण साधनायुक्त असेल,,,त्यातून खऱ्या अर्थाने माणूस घडेल,,,माणूस घडविणारे,,,मानवाला सुसंस्कारित करणारे,,,त्याच्या विचारात परिवर्तन करणारे ,,,असे शिक्षण मला हवाय,,,,आज आम्ही केवळ करतोय ‘Transfusion of Idea‘ पण शिक्षणातून Transformation आवश्यक आहे ,हे Transformation घडवून आणण्याचे असेल तर शिक्षणाच्या माध्यमातून आम्हाला विद्यार्थ्यांचे life vision विकसित करावे लागेल त्याच सोबत कृती करण्याची क्षमता,,,,स्वामी चिन्मयनंदानी शिक्षणाबाबत म्हटले आहे‘ No Transfusion of Idea only Transformation ‘ह्यासाठी त्यांनी एक छान सूत्रदिले‘Vision_action=Idea (Idea has no legs and limbs)Action_Vision=confusions मग ट्रान्सफॉर्मशन म्हणजे काय?Transformation=Vision+Action एकूणच काय शिक्षण म्हणजे transformation हे ऐकलं आणि विदयार्थी शांततेने माझ्या केबिन मधून निघून गेले,,,,अंतरमुख होऊन.




# १५ spread the wings and fly

लहान पणी मी एक गोष्ट ऐकली होती की एक पक्षिणी एका झाडावर स्वतः चे घरटे बनविते,,,अनेकदा तीचे घरटे पडण्याचा प्रयत्न बाकी तिचे सहकारी पक्षी करतात,,,आपले घरटे वाचविण्याचा ती खूप प्रयत्न करते आणि आपले घरटे वाचविते,,,, कालांतराने त्या घरट्यात सुंदर पिल्लाचे आगमन होणार असते,,तोवर हि पक्षिणी जीवन अनुभवाने समृद्ध झाली असते ,मानाने कणखर झाली असते,,,आता तिची पिल्ले अंड्यामध्येच असतात,,,ती फोडून बाहेर येण हि स्वाभाविक प्रक्रिया आहे,,,पण त्या पिल्लाना भय वाटते व ते आपल्या आईला म्हणजेच पक्षिणीला आपले भय बोलून दाखवितात,,,,पक्षिणी खूप अस्वस्थ होते,,कारण जीवनाला सामोरे जाण्यापूर्वीच तिच्या पिल्लानि घेतलेली ती हार असते,,आपण आयुष्य भर जीवन संघर्षाना एवढ्या हिमतीने तोंड दिले पण माझे पिल्ले भय ग्रस्त आहे हे ती सहन करू शकत नाही,,,पण ती एक खंबीर आई असते,,,ती आपल्या पिल्लाना जो संदेश देते तो संदेश मनाला खूप उभारी देणारा ठरतो,,, तो संदेश असा‘ break the shell,,,,open your eyes,,,,spread the wings,,,and fly,‘खूप मार्मिक,,,,लहानपणी हि कथा आईने सांगितली पण त्यावेळी त्याचा अर्थ शब्दशःकळला,,, कारण आई बाबांच्या छत्र छायेखाली जीवन निश्चिन्त होते,,,जीवन संघर्ष नव्हता,,,पण एवढे मात्र नक्की लक्षात आले होते की आईला त्या पक्षिणीच्या माध्यमातून खूप मोठे तत्वज्ञान सांगायचे आहे,,,आपल्या मनाला आकार द्यायचा आहे,,,त्या वयात जे पटेल ते तिने सांगितले पण एक बीजारोपण त्याच्या माध्यमातून झाले,,,बाबांचे ह्यावर एक वाक्य असायचे,accept it,,,face it,‘ह्या सगळ्यांचे अर्थ आज लागतात,,,,,,पुष्कळदा आपल्याही आयुष्यात नित्याचा अनुभव आहे की समस्या दुःख हि अगदी हातात हात घालून येतात,,,काही समस्या

आपण ओढवून घेतलेल्या तर काही अनाहूत,,,पण दुःख मात्र नित्याचेच,,,,वर्षानुवर्षे दुःख झेलून आपण थकून जातो,,,असेही घडते कि दुःख कडे सकारात्मकतेने सुद्धा बघतो,,,जे दुःखा कडे सकारात्मकतेने बघतात ते दुखाशी दोन हात करून त्यावर मात करीत दुःखा ला एक चांगली संधी समजतात आयुष्याचे सोने करतात,,,त्यांनी जीवनाला आहे तसे स्वीकारले असते आणि म्हणूनच ते दुःखाला सामोरे जातात,,,जीवनाचे क्षण भंगुरत्व त्यांनी जाणले असते,,,स्वामी,विवेकानंद,,,डॉ हेडगेवार,,,स्वामी चिन्मयनानंद,,,आणि असे कितीतरी उदाहरणे आपल्याला देता येतील कि अत्यंत विपरीत जीवन अनुभवातून तावून सुलाखून ह्या सर्वांनी आपल्या जीवनाचे सोने बनविले,,,इतरांना नव्हे संपूर्ण जगाला जगण्याची दिशा दिली,,,जीवनात दुःख येणारच,,,सुखाचा सदरा घेऊन कुणीही जन्माला आलेला नाही,,,पण आपल्याला सुख हवे असते पण दुःख नाही,,,,सुखाची मानसिक तयारी असते पण दुखाबाबत मानसिक तयारीही नाही आणि त्याला पेलण्याची ताकद हि नाही,,,आम्ही सतत दुःखा पासून दूर पाळण्याचाच प्रयत्न करतो,accept,,, surrender हे शब्दच माझ्या शब्दकोशात नसतात,,,मग मी माझ्या जीवनात येणाऱ्या दुःखा शी भांडत राहतो,,,, त्यावर वारंवार डोकं आपटत राहतो,,,मी रक्तबंबाळ होतो पण दुःखा शी भांडणे संपत नाही,,,,आणि मग माझ्या कोशात मी स्वतः ला गुरफटून घेतो,,,इतका गुरफटून घेतो कि माझ्या जीवनात केवळ दुःख आहे,,,मला कधी सुख मिळणारच नाही का,,,अशा विविध कोट्या करायला लागतो,,माझ्या दुःखी राहण्याने किती लोकांना मी दुःखी करतो ह्याचेही भान मला राहत नाही,,,माझे कितीतरी प्रेमाचे लोकांना मी दूर लोटतो,,,,सर्वांशी संबंध नाकारतो ,,,,,हे सर्व करीत असताना नैराश्येच्या shell मध्ये मी स्वतः लाच नेत असतो हे मलाही उमजत नाही,,,माझ्यातून जे सहज सुपूर्त जीवन

उमलायला पाहिजे ती प्रक्रिया मी थांबवून टाकतो,,,मी आयुष्याबद्दल निराश होतो,,,अशा वेळी हा पक्षिणी चा सल्ला मला खूप मोलाचा वाटतो,,,स्वत: भोवतीची दु:खा चे वलय आपण स्वत: फोडले पाहिजे,,आणि हि क्रिया सहज घडली पाहिजे ,,,कारण मला माझे जीवन फुलवायची आहे,,,माझ्या कर्तृत्वाचे पंख मला त्याच क्षणी विस्तारता आले पाहिजे,,,लक्षात असू द्या जीवनात दु:ख पावलोपावली आहे,,,पण माझ्या मानव देहाचे प्रयोजन मला विसरायचे नाही,,,जेवढे जीवन आहे तेवढे सकारात्मकतेनेच जगायचे आहे,,,हे कर्तृत्वाचे पंख पासरवितानाच आपल्या जिवनाबाबत दृष्टिकोन ठेवणे आवश्यक आहे,,जीवनाची दिशाही ठरवावीच लागेल,,,,योग्य दिशेला fly झाले तरच आपण ध्येय प्रत पोहोचणार,,,ह्या सर्व प्रक्रियेत खूप संकटे येणार त्याची आपली मानसिक तयारी हवी,,,नियतीच्या परीक्षेत पास व्हायलाच हवे,,,दु:खाची परेड माझ्यासमोरून जात आहे आणि मी गार्ड ऑफ ऑनर स्वीकारते आहे किती विलोभनीय दृश्य आहे हे,,,माझा माझ्याप्रति सन्मान वाढविणारे ,,,आत्म प्रतिष्ठा निर्माण करणारे ,,कारण जे आले त्याला एक दिवस जायचेच आहे,,,, दु:खाची परेड संपून सुखाची सुरु होईल पण मला त्याही पलीकडे जाऊन आनंद प्राप्त करायचा आहे कारण तीच माझ्या जीवनाची योग्य दिशा आहे,,,break the shell,open your eyes,,,spread the wings,,,and fly,,,,,hari om




१६

# संकल्प गुडीपाडव्याचा

आज गुढी पाडवा,,,मराठी वर्षाचा पहिला दिवस,,,असे म्हणतात नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी काही संकल्प करावा व ती वर्षभर राबवावा,,,आणि हा संकल्प चांगला ,जीवनाला उन्नत करणारा असावा,,,पण नेमका कोणता संकल्प करावा,,,आणि चांगले संकल्प सर्वांनी केले तर समाजपरिवर्तन निश्चित घडून येईल,,,हे सर्व खरे आहे ,,,पण संकल्पाला विकल्प हा पर्याय आहे,,,आणि संकल्प विकल्प करणे हे कार्य मन नावाच्या सूक्ष्म देहाचे आहे,'संकल्प विकल्पत्मक मन:'असे तत्वबोधात म्हटले आहे,,,जे संकल्प विकल्प करते ते मन,,,मन म्हणजे विचारांचा प्रवाह असे स्वामी चिन्मयनानंद म्हणतात,,,जसे विचार तसे मन,,,विचार शुद्ध तर मन शुद्ध,,स्वामी चिन्मयनानंद म्हणतात' as your thoughts so your mind,,,as a mind so the man,,,,as the man so the world,,,,thoughts are pure mind is pure,,,if thoughts are impure mind is impure,,,,as you think so you become '''स्वामी चिन्मयानंदाची हे विचार मनाची परिभाषा,,,आजवर केलेल्या मनाच्या परिभाषांपेक्षा सखोल आहे,,,,मग संकल्प करायचा तो कोणत्या स्तरावर ? संकल्पबाबत विकल्प यावयास नको,,,पण संकल्प विकल्पा पेक्षा स्रेष्ठ आहे तो निर्णय जी बुद्धीचे कार्य आहे,power of discriminations हा मनाचा पोत, आणि power of determination बुद्धीचा पोत,,, आणि निर्णय घेऊन त्यावर अंमलबजावणी करणे हे महत्वाचे ठरते,,,नवीन वर्षात संकल्प करण्यापेक्षा निश्चय करणे आणि तो हि सद् निश्चय करणे महत्वाचे आहे,,,,

मग प्रश्न निर्माण होतो की सदनिश्चय कोणता? आज सर्व स्तरावर परिवर्तन ची गुढी उभारा,हा संदेश दिला जातो,,समाज परिवर्तनाची गुढी उभारा,,,असा सर्वपरिवर्तन कोणते,,समाज परिवर्तन म्हणजे काय ? त्याची दिशा कोणती असावी ? समाजपरिवर्तन म्हणजे समाजाच्या

विचारांमध्ये परिवर्तन ? हे परिवर्तन कसे घडेल ? आणि ह्या परिवर्तनाची चारमसीमा काय असेल,,,,समाजाचे आजचे पाश्चात्यिकारांन झालेले पाहिल्यावर असा विचार येतो की हे समाज परिवर्तन आहे का ? आणि माझ्या समाजाच्या प्रकृतीला हे मानवेल का ? असं लक्षात येत कि हे समाजाला मानवात नाहीये,,,समाजाची मूल्यांच्या बाबतीत अधोगती सुरु आहे,,मूल्यांची पायमल्ली सुरु आहे,,,परिवर्तन सर्वच क्षेत्रात आवश्यक आहे पण भारतीय पाया सोडून नाही,,,आज गरज आहे ती भारतीय विचारधारेची,,,पाया सोडून परिवर्तन हे भारतीय समाजाला मानावणारी बाब नाही,,,भारतीयत्व कायम राखूनच जर समाज परिवर्तनाची दिशा ठरली तर समाज प्रकृती अधिक पुष्ट होईल,,,,पण प्रश्न उद्भवतो कि भारताची प्रकृती म्हणजे काय ?स्वामी विवेकानंदांचे विचार खूप मार्मिक आहेत ,,,ते म्हणतात‘भारताची खरी ओळख करून घ्यायची असेल तर भारताच्या अंतरंगात डोकवावे लागेल,,आणि भारताचे अंतरंग आहे अध्यात्म,,,भारताला शोधायचे असेल तर अध्यात्म पुनरुज्जीवित करावे लागेल,,‘आणि हीच खरी परिवर्तनाची दिशा आहे,,,ज्या ज्या गोष्टींमुळे भारताला जगात वैभव प्राप्त झाले होते त्याचे पुन्हा जागरण महत्वाचे ठरते,,,भारताच्या विकासाचे मॉडेल अध्यत्मच्या पायावरच स्थिर होऊ शकते,,,हि सुरवात प्रत्येक नागरिकाला स्वतः पासून करावी लागेल,,,आत्मपरिवर्तन महत्वाचे आहे,,,हि आत्मपरिवर्तनाची गुढी मला उभारता येईल ? स्वामी चिन्मयनानंद म्हणतात. you change then change the world.



१७

# धागे,सुख दु:खाचे

आज सकाळी रेडिओ वर बाबूजींचे गाणे सुरु होते,,ग,दि,माडगूळकर ह्याचे गीत आणि अर्थात संगीत आणि आवाज बाबूजींचा,,ह्या दोन्ही गंधर्वांनी संगीत आणि काव्याला एक उंची प्राप्त करून दिली आणि म्हणूनच ते अजरामर झालेत,,,महाराष्ट्राचे लाडके दैवत झाले,,,'एक धागा सुखाचा,शंभर धागे दु:खा चे,जरतारी हे वस्त्र माणसा तुझिया आयुष्याचे'हे ते अतिशय मार्मिक आणि आपल्याही जीवनाला उंची प्राप्त करून देणारे हे काव्य,,अनेकांच्या

आयुष्याला दिशा देणारे,,जीवनाला उभारी देणारे,,,पण मला नेहमी वाटत कि गदिमा ना सुखाचा एकाच धागा का दिसावा ?मग बाकी सर्व धागे जर दु:खाचे असतील तर मानवाच्या जीवनाचे वस्त्र तरीही जरतारी कसे ? ह्या प्रश्नाचे उत्तर मी जेव्हा हे गाणे प्रथम ऐकले तेव्हा नाही मिळाले कारण वय लहान अनुभव कमी,,,जाणिवेचा विस्तार कमी,,,पण जसे जसे अनुभव वाढत गेला तेव्हा ह्या गाण्या वरील काही टीका पण ऐकल्या,,कि हे जीवनाचे इक्वेशन असू शकत नाही,,मुळंतच जीवन हे दु:खं मय,,,,,तर जीवनाच्या वस्त्रात जास्त धागे दु:खाचे ,,,असे असताना जीवनाचे वस्त्र जरतारी कसे ? त्यावेळी हा पण विचार बरोबर वाटायचा,,,पण आज लक्षात येतंय कि गदिमा हे खरंच द्रष्टे होते,,,जीवनात सुख दु:खाचा ऊन सावली चा खेळ सतत सुरुअसतो,,,अनुकूलनियं सुखं,,,प्रतिकूलनियं दु:खं,,,हि सुख दु:ख ची व्याख्या,,,मनासारखे झाले की सुख,,,मनाच्या विरुद्ध झाले की दु:ख,,,आपल्याला कायम आपण सुखताच असावं असं वाटत,,पण तसं घडत नाही,,,कितीतरी प्रसंग आयुष्यात येतात ज्याने आपण अगदी कोलमडून पडतो,,, जीवन जगण्याची इच्छाच उरत नाही,,आणि अगदी कधी कधी तर माझा जन्मच दु:ख सहन करण्यासाठी आहे की काय इतक्या दुखपूर्ण घटनांची साखळीच आयुष्यात तयार

होते,,,अगदी कधी कधी तर मन थकून जात,,,आणि प्रश्न पडतो की ईश्वरा माझ्याच नशिबात हे भोग का ? एक फार छान उत्तर ह्यावर मला प पू,स्वामी पुरुषोत्तमानंद ह्यांनी दिले,'जीवन हे प्रसादबुद्धीने जगले पाहिजे'म्हणजे काय ? खूप छान उत्तर दिले त्यांनी'आपण मंदिरात जाताना पेढे नेतो पण मंदिरातून आल्यावर मात्र तोच प्रसाद होतो,,आपल्या पूर्ण जीवनाला ईश्वराला समर्पण केले तर जीवनात येणार प्रत्येक क्षण हा ईश्वराचा प्रसाद असेल मग तो सुख असू दे किंवा दुःख,,,ती त्याचीच कृपा,,तो अवकृपा कशी करेल? जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा प्रसाद बुद्धीचा असेल तर सुख हि जशी ईश्वराची कृपा तसे दुःख हि सुद्धा ईश्वराची कृपा,,हि धारणा पक्की करणे ही साधना आहे,,जीवनात प्रसादबुद्धी ठेवावी हा महामंत्र वाटतो मला,,,आणि मुळातच जीवनात सुख प्राप्त करणे हे अतिशय तात्कालिक जीवनध्येय आहे,,पण मी सुखरूप आहे ही धारणा पक्की होणं महत्वाचे आहे,,,मी जर सुखरूप आहे तर सुख माझ्यापासून कुणीही हिरावून घेऊ शकत नाही,,मग माझ्या आयुष्यात केवळ शंभराच नाही तर कितीही दुःख येवो माझी सुखरूपतेची एकतारी सतत सुरु आहे,,,आणि हि सुखरूपतेची एकतारी आहे म्हणूनच माझे जीवन समृद्ध आहे,,,आनंदी आहे ,,,शांत आहे,,,,खरंच शंभर दुःखाना पार करण्याचे सामर्थ्य जर कशात असेल तर जी सुखरूपतेची एकतारी जी माझे स्वरूप आहे तीच एकतारी माझे जीवन संगीत सुरेल बनवीत आहे,,,आता ह्या सुखाच्या एक धाग्यांच्याही पलीकडे मला झेप घ्यायची आहे,,,आणि माझ्या जीवनाचे वस्त्राच नाही तर महावस्त्र बनावे,,,आणि प्रसादबुद्धी जागृत ठेऊन हेवस्त्रह्या जगाच्या कल्याणासाठी समर्पित व्हावे,,,गदिमा ची हि ऋषींची जातकुळी,,, पुन्हा पुन्हा तेच स्वर मनात सुरेल संगीत निर्माण करून जीवनाला दिशा देत आहेत,,,धन्य ते गदिमांचे शब्द आणि धन्य ते बाबूजींचे स्वर,,,खरंच साक्षात्काराचा परीस स्पर्श,,,,,


१८

# Goal of life

काही दिवसांपूर्वी मी युवकांचे एक १५ दिवसांचा workshop घेतला,विषय होता Understanding the Self विषय अतिशय सुंदर,,सहभागी युवक हे graduate postgraduate होते,,,विविध उपविषयानी परिपूर्ण व व्यक्ती जीवनाला एका उंचीवर घेऊन जाणारे असे हे workshop त्याची सुरुवात होती what are your goals of life ,विद्यार्थ्यांनी प्रश्न केला goals आणि objectives मध्ये काय फरक असतो? त्यांना सांगितले की goals दूरगामी असतात आणि objectives तात्कालिक,,ह्या विषयावर नंतर बराच विवेचन चर्चा झाली,,,आता वेळ होतीती individual presentation ची,,,एक युवक आला आणि म्हणाला 'तसं पाहिलं तर अजून मी काय करायचे हे मी ठरविले नाही,,बीएड ला आलो आहे तर शिक्षक होण्याचा विचार आहे,,पण शिक्षक होण्यासाठी माझ्याकडे पुरेसा पैसा नाही त्यामुळे एक तर मी शिक्षक होईल जर कुठे डोनेशन न देता,,, नाहीतर मी स्पर्धा परीक्षा देईन,,ते हि नाही जमले तर मी ट्युशन क्लास घेईल,,,पण मला काहीही करून खूप पैसे कमवायचे आहे,,श्रीमंत व्हायचे आहे,,मी विचारले समजा ट्युशन क्लास नाही घेता आला तर?त्यात तूला यश नाही मिळाले तर ? उत्तर मिळाले'मग मला नाही माहित मला काय करायचे आहे पण मला जगाच्या स्पर्धेत उतरायचे आह,,मॅडम मला खूप पैसे कमवायचे आहे',,,,,,मला त्या दिवशी खूप वाईट वाटले,,,माझ्यातील संवेदनशील शिक्षक खूप अस्वस्थ झाला,,मनात प्रश्न पडला होणाऱ्या शिक्षकांना जर त्यांना आयुष्यात काय करायचे आहे हे माहित नसेल तर येणाऱ्या पिढीच्या जीवनात आपण त्यांच्या हाती कोणती जीवन ध्येय देणार आहोत ? मी विचार करू लागले तीन पिढी आधीचा ज्या पिढीत मी लहानाची मोठी झाले,,,कुटुंबापासून विचार मनात आला,,,कुटुंब हि पाठशाळा

होती,,त्यात आजी आजोबा नावाचे संस्कार केंद्र होते,,तेथे नात्याची समृद्धता होती,,आई वडिलांच्या प्रत्येक क्षणाचे आंतरक्रिया ह्या मनाला समृद्ध करणाऱ्या होत्या,,,निसर्गाची सोबत होती,,अध्यात्मिकतेचा ध्यास होता,,नातेवाईकांची रेलचेल होती,,,घरी सहस्तित्वाची भावना होती,,,कुटुंबात एकमेकांबद्दल ओढ आदर सन्मान होता,,,पानाफुलांची आवड होती,,निसर्गाच्या कुशीत विसावणे होते,,,तेथे ज्ञानेश्वरी होती,,,भावद्गीता होती,,तुकारामाची गाथा होती,,,विवेकानंदांची ग्रंथावली होती,,,संपूर्ण घराण्याला अध्यात्मिकतेचा पाया होता,,,जीवनाचे प्राप्तव्य काय ह्याबाबत च्या संकल्पना वेगळ्या रुजवाव्या लागल्या नाहीत त्या सगळ्या आकलन झाल्या रुजल्या ,,,अंकुरल्या,,, झाडाला अलगद पालवी फुटावी न तशाच आणि तितक्याच सहजतेने त्या प्रगटल्या,,, किती सहजता होती त्यात,,,संस्काराच्या दृष्टीने किती ऐश्वर्या संपन्नता होती ती,,,आणि ती शिदोरी जी मिळाली ती आजही पुरते आहे,,,आणि त्याच प्रेमाने माझ्या विद्यार्थ्यांना देताना खूप आनंद होतो,,,शाळे मध्ये खूप शिस्तप्रिय पण प्रेमळ शिक्षक,,, शेजाऱ्यामध्ये कुठेही आपपर भाव नाही,,सगळं कसं समृद्ध,,,पण आज ह्या सगळ्या संस्कार शिदोरीपासून माझा बालक विद्यार्थी दूर आहे,,,आजही कुणाशी स्पर्धा करावीशी वाटत नाही,,पण सध्या सगळेच दृश्य बदलले,,घराचे अंगण गेले,,,आईबाबा नोकरीवर गेले,,,नातेवाईक वर्षातून एकदाच जमतात तेही रिसॉर्ट मध्ये,,,सणाचे आशय संपले,,,कॉन्व्हेंट मध्ये जाणारा माझा विद्यार्थी बालक विचारतोय ‘मम्मा who is dnyaneshwar? आजी आजोबा नावाचे संस्कार केंद्र लोप पावले,,, निसर्गाशी आप्तेष्टांशी संवाद तुटला,,,अभ्यासासाठी आईचा ट्युशन क्लास out dated झाला,,सायंकाळ चा दिवा बंद झाला आणि मनामनात अंधक्कार झाला,,फ्लॅट संस्कृती आली आणि संस्कृती फ्लॅट झाली,,,,अपार्टमेंट

आले आणि कुटुंब अपार्ट झाली,,,शिक्षकांना जीवनाची ध्येय globalization माहित नाही,,नवीन अभ्यासक्रमाने जीवनध्येय ठरविण्याची मुभा दिली नाही,,,नव्हे जीवांध्येयाचाच पाया अभ्यासक्रमास नाही,,,समाजात घडणाऱ्या घटना मन विषन्न करणाऱ्या आहेत,,,,प्रत्येक जण स्पर्धेत धावतोय,,,कशी सांगावी होणाऱ्या शिक्षकांना हि जीवनध्ये च्या युगात आमच्या मनाची वैश्विक्ता मात्र आम्ही गमावली,,,विद्यार्थी मित्रानो माझ्या मुलांनो मुलींनो जीवनाला अधिष्ठानाची खूप गरज असते त्याचा गांभीर्याने विचार करा,,,आपल्या बालकांच्या हाती संस्कार रुपी धन द्या,,,जीवनध्येय ठरवा ,,,स्वामी चिन्मयानंदाची वाक्य मला आठवतंय' Enter your life with vision and missions...... हरिओम



## ११ The Game of Life

काल दूरदर्शन वर क्रिकेट ची एक खूप पूर्वीची मॅच चालू होती,ज्यात सुनील गावस्कर ची शतक झालेल्या त्या मॅचेस होत्या,,काही मॅचेस मध्ये तो शून्य धावा काढून बाद झाला,,,त्यानंतर सचिन तेंडुलकर च्या मॅचेस दाखविल्या,,त्यातही असेच घडले,,काही वेळा शतक तर काही वेळा शून्य धावा,,काही वेळा तर दोघांनीही दुसरी बाजू इतकी छान सांभाळली होती की लगेच आमच्या तोंडातून उदगार निघाले ,,अरे धावा कमी काढल्या पण छान खेळला,, हे सर्व मी बघत होते मात्र मन विचारमग्न झाले,,,काहीतरी वेगळा विचार करायला लागले,,,मला सुनील गावस्कर,सचिन तेंडुलकर होता येईल ? उत्तर मिळाले का नाही ? निश्चित होता येईल,,,पण त्यासाठी आता या वयात क्रिकेट खेळायला सुरवात करू? उत्तर मिळाले त्याची मुळीच गरज नाही,,आता मात्र विचारचक्र आणखी वेगाने सुरु झालेआणि विचारांची हा प्रवाह जीवनाकडे वळला,,,आपल्या जीवनात आपण हि भूमिका करू शकू ?शेक्सपिअर आठवला'जीवन रंगमंच आहे,प्रत्येकाला आपल्या वाटेल आलेली भूमिका निभवायची आहे'पण तरीही एक बाब मनाला पटत नाही की जीवन रंगमंचावरील भूमिका मला निभवायची जरी असली तरी कुठलेही कृत्रिम मुखवटे लावून ती भूमिका करणे मला मान्य नाही,,जीवनाच्या खुल्या रंगमंचावर नाटकाचा पडदा पडणार,लोक टाळ्या वाजवणार,,तीन अंकी नाटक संपणार,,माझी भूमिका मी किती उत्कृष्ट पणे केली ह्याबद्दल रसिक मला अक्षरश:डोक्यावर घेणार,,पण माझ्या मनात त्यावेळी एक नि:शब्द खंत असेल की ते सर्व कृत्रिम होते,,मी फक्त माझ्या दिग्दर्शकाने दिलेली भूमिका केली,,त्या भूमिकेत मी इतका हरवलो कि मी माझे जीवन ध्येय विसरलो,,,जीवनाचे साध्य विसरलो,,,त्या भूमिकेतून मी बाहेर आलोच नाही,,आणि ह्या

कृत्रिमतेलाच लोकांनी माझे जीवन समजून टाळ्या वाजविला,,,मी खरा कोण होतो? कसा होतो?माझे ध्येय काय होते?मला काय हवे होते?कितीतरी गोष्टी अशा होत्या की मी जीवन मंचावरचा कलाकार म्हणून मला मोकळेपणाने जीवन जगताच आले नाही,,,आणि ह्या जीवन मंचावरून खरंच exit होण्याची वेळ आली तेव्हा मी एकाकी होतो,,माझे सगळे मुखवटे गळून पडले होते,,,एक चांगला कलाकार म्हणून मी आयुष्यभर वावरलो पण माणूस म्हणून मला जगताच आले नाही,,,माझी माझ्या जीवनाची खरी भूमिकाच मला नाही जगता आली,,, मला शेक्सपिअर च्या वाक्याची मर्यादा जाणवली,,,पण क्रिकेट च्या मैदानातील तो खेळ पाहताना वाटले की जीवनाचा खेळखंडोबा न करता मला जीवनाचा खेळ इतका कौशल्यपूर्ण खेळता येईल,,,लक्षात आले ह्यासाठी शरीर मन बुद्धीची परिपक्वता लागेल,,भेदक दृष्टी विकसित करावी लागेल,,,विविध जीवन कौशल्य जाणून घ्यावे लागतील,,,माझा हा खेळ सुरू असताना दुसरीकडून मला आउट करण्याचेच प्रयत्न सतत असणार आहे,नियती नावाचा बॉलर मला आउट करण्यासाठी केवळ एकटाच प्रयत्न करणार नाही तर विविध फिल्डर्स च्या माध्यमातून मला थांबविणे ,माझी घोड दौड थांबविण्याचा प्रयत्न नियतीचा असणार आहे,,माझ्या चहू बाजूनी मला नामोहरम करण्याचे प्रयत्न होत आहेत,,मागे विकेटकीपर बॉलर फिल्डर्स आणि त्यावर न्याय देणारा अंपायर,,मी कशी खेळते हे पाहण्यासाठी लाखो नजरा माझ्यावरच खिळल्या आहेत,,,मला छान खेळावेच लागेल,,,माझं ध्येय ठरविण्याचे स्वतंत्र आहे मला,,,ते प्राप्त करण्यासाठी मी जीवन कला प्राप्त केली आहे,,माझी अभिवृत्ती मी विकसित केली आहे,,,शरीराने मी छोटी असेंन त्याचे मला दुःख नाही पण माझे मन बुद्धी ला मी विकसित केले आहे,,,खेळाडू वृत्ती मी विकसित केली आहे,,,आपल्याला आउट करण्याची नियतीची इच्छा मी स्वीकारली आहे,,नियतीचा प्रत्येक चेंडू कौशल्यपूर्ण

टोलवायचाच,,,जीवनाचे प्राप्तव्य मिळवायचेच,,,कधी शतक होईल यश मिळेल,तर कधी अपयश,,पण कशाचाच परिणाम होऊ द्यायचा नाही ,,,खेळात राहायचे,,,प्रत्येक बाजूचा तोल सावरायचा,, मला माहित आहे एक दिवस मलाही आउट व्हायचे आहे ,,,,,सगळ्या नजरा माझ्या खेळावर टिकून आहेत,,,पण असे खेळायचे कि आऊट झाल्यावर सर्व प्रेक्षक म्हणतील जीवनात खेळावं तर असं....Yes,,,,This is game of life



## २० युटर्न च्या निमित्ताने

काल यु टर्न हे नाटक बघायला गेले,अनेक दिवसानंतर एक उत्कृष्ट नाट्य कलाकृती ,उत्कृष्ट अभिव्यक्ती अनुभवायला मिळाली, स्त्री पुरुष संबंधाकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून बघण्याचे विचार देणारे हि नाट्यकृती,,, जीवनात जोडीदाराची गरज असतेच पण वयानुसार जोडीदाराकडून अपेक्षाही बदलत जातात ,,

जोडीदाराकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा वयानुसार निश्चित बदलतो,,,लग्नापूर्वी प्रियकर प्रेयसी,,,लग्नानंतर नावदाम्पत्या,,अपत्य झाल्यावर एकमेकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन माझ्या आपत्याची आई किंवा बाबा,,,माध्यम वयात एकमेकांचे सहकारी,,सुख दुःखाचे वाटेकरी,,,वयाच्या ५० वर्षानंतर निरपेक्ष प्रेम करणारी ,,माझे ऐकून घेऊन मला समजून घेणारा जोडीदार,,,आणि आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावर एकमेकांचे पालक,,,एकमेकांना प्रौढ परिपक्व होताना पाहणे,,,हे सगळं खरंच विलोभनीय आहे,,खूप सुंदर अशी नात्याची हि गुंफण,,,विवाहाच्या सुंदर चौकटीत उमलणारे हे नाते,,,एक दिवस अशा वळणावर येते जेव्हा पती पत्नी सुद्धा केवळ एकमेकांचे companian असतात,,पण ह्या चौकटी बाहेर उमलणारे स्त्री पुरुष नाते,,,जे समाजमान्य नाही,,पण निष्पाप आहे,,,अशा नात्याकडे समाज कोणत्या भूमिकेतून पाहतो ? एकमेकांचे विचार भावना मन जाणणारा स्त्री चा मित्र किंवा पुरुषाची मैत्रीण ज्यांचे नाते केवळ एकमेकांना मानसिक भावनिक आधार देणे ,,,एकमेकांचे जीवन समृद्ध करणे,,,एकमेकांच्याआवडीनिवडीजपणे,, ,शारीरिक संबंधाचा तेथे विचारही नाही,,केवळ एकमेकांची काळजी घेणे,,,अशा वयात एकत्र येणे ज्या वयात अपत्य आपआपल्या व्यापात आहेत त्यांचे स्वतः चे विश्व आहे अशा वेळी आयुष्याच्या सायंकाळी आलेला हा एकाकीपणा,,,ह्या एकाकी पणातून जुळलेली मने,,, ह्या सगळ्या

बाबींना समाजमान्यता नाही म्हणून हे नाते खरंच अनैतिक ठरते ? भारतीय संस्कृती चा विचार करता निश्चित पणे हि बाब गैर वाटेलकदाचित,,,कुटुंबव्यवस्थेला धक्का बसला असेही वाटेल,,,नवीन पिढीसमोर आपण काय आदर्श निर्माण करणार आहोत असेही त्याचे समर्थन होईल,,,पण ह्या नात्याकडे वेगळ्या भूमिकेतून बघता एक बाब महत्वाची समाजात लक्षात येते की कितीतरी स्त्री पुरुष एकाकी पणात आपले आयुष्य घालवत आहेत,,,मुले आपापल्या व्यापात,, स्वतःचे आयुष्य जगताना त्यांच्या सुख दुःखात स्वतः ला रामवून घेणारे कितीतरी एकाकी जीव आहेत ज्यांनी आपले जीवन नाकारले आहे,,,स्वतःच्या मर्जीने जगणे नाकारताना होणारी त्यांची कुचंबणा बघताना सगळ्यात असून एकाकी असणारे एकल स्त्री पुरुष ,,,,ज्या वयात खरंच साथीची गरज आहे तेथे एकाकी जगतात आहेत,,,पुन्हा नव्याने आयुष्य सुरु करण्यासाठी खरंच विवाह नावाच्या चौकटींची गरज आहे ? हे नाते खरंच शरीरिकतेच्या पलीकडचे असेल तर स्त्री पुरुषांचे एकत्र राहणे समाज मान्य करेल ? स्त्री पुरुष नात्याचं गाभा मानसिक बौद्धिकही असू शकतो हे समाजाला पटेल ?काय असेल यु टर्न? विवाहाशिवाय एकमेकांसोबत खरे सहकारी म्हणून राहणे कि विवाह करणे ? काय असायला हवे ?



२१

# स्वामी चिन्मयनानंद ,,
# आधुनिक युगातील द्रष्टे,,,

त्यांचे एक वाक्य मला खूप भावले,आणि खरंच मी खूप विचारात पडले,वाक्य होते ' There is no path to happiness,happiness is a pathway 'अर्थात अनंदाकडे जाण्याचा कोणताही मार्ग नसतो,आनंद हाच मार्ग आहे,,गुरुदेवांच्या ह्या विचारानि आजची सकाळ अत्यंत प्रसन्न उगवली,,आणि विचारचक्र सुरु झाले,,माझ्या मनात आले की मला खरंच जीवनात काय हवे आहे ? उत्तर मिळाले मला सुख हवे आहे,,पुन्हा प्रश्न 'हे सुख कशासाठी हवे आहे'उत्तर मिळाले आनंदासाठी,,,हा आनंद मला केव्हा हवाय। ? आत्ताच,,हा आनंद मिळविण्यासाठी मला काय करावे लागेल ? प्रयत्न,,,ते कसे ? ह्या प्रश्नाशी माझा माझ्या मनाशी चाललेला संवाद थांबला,,कारण मला नेमकं कळेना कि मला सुख हवाय कि आनंद,,,,सुख पाहिजे असं म्हटलं तर ते कायम टिकणारे नाही हा अनुभव आहे,,ज्याला म्हणून मी आजपर्यंत सुख मानले त्याचे रूपांतर दु:खात झाले,,आणि जेव्हा दु:ख आले तेही फार काळ नाही टिकले,,लक्षात आले सुख हि संकल्पनाच सापेक्ष आहे,,पण आता किती दिवस ह्या सुख दु:ख च्या चक्रात फिरायचं आहे ? आता मला काहीतरी असे हवे की ज्यापासून मला दु:ख नाही मिळणार,,सगळ्यांनी वेड्यात काढले,,म्हणाले जगात अशी कोणतीही वस्तू नाही ज्यापासून कायम शाश्वत स्वरूपाचे सुख मिळेल,,,पण मन मानेना,, जेथे अशाश्वत आहे तेथे शाश्वत असणारच,,,मी विचार केला की आजपर्यंत कोणकोणत्या घटना नि मला सुख प्राप्त झाले ? प्रथम विचार केला माझ्या संपर्कात आलेल्या व्यक्तींच्या ,आयुष्यात घडलेल्या घटनांचा,प्राप्त केलेल्या प्रतिष्ठेचा ,धनाचा ,नात्यांचा, परिस्थितीचा,ह्या सर्व बाबीचा विचारांचा हा चित्रपट डोळ्यासमोरून लगेच सरकला ,लक्षात आले की ह्या सर्वांनी मला सुख दिले पण ते

खरंच टिकाऊ नव्हते,,त्याचे प्रत्येक वेळा काही काळ गेल्यावर ते ओसरली,,बरेचदा असेही घडले कि आज जरी मी दुःखात आहे तरी माझ्या मनासारखे घडले कि मी आनंदी होईल,,व्यक्ती माझ्या मनाप्रमाणे वागली कि मी आनंदी होईल,,मला पैसे मिळाले की मी आनंदी होईल,,,हा सर्व विचार करताना मी हे विसरूनच गेले की जीवन हे वर्तमानातच जगावे लागते,,,माझे सुख तर मी भविष्यावर अवलंबुन ठेवले आहे,,,असं होईल तर मी सुखी होईल ,,,तसं होईल तर मी सुखी होईल,,,माझे सुख मी कायम इतरांवर अवलंबून ठेवले,,पर्यवसान काय ? दुःख,,,पण आता ह्या सुख दुःख च्या पलीकडे गेले पाहिजे,,किती दिवस आपण स्वतः ची फसवणूक करणार आहोत ? माणूस थकून जातो,,क्षीण होतो,,त्याची फरफट होते आयुष्यात,,,मग मला गुरुदेव स्वामी चिन्मयनंदानी मार्गदर्शन केले,,आयुष्यात सुख पाहिजे की आनंद हे आपण ठरवायला हवे,,,आणि हा कायम टिकणारा हवा कि अस्थायी,,,मला कायम टिकणारा आनंद हवाय,,तो कुठे मिळेल,,,वस्तू निरपेक्ष सुखात,,,अस्थायी वस्तूच्या प्राप्तीने अस्थायी आनंद,,,स्थायी वस्तूच्या प्राप्तीने स्थायी आनंद,,,काय हवंय ? फक्त वस्तूनिरपेक्ष सुख अर्थात आनंद,,मग तो शोधायचा का ? उत्तर मिळाले नाही,,,तो तुझ्यातच आहे नव्हे तूच अनंदस्वरूप आहे,,बाहेर कुठे शोधतोस हा आनंद,,तो हारावलाच कुठे ? तो तर तुझ्याच जवळ आहे नव्हे तेच तर तुझे स्वरूप आहे, फक्त जाणून घे त्याला,,,बाहेरच्या सगळ्यांशी परिचय करून घेतेस,,कधीतरी स्वतःचा परिचय करून घे,,तुझ्या लक्षात येईल आनंदाचा मार्ग बहिर्मुख नाही,,आनंद हाच जीवनाचा मार्ग आहे,,,आणि ह्याच मार्गावरून वाटचाल कर,,,,अनुभूती आली'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती',,,आनंदाच्या वाटेवरून चालण्याचा आनंद मिळाला,,,,आनंदाचा हा मार्ग खूप आवडला मला,,,,आता जीवनात कोणतीही चिंता नाही,,,दुःख नाही,,,आहे तो केवळ आनंद,,,,आता प्रत्यक्ष गुरुमाऊलीने हात धरलाय,,,,हरिओम

२२

# नि:स्वार्थ जीवन

आज सकाळी माझ्या बागेत गेले,गुलाब मोगरा पारिजात रातराणी ,जास्वंद आणि कितीतरी फुलांची झाडे अगदी माझ्या स्वागताला तयारहोती मला खुणावत होती,,त्या सर्वांची मी सखी न,,,त्याचे ते फुलणे मला मोहवून गेले,,,कारण प्रत्येक झाड मी स्वत: लावलेले ,,,,प्रत्येक झाडावर फुलावर माझे प्रेम,,,कारण त्याच्याशी संवाद साधल्याशिवाय जीवाला चैन नाही पडत माझ्या,,,प्रत्येक झाड आणि त्या झाडावरील फुल मला नित्य संदेश देत असतोगुलाबाचा टवटवीत पणा ,मोगऱ्याचाशुभ्रता, पावित्र्य, निशिगंधाचासुवास,पारिजात चे समर्पण ,जास्वन्दी चे विविधरंगी सौन्दर्य,,हे सगळं इतकविलोभनिय आहे कि जीवन जगण्याची एक उभारी ह्यातून मिळते,माझे मनोगत ऐकणार्या मग ह्या सगळ्या मला माझ्या सख्या आणि सखा वाटायला लागतात,,,खरच किती निरपेक्ष प्रेम आहे त्यांचे माझ्यावर,,,प्रेम मध्ये समर्पण कसे करायचे हे शिकविणारे माझे हे जिवलग ,ह्यांची जातकुलीच वेगळी,,समर्पणाचा आनंद,जीवनाची सुख त्यागता,सर्वांना आनंद देण्याची त्याची वृत्ती,कुणाबद्दल द्वेष नाही,,मी विचारलं मोगऱ्याचा कि तुला गुलाबाचा द्वेष नाही वाटत ?त्याचे उत्तर मला खूप भावले,म्हणाला वेडीच आहेस ,अगं त्याची आणि माझी स्पर्धाच नाही मुळात, मग द्वेष कशाला,,आमच्यातील वेगळेपण आम्ही मान्य केलय आणि ह्या वेगळेपणाचा आदरही आम्ही करतो,,मी जासवंदला विचारले तुला सुगंध नाही तुला वाईट नाही वाटत? तो म्हणतो कसा जे माझ्याजवळ नाही त्याचे कसले ग दु:ख,,पण माझ्याजवळ सगळ्यांना मोहवून टाकणारा रंग आहे आणि त्याचा मला आनंद आहे,,जे नाही त्याचे दु:ख करण्यापेक्षा जे आहे त्याचा उपयोग जगासाठी मी करतो आणि आनंद घेतो,,,,मी प्राजक्ताला विचारले तू इतकी नाजूक सुंदर जगाला अक्षरश:आपल्या सुगंधाने वेड लावतेस

पण ह्या क्षण भंगुर जीवनाचे तुला वाईट नाही वाटत,,,? ,,मला म्हणते कशी अग किती जगले ह्याला काय महत्व?पण कशी जगले हे महत्वाचे नाही का,,? माझे आयुष्य कमी आहे पण जेवढे आयुष्य मला ईश्वराने दिले तेवढ्या आयुष्यात माझ्या सुगंधाने संपूर्ण जग भारावून जाते हे काय कमी आहे,,रात्रीच्या अंधारात हि सुवसाची बरसात करायला मला खूप आवडते,,,संपूर्ण आसमंत मी धुंद करते ,,,, निसर्गाशी बोलताना त्याच्याशी मैत्री करताना मग मैत्रीच्या कक्षा रुंदावत जातात,,,कारण ह्या मैत्रीत द्वेष नाही ,स्पर्धा नाही,फक्त आणि फक्त सपर्पण,,,सर्वांना आनंद देण्याची वृत्ती,त्याग,,ह्या सर्वांना मी विचारले कि ह्या सगळ्या गुणांचा फायदा तुम्ही स्वतः साठी का नाही करून घेत ? तुमचे रूप सौन्दर्य सुवास,ह्या सगळ्या बाबीनी तुम्ही ऐश्वर्यसंपन्न आहात ह्याचा उपभोग तुम्ही स्वतः का नाही घेत ? त्यांच्या उत्तराने मला निशब्द केले,,,अगं हे ऐश्वर्य ईश्वरदत्त आहे,,आमच्या ह्या जीवनाचे काही प्रयोजन आहे आणि ते आम्हाला समजले आहे ते आम्ही स्वीकारले आहे आणि अतिशय आनंदाने,,,जे कार्य ईश्वराने आमच्यावर सोपविले ते करण्यातच पुरुषार्थ आहे न ? मग वाईट कशाचे वाटून घ्यायचे ?जेवढे आयुष्य मिळाले तेच आम्ही सत्कारणी लावतो आहोत,,अगदी संतांच्या भाषेत सांगायचे म्हणजे 'तुझे कारणी देह माझा पडावा'हे आम्ही जाणले आहे ,,हीच आमच्या जीवनाची वाट आहे,,,आणि हि वाट सोडण्याचा प्रश्नच उद्भवत नाही',,,,हा सगळा संवाद मला खूप सुखावत होता,माझ्या जीवनाला एक वेगळी उंची देणारा होता,,,जीवनाच्या प्रति एक दृष्टिकोन तयार करणारा होता,,,,,मनात विचार आला मला हे सगळं जमेल,,? आता ह्या प्रश्नाचे उत्तरही त्याच संवादात होते,,,,,,,,,हो ,,,,,,,निश्चित,,,,,,,मलाही असेच जीवन जगायचे आहे,,,,,,निःस्वार्थ.

## २३ स्वामी चिन्मयानंद......एक

आज ८ मे प पू स्वामी चिन्मयानंद यांचा जन्मदिवस,. आज चिन्मयानंद हे नावसर्वांना परिचित आहे त्यांनी सुरवात केलेल्या चिन्मय मिशन च्या माध्यमातूनसंपूर्ण जगात वेदान्त प्रसार भारतीय संस्कृती, साहित्य सर्वांपर्यंतपोहचविण्याचे कार्य सुरू केले प. पू. स्वामीजी हे श्रेष्ठ तत्वज्ञ व शिक्षणतज्ञ होते त्यांचे विचार मूल्यशिक्षण व्यक्तिमत्त्व विकास यांचा प्रभावआजही दिसून येतो. जीवनात येण्याऱ्या आव्हानांना आपण कसे समर्थपणे तोंड देतोकसे यशस्वी होतो,त्यावरून समाजात आपली प्रतिष्ठा ठरत असते आणि आव्हानांनातोंड देण्यासाठी आंतरिक मन बुद्धीच्या शक्तीची आवश्यकता असते म्हणून फक्तसुदृढ व सुंदर शरीर ,शरीरावर आकर्षक पेहराव ,मौल्यवान दागिने,मोठेमोठेआलिशान बंगले ,बंगल्यासमोर लांबलचक गाड्या हे सर्व पुरेसे नाही अंत:करनशुद्धसात्विक व सशक्त करण्यासाठी बुद्धीला श्रेष्ट ज्ञानाने दिव्य करणेगरजेचे आहे मनाला निस्वार्थ भावना विचारांनी सुंदर होणे ,उच्च जीवनमूल्यांचे आचरण करून व्यक्तिमत्त्वचा विकास करने हा ध्यास चिन्मयनंदनीघेतला होता स्वामीजींनी आपले कार्य जास्तीत जास्ती लोकांपर्यंतपोहचविण्यासाठी विविध योजना चा स्वीकार केला त्यामध्ये लहान लहानअभ्यासवर्ग, बालविहार प्रौढांकरिता अभ्यासवर्ग स्त्रियांकरिता देवी ग्रुपयुवकां करिता युवा वर्ग तसेच संदीपनी साधनालाय सुरू केले. या जगातूनधर्म,जाती पंथ दूर व्हावा यासाठी त्यांनी विविध जगाला भेटी दिल्या यामाध्यमातून विविध धर्मांचे लोक एकत्र आले व या एकात्मतेमधूनच चिन्मय मिशन चाप्रारंभ झाला स्वामीजींच्या मते भौतिक गोष्टी मिळवण्यासाठी वेळ लागत नाहीतसेच त्या जाण्यासाठी सुद्धा वेळ लागत नाही म्हणून व्यक्तीनेया सुखाच्यामागे न लागता आपल्या स्वत:च्या विकासाकडे

लक्ष द्यावे परमेश्वरानेमानवालाविविध क्षमता दिल्या त्या माध्यमातूनच मानव स्वत:ची प्रगती घडवून आणू शकतोप्रत्येगोष्टीतून आनंद मिळविण्यासाठीपरमेश्वराने विविध सौंदर्यनिर्माण केले की ज्या द्वारे प्रेरणा निर्माण होईल म्हणून एकसमान वप्रमाणबद्ध सुंदर चर्च ,मंदिरे ,मशिदी बनवली बाळ घेतलेली मेडोनाची मूर्तीरचली गेली बुद्धाच्या ,देवांच्या मूर्तीतून एक लय ,एक ताल साधला गेला. काहीलोक देवळात चर्च मध्ये जात नाहीत त्यांना देवावर विश्वास नाही असेम्हणतात, पण अश्यांना निसर्ग आवडतो नदीचे झुळझुळ पाणी ,समुद्राच्या लाटांचीएक सुरातील सततची तालबद्ध खळखळ, वसंत ऋतू ची बहार ,हिमाच्छादित शिखरे हेसर्व मोहित करतात व यातच त्यांचे मन रमते पण या सर्वांचा अर्थ एकच की देवम्हणा किंवा सृष्टी म्हणा ,जिथे मनाची शांती तेथेच आनंद........तेथेचदिव्यत्वाची प्रचिती..... तेथेच देव !स्वामी चिन्मयनंदना ऑगस्ट १९९३ मध्ये ग्लोबल व्हिजन २००० या सन्मानाने पुरस्कृत करण्यात येणार होतेपण त्या पूर्वीच ३ ऑगस्ट १९९३ ला त्यांना समाधी प्राप्त झाली कोणत्याहीप्रकारच्या कामाचा मोबदला घेणार नाही ह्यात्यांच्या विचारावर ते ठामअसल्याप्रमाणेच त्यांनी महासमधी घेतली पण आजही त्यांचे कार्य त्यांचे विचारयांचे सर्वत्र अस्तित्व आहे अशा प्रकारचे सुंदर विचार असलेल्या प. पू.स्वामीजींच्या विचाराच्या सानिध्यात राहण्याचा योग मला माझ्या गुरू डॉ सौवसुधा विनोद देव यांच्या मुळेच आला स्वामीजींच्या विचारांची प्रेरणा घेऊनजीवन जगणाऱ्या माझ्या गुरू मला सतत माझ्या कार्यासाठी प्रेरणा देतात आजचाहा लेख हा सुद्धा त्यांच्याच प्रेरणेचा एक भाग आहे.......

......सौस्मिता गजानन जोगळेकर बुलडाणा.

# २४ मा डॉ बाबासाहेब आंबेडकर चळवळीतील अनभिज्ञ पृष्ठ




आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांची पुण्यतिथी,,,महापरिनिर्वाण दिन,,सर्वत्र साजरा होतोय,,,पू बाबासाहेबांच्या दलित चळवळीत अनेकांचे हातभार होते,,अनेक जाती धर्म संप्रदाय ह्यात सहभागी होते,,,

आज एक अशा जोडप्याच्या संदर्भात मी आपल्याला सांगणार आहे जो इतिहास आहे पण अशा कितीतरी गोष्टी पडद्याच्या मागे लपल्या आहेत,,,

अकोला जिल्ह्यातील अकोट गावं,,आणि ह्या गावातील लुकतुके हे घराणे,,,व्यवसायाने वकील असणारे श्री बिंदुमाधव लुकतुके आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ इंदिराबाई लुकतुके,,,अत्यंत पुढारलेल्या मताचे आणि व्यापक विचारसरणीचे हे कुटुंब,,,घरी सर्व जाती धर्माच्या लोकांची आवक जावक असणारे,,त्याचे काही कार्यावरून त्याची जीवनप्रणाली तर लक्षात येईलच पण त्यांचे कार्य किती महान होते तेही लक्षात येईल,,,,,,

जेव्हा पेयजल दलितांना मोकळे करण्याचे आंदोलन छेडले गेले त्यावेळी अकोट निवासी ''''सौ इंदिराबाई लुकतुके आणि बिंदुमाधव लुकतुके ''''अत्यंत उच्च विद्या विभूषित असणारे ब्राह्मण

जोडपे,,,ह्या जोडप्याने आपल्या घरची विहीर दलितांसाठी खुली केली होती,,,आणि ही ह्या गावातील पहिली विहीर होती,,,

ज्यावेळी प्रौढ साक्षरता हा शब्दही रूढ झाला नव्हता त्या काळात ही माऊली सौ इंदिराबाई लुकतुके ह्या हातात कंदील घेऊन दलित वस्तीत जात आणि त्या काळात त्यांनी प्रौढ साक्षरता वर्ग चालविले,,,कितीतरी महिलांना त्यांनी साक्षर केले,,,ही खूप महत्त्वाची माहिती,, ह्या चळवळीचा एक भाग म्हणजे त्याकाळात हरिजनसेवसंघ ठिकठिकाणी स्थापन होत त्याचा उद्देश दलितांची सेवा जनजागृती हा होता,,अकोट गावी हा हरिजनसेवसंघ श्री बिंदुमाधव लुकतुके ह्यांनी स्वतः पुढाकार घेऊन सुरू केला,,व तेथे सौ इंदिराबाई ह्या सेवा देण्यासाठी जात असत,,मुलांना अंघोळ घालणे स्वच्छतेचे धडे देणे ,त्यांना शिकविणे अशी आणि अनेक कार्य करीत,,,,हे जोडपे त्या काळी दलितांचे मायबाप झाले हरिजनसहभोजन हा उपक्रम जेव्हा स्वातंत्र्यवीरांनी सुरू केला तेव्हा अकोट येथे हा उपक्रम सर्वप्रथम श्री बिंदुमाधव ह्यांनी पुढाकार घेऊन सुरू केला,ज्या काळात ब्राह्मण कुटुंब वर अनेक आक्षेप होते त्या काळात ब्राह्मण कुटुंबाने आंबेडकर चळवळीत स्वत: सहभागी होणे आणि कोणत्याही प्रसिद्धी शिवाय,,,ही खूप महत्त्वाची घटना,,,,आणि म्हणून हे इतिहासाचे अनभिज्ञ पृष्ठ आहे,,,, मित्रानो मला अभिमान वाटतो की सौ इंदिराबाई लुकतुके आणि श्री बिंदुमाधव लुकतुके हे माझे आजोबा आणि आजी होते,,,माझ्या आईचे आईबाबा,,,,म्हणूनच समृद्ध वारसा असलेले घराणे माझे आजोळ आहे ह्याचा मला खरच अभिमान आहे,,,आज महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर ह्याच्या पुण्यतिथी महापरिनिर्वाण दिनी मला माझ्या आजी आजोबांची कार्याची आठवण येणे हे खूप प्रेरणादायी आहे,,,,,,,,


(ह्या लेखात वापरलेला हरिजन हा शब्द इतिहासाचा संदर्भ आहे म्हणून वापरला आहे,,,)

२५

# कोष?? नको

आज सतत पाऊस पडतोय,,मी कॉलेज मध्ये ,,आणि माझ्या खिडकीसमोरच एक सदाफुलीचे झुडूप,,आणि एक अस्वस्थ करणारे सृजन,,,

एका कोषातून एक जीव बाहेर पडण्यासाठी धडपडतेय,,अरेरे,,किती त्या वेदना,,किती ती धडपड,,नवीन जग अनुभवण्याची,,जीवनाचा आनंद घेण्याची,,त्या जीवाची तगमग सुरूच,,,त्याच्या वेदना जाणवतात आहेत मला,,, अरे,,पण हे काय??क्षणापूर्वी अत्यंत वेदनेने व्याकुळ जीव किती आनंदात भिरभिरतेय,,,चक्क फुलपाखरू आहे ते,,,माझी सदाफुली पण किती आनंदात आहे,,, सृजनासाठी कोष??




पण आपण आपल्या जीवनात आपल्या भोवती कोष का निर्माण करतो??आणि आपणच त्यात का जातो??नाही थोडे विपरितच आहे,,, माणूस आपल्याभोवती कायम कोष निर्माण करतो आणि त्याला त्या कोशात राहायला आवडतं,, कशाचे कोष असतात माहीत आहे? अहंकाराचे,गैरसमजांचे,संशयाचे,रागाचे,,आणि हो दुःखाचे सुद्धा!!! अरेरे!!!किती छोटं आयुष्य आहे,,सुरवंटाचे फुलपाखरू होताना किती आनंद आहे न !!अगदी वेदनेतही!! पण आमच्या कोषांमुळे ???दुखःशिवाय काय? मित्रानो निघा बाहेर तुम्हीच निर्माण केलेल्या कोषातून!!!वेदना होतील???होऊ द्या!!कोशाच्या बाहेर सुंदर जग वाट पाहते आहे,,, निघालं न कोषातून बाहेर???नक्कीच माझ्या सदाफुलीने मला वचनच दिले आहे तसे,,,,, (संकलित)

# २६ माणसे ओळखा

आपल्या सहवासात येणारी माणसे काशी ओळखायची??त्यांच्या बोलण्यावरून ?वागण्यावरून ? कुणाच्या मानातील कसे ओळखायचे?कोण खरं ??कोण खोटं??कसं ओळखायचं??




सगळे म्हणतात तुला माणसे ओळखता नाही येत,,,अस असते का?माणसे ओळखावी लागतात का??सगळे म्हणतात वेडी अहेस तू!!सगळे तुझ्याकडून फायदा करून घेतात स्वतः चा!!आणि तू??फायदा देताना आनंदी आणि नंतर??

हो होतंय खर अस!!पण मग काय करायचं??माझा सगळ्यावर खूप विश्वास आहे,,माझा माणसातील माणुसकीवर त्याच्या देवत्वावर विश्वास आहे!!तोडून टाकू तो!!मग जीवन कशाच्या आधारे जगू??

ते त्यांचा मला फसवण्याचा मार्ग नाही सोडत मग मी माझा मार्ग का सोडायचा??नाही नकोच सोडायला !!!

हो मी खरच माणूस ओळखत नाही कारण मला त्याच्यात कायम ईश्वराचेच अस्तित्व जाणवते,,,आणि मग सुरू होतो तो शोध,,,फक्त आणि फक्त चांगुलपणाचा,,,,प्रमाणिकतेचा,,,,माणसातील ईश्वर तत्वाचा!!!

आणि मिळतो तो असीम आनंद,,,आणि त्यालाच सर्व समजतात भाबडेपणा,,नाही आजच्या भाषेत बावळट पणा .(संकलित)

२७

# माझा फळा

फळा खूप दु:खी आहे आज,,खूप आक्रोश करीत होता,,आजकाल म्हणे त्याच्या कडे लक्षच नाही कुणाचे,,एकटा पडलाय ,,,खूप एकाकी वाटतंय त्याला,,काळाच्या ओघात एक एक सवंगडी हरवलेय त्याचे,,

.......ते गुरुजींचे हात जे रोज नवीन अक्षरे लिहीत होती,,

.........ते डस्टर ज्याने स्वत: च्या कर्तृत्वाने किती चुका पुसून टाकल्या होत्या,,कितीतरी नवीन अक्षरे आकृत्या ना धारण केले होते,,आयुष्यात काही चुकीचे लिहिल्या गेले असले तरी ते पुसून टाकून आपल्या जीवनाचा फळा स्वच्छ ठेवायचा हा धडा कितीतरी दिवसापासून देतोय तो,,

..........आणि हो तो खडू,,आता पार भुगा झालाय त्याचा,,,सर्वांनी आपल्या आयुष्यातून फेकून दिलाय त्याला,,,

.....खडू फळा डस्टर,,,,,हे तिघेही मित्र ,,,,शिक्षक विद्यार्थी घडविता घडविता त्यांचे रंग फिके पडत होते,,त्यांचे जीवन फाटून जात होते,,त्याचे जीवन संपून जात होते,,,पण स्वत: च्या संपण्यात नवीन निर्मितीचा किती आनंद होता तिघांना!!!

वेडे आहात रे तुम्ही तिघे!!अरे जीवन जगण्याचे नियम बद्दललेत रे सगळे!!!वैश्विक झालो न तेवढेच संकुचित झालो,,,ह्या मानवाच्या जगात आता माणसाचे मनही निर्जीव झाले रे!!!नका नाराज होऊ!!तुमचा वापर कितीही कालबाह्य ठरविला तरी शिक्षक म्हटला न तर तुमचा उल्लेख होणारच बघा!!!

,,,,,,,हो बरोबर आहे तुमचं की तुम्हाला माणसासारखे फुकट चे क्रेडिट नको आहे,,,मान्यच आहे रे बाबा!!!पण आता दु:ख किती करशील???

,,,,,,,,,,,,,काय म्हणतोस??मेकॉले आवडत होता???का रे

बाबा??असे नको न म्हणुस,,

........हो त्याने कमीतकमी शिक्षकाला तांत्रिक नव्हते बनविले,,,शिक्षक तंत्र स्नेही हवा ,,,मान्य,,,पण तो विद्यार्थी स्नेही केव्हा होणार???कुठे सुसंवाद आहे ग शिक्षक विद्यार्थ्यांचा???

.........हो रे बरोबर आहे,,खडू फळा डस्टर हे माझ्याच देशाचे मॉडेल आहे,,,

........पण आता स्वत:चे मॉडेल नकोच आहे रे कुणाला,,,मग तो माणसाचा विकास असो की देशाचा असो की विद्यार्थ्यांचा,,,सगळे परकीय मॉडेल,,,

........नाही,,,स्वतंत्र भारत परिपक्व झाला पण आम्ही तिघेही त्यांना भारतीय बनवायला असमर्थ ठरलो,,मेकॅलेंनी लावलेली बीजे फोफावली आहेत,,कोण उखडून फेकणार हे सर्व??कोण घडविणार भारतीय मन???

.........नका रे असा त्रास करून घेऊ,,,येईल पुन्हा सोनेरी पहाट येईल आणि ज्ञान सूर्य ह्या भारतावर अधिराज्य करेल बघ,,,,खूप उशीर झाला,,,पण वेळ अजूनही गेलेली नाही,,,,,



२८

# कच्चा लिंबू
# (उत्तर एका मानसिक गुंतागुंतिचे)

मंदार देवस्थळी व प्रसाद ओक ह्यांनी हे शिवधनुष्य पेलण्याची तयारी दाखविली ह्या संकल्पनेलाच मनाचा मुजरा,,,विशेष बालकांवर चित्रपट आलीत खूप शिकवून गेलीत ,,,पण ज्या मानसिक गुंतागुंतीचा विचार ह्या चित्रपटातून केला आहे त्याबद्दल संपूर्ण टीम चे मनापासून हार्दिक अभिनंदन,,,,




मी वेगळा विषय म्हणते कारण विशेष बालकांचे विशेष आईवडील ,त्यांच्या जीवनात नित्य व्यवहारात त्यांची होणारी घुसमट,,माझ्यानंतर माझ्या पाल्याचे काय हा सतत आयुष्यभर अस्वस्थ करणारा प्रश्न,,,हे मूल आपल्याच नशिबात का?हे भोग आपले केव्हा संपणार आहेत,,?वयात आलेले विशेष मुल जे आता पुरुष बनले आहे ,त्याच्या शारीरिक संवेदना सगळ्या जागृत झाल्या आहेत,जो आई आणि मादी ह्यातील फरकही समजू शकत नाही,,ते विशेष मूल तरुण झाले आहे ,त्यामुळे संसार सुख शरीरसुखाचा त्याग करणारे आणि अनैसर्गिक जीवन जगणारे आईवडील,,,माझ्यानंतर माझ्या मुलाचे काय ह्या चिंतेतून कष्ट करणारा ,मनाची घालमेल सतत सुरू असणारा पिता ,ज्याला असे मूल जन्माला येणे ही स्वत: चीच चूक वाटते आहे,,,!!

::::::::::::::::::::::::किती समस्या आहेत विशेष बालकांच्या आईवडिलांच्या आयुष्यात?? ह्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे

कोण देईल??त्याहीपेक्षा जेव्हा मूल तरुण होत तेव्हा आईवडिलांचा सुद्धा संसारसुखाबाबतची उदासीनता,,,एकीकडे आपले मूल ह्या सुखाला पारखे आहे ही बोचणी तर त्याचसोबत असे सुख मिळविण्याची स्वतःची उदासीनता,,,दोन्ही बाजुला शरीराला हवय पण प्रगट करू शकत नाही,,,मूल तरुण होत पण आईवडिलांचे वय वाढत असते,,,आयुष्याची उमेद संपत असते,,,नेमकी कोणती स्वप्न बघावी आपल्या मुलांसाठी हा संभ्रम ,,आपण आपल्या आपत्यासाठी पाहिलेली स्वप्न तशीच विरून जातात,,,इतरांच्या जीवनातील दोघेही नवराबायको आपल्या मुलांच्या प्रगतिकरिता झटताना पाहिले की विशेष पालकांची होणारी तगमग,,,सगळं कसं जीवघेणे असते,,,


अशा ह्या जीवनात एकच प्रश्न असतो Why only me ???पण सर्वसामान्य व्यक्तीला ह्याचे उत्तर नाही मिळत??

::::::::::::::::::;:;:::ह्या सर्व कोषातून बाहेर काढणारी व्यक्ती आयुष्यात मिळतेही,,पण पुन्हा प्रश्न ह्या नात्याचे नाव काय?? नायिकेला जी व्यक्ती मिळाली तो पुरुष आहे आणि फक्त तिच्या कोमेजलेल्या भावनांना तो फुलवतोय,,त्याचा स्वतः चा स्वार्थ काहीच नाही,,अगदी तिला तिचे सुख हवे आहे ही इच्छा तिच्या मनात जागे करणारा तो ,,,,झटतो फक्त तिच्या सुखासाठी,,,समाजाला हे मान्य नाही,,,वास्तविक ह्या नात्याचे नावच नाही,,,करण मैत्री म्हणावी तर त्याच्या पलीकडे हे नाते आहे आणि प्रेम म्हणावे तर तसे बंध दोघांमध्येही निर्माण झालेले नाहीत,,,कारण ज्या सुखाची इच्छा तो तिच्या मनात जगवतो त्याच सुखाची मागणी ती त्याच्याकडे करते,,,आणि तो वर वर ती मागणी मान्य करताना दिसतो पण तिच्याबद्दलचे शारीरिक आकर्षण त्याच्या ठिकाणी नाही वास्तविक तो सुद्धा त्याच्या संसारात अपूर्ण आहे,,,आशा संघर्षाच्या क्षणात तावून सुलाखून निघणारे नवरा बायकोचे नाते,,,विलक्षण,,,,

:::::::::::::::; अशी वादळे संसारात येणे हे प्रारब्ध आहे,,,खूप कुचंबणा आहे अशा आईवडिलांची,,,ही सगळी गुंतागुंत इतकी सुंदर ह्या चित्रपटातून सोडविली आहे,,आशा विशेष पालकांच्या आयुष्यात सर्वात भीषण प्रसंग येतो तो त्यांच्या मनात विचार येणे की माझ्या आधी माझे अपत्य देवाघरी गेले तर बरे!!! बापरे!!!किती भीषण आहे हे सर्व!!!!

:::::::::::::::::::::प्रसाद खूप चांगल्या विषयाला स्पर्श केलास तू,,,,जयंत दळवी सारख्या ताकदीच्या साहित्यिकांची कलाकृती पेलणे एवढे सोपे नव्हते ते तू पेललेस,,,समाजाला ह्या विषयाकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी दिलीस,,,खूप प्रश्नांची उत्तरे तू दिली आहेस,,,,सर्वात महत्वाचे ह्या चित्रपटाचा शेवट,, तू एका मोठ्या समस्येचे उत्तर दिलेस,,,,,,,,

:::::::::::::::::::::अप्रतिम अभिनयाचे वारसदार हे आपली कसदार भूमिका साकारताना प्रत्यक्ष जीवन अवतरीत होते,,,अभिनंदनासाठी रसिक म्हणून माझ्याकडे शब्द नाहीत,,,,,प्रसाद तुझ्या ह्या कार्याची नोंद निश्चित पणे विशेष मुलांच्या विशेष पालकांनी घेतली आहेच,,,,पण बाकी समाजाचे काय रे???असो कुणीतरी सुरवात करायला हवीच होती,,,समाज काय ????असो शेवटी खरेच आपण सर्वच कच्चे लिंबू आहोत,,,,,,,,,,



२९

# ब्रह्मसूत्र

*(प पू डॉक्टरकाका देशमुख ह्यांच्या प्रवचन पुस्तिकेवर आधारित डॉ सुनील लुले यवतमाळ ह्यांनी केलेल्या विवेचनाचा सार)*

अध्यस्थ अधिष्ठानाची विचार करण्याची शास्त्र अभ्यासाची जी पद्धत आहे तसाच तो करावा,,,अध्यस्थ बदलणारा व अधिष्ठान कायम,,,अध्यास गेला की अधिष्ठानालाही अर्थ राहत नाही,,,अध्यस्थ दूर होईल त्यावेळी जे आहे ते आहे,,,अध्यस्थ आले किंवा गेले हे अज्ञानामुळे भासते ,,जे कायम स्वरूपी आहे ते अधिष्ठान मी आहे,,

माझा देह हा अध्यस्थ आहे तो आल्यासारखा वाटतो म्हणून तो गेल्यासारखा वाटतो,,,मग मी किती देहबुद्धी ठेवावी,???,,मी जन्मोलोच नाही त्यामुळे माझ्या मृत्यूचा प्रश्नच उद्भवत नाही,,आणि हे मला आधीच समजले पाहिजे,,म्हणून शरीराचे जास्त चोचले पुरविण्यापेक्षा त्याचा उपकरण म्हणून चांगले सांभाळायचे,,त्या शरीराला मनात जागा द्यायची गरजच नाही,,,

माझा देह अत्म्यावरचे अध्यस्थ आहे व जगत हे ब्राह्मवरचे अध्यस्थ आहे,,मृत्यू शरीराचा होणार आहे पण माझे अधिष्ठान मीच आहे,ते माझ्यापासून वेगळे नाही त्यामुळे ते माझ्यापासून वेगळे असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही,,,हे सर्व न कळल्याने मग माझा परमार्थाची हास्यास्पद होतो,,,मी आत्मरुप आहे ही समजणे ह्याला वस्तू सिद्धी म्हणतात,,,ती कर्माने प्राप्त होणार नाही,,ती आत्मरुप होऊनच होईल,,परमार्थाच्या नावाने केलेल्या कर्माचे प्राबल्य आहे तोवर आत्मसिद्धी शक्य नाही,,,परमार्थाच्या नावाने केलेल्या कर्माचा आपण डंका पीटतो,,,त्याचा अहंकार निर्माण होतो,,कर्माचा ससेमिरा हा वाढणारा असतो,,,कर्माचा सोस वाढतो आहे,,,पण कधीतरी कर्मही संपायला हवे,,आतातर पारमार्थिक कर्माला सामाजिक रूप आले आहे,,कर्म निष्कमतेने केले तर चित्तशुद्धी होईल पण आत्मज्ञान होणार

नाही,,,अंतरंग साधन व बहिरग साधन आहे,,साधन सवधतेने व्हायला हवे,,साधन हे साध्य नाही ह्याचेही भान असावे,,,साधनेचा संबंध स्वीकासनाशी आहे,,,थोड्यावेळात खूप काही साध्य व्हावे असे आपणास नेहमी वाटते,,,पण आपली साधना विकासाच्या वाटेवर गेल्यानंतर धोपटमार्ग सुटायला हवा,,,सरधोपट मार्गावर चालत असताना कधीना कधी संत भेटतात आणि ते आपल्याला पुढील मार्ग दाखवितात,,,प्रत्येक साधनांची उपयुक्तता व मर्यादा आहे,,म्हणून उपयुक्तता समजून घ्यावी व मर्यादा ओळखून थांबता आले पाहिजे ,,,तसेच कर्माने चित्त शुद्धी,,,उपासनेने निष्काम कर्मभाव होईल,,पण त्यापुढील मार्ग मिळत नाही,,, प्रत्येक गोष्टीची मर्यादा मूल्य उपयुक्तता आहे ती आपणास कळायला हवी,,,उपासनेने निष्कमता निर्माण होते ह्या भावनेने झालेली उपासना योग्य आहे,,,कर्म उपासना आणि ज्ञानालाही मर्यादा आहे,,सगळे साधन मार्ग चांगलेच आहे,,आपापल्या कुवतीनुसार ह्या मार्गावर वाटचाल करावी कुणीही कुणाला नावे ठेऊ नये,,,


सद्गुरूंनी साधन दिल्यावर इतर कर्मसाधना करण्याची गरजच नाही,,पण आपल्या मार्गाने श्रद्धेने पुढे गेले पाहिजे,,,एकदा भासचा निरास झाला की अधिष्ठानालाही अर्थ राहत नाही,,,जीवनात विषय विचारांना काहीच स्थान नाही,,,ह्याला जीवन म्हणता येणार नाही,,,जिवंत आहे म्हणून जीवन असे म्हणता येणार नाही तर,,स्वरूपामुळे जीवन आहे,,आणि ह्या स्वरूपाला जाणणे हे जीवन आहे,,,प्रत्येक साधन मायिक आहे,,,माया तिच्या निवृत्तीचं साधन साधकाला देते,,म्हणून साधनेचेच अभिमान नसावा,,,यथार्थ चिंतनाने भ्रमनिरास होतो,,रामकृष्णहरिओम,,,,,,,,,

३०

# ब्रह्मसूत्र प्रवचन

*(प पू डॉक्टरकाका देशमुख ह्यांच्या प्रवाचनावर आधारित डॉ सुनील लुले यवतमाळ ह्यांचा विवेचनावर आधारित)*

संतांची प्रतिज्ञा व माझी जीवनशैली ह्याचा मेळ,,, आवाघांची संसार सुखाचा करिन,,,ही संतांची प्रतिज्ञा आहे,,,माझा संसार मला कसा केला पाहिजे,,,माझ्या अस्तित्वाने कुटुंबात आनंद निर्माण व्हायला हवा,आपले जीवन आनंदानेच व्यापले पाहिजे,,,आपण ही




साधक म्हणून प्रतिज्ञा केली आहे,,,ह्यासाठी प्रत्येकाने स्वत: ला तपासावे लागेल,,,विषयाच्या उपलब्धतेतून येणाऱ्या शांती प्रसन्नता ह्यावर साधकाने विसंबून राहू नये,,ही जबाबदारी माझीच असावी,,,ह्यासाठी माझे अंत:करण आनंदाने व्यापक तेव्हा हे जमेल ह्यासाठी मला आनंदाचीच अभ्यास करावा लागेल,,,पण मला हे जमलाय का?हेस्वत: ला विचारावे लागेल,,पण मला दु:ख उगळण्याचे व्यसन लागले आहे छंद लागला आहे,,,त्याशिवाय मला चैन पडत नाही,,प्रत्येक क्षणी माझा आनंद बिघडू द्यायचनाही,,,करण मला आनंदरूप व्हायचे आहे,,माझे कायम लक्ष हे इतरांच्या वागण्याकडे जास्त असते,,,पण आधी स्वत: चा वर्तनाकडे लक्ष द्यावे

लागेल,,,आत्मनो मोक्षर्थ ही दृष्टी महत्वाचे आहे,,,इतरांचा संसार आपण आनंदी करू शकत नाही,,आपल्याला आपला संसार आनंदाचा कसा करायचा ह्याची दृष्टी प्रथम आपण ठेवली पाहिजे,,,आनंद हा स्वतः प्रकाशक आहे,,स्वतः तो प्रकाशीय नाही,,त्याचे प्रकाशनाची गरज नाही,,,तो आत्मा मी आहे ,,मी आनंदरूप आहे हा निश्चय महत्वाचा आहे,,,,त्याच्या प्रकाशनाने देहादी जगताचा बाध होतो आणि सर्व व्यापाकाचा बोध होतो,,,अपरोक्षनुभूती महत्वाची आहे,,,आणि सातत्याने जगताचा बाध करता करता ही प्रक्रिया आपोआप होते,,,मग वेगळा बाध करावा लागणार नाही homiopathy मध्ये differencial diagnosis असते,,पण हे सुरवातीला,,,नंतर मात्र एकदा सर्व झाले की इतक्या प्रक्रिया कराव्या लागत नाही,,,त्या सहज घडतात,,एकदा बाध प्रक्रियेची सवय करून घ्यावी लागेल,,,तरंग विरून गेले पाहिजे त्यांनी मनाचा शांत डोह व्यापायचा नको,,,असे घडले तर जगत बाध होऊन आत्मबोध होईल ,,,प्रत्येक घटकांचे अधिष्ठान आत्मा आहे ,,,ज्ञान कशाचेही होवो पण मीच ज्ञानरुप आहे हे कळले तर ज्ञानाबाबतची सुद्धा वणवण थांबते,,,,मी कुटस्थ आहे हा निश्चय महत्वाचा आहे,,,ज्ञानासाठी साधन कोणते आहे???सध्या साधन विवेक महत्वाचा आहे,,,,पण जे नित्यप्राप्त आहे ते साध्य कसे असू शकेल,,,तेच मी आहे मी नित्यप्राप्त आहे,,,मी नित्य सिद्ध आहे,,,जो कायम माझ्याजवळ आहे त्याच्या प्राप्तीची धडपड कशाला??? ही धडपड करणे हिभटकांती आहे,,,पण आत्मा मिळवायचा आहे ही आपली भाषा बदलली पाहिजे,,मी स्वयंप्रकाशित आहे,,मी आत्मा आहे नित्य उपलब्ध आहे म्हणून तो मिळवला लागत नाही,,,आणि म्हणूनच आत्मज्ञान मिळवणे अतिशय सोपे आहे फक्त त्यावरचे अज्ञानाचे आवरण दूर करावे लागेल,,,पण घडतेकाय की मी आत्मा आहे ह्याचा मला विसर पडला आहे,,,ज्याचा अनुभव घ्यायचा आहे

तो मी आहे हे मला कळताच नाही,,नसतो विद्यते भावो,,,,आत्मा आहे व नाहींअसें म्हणणार्याला सुद्धा आत्मा कळलं आहे असे म्हणता येणार नाही पण हातत्वाने जाणता येई,,,अज्ञान जस जसे दूर जाते तसतसे ज्ञान अनावृत्त होत जाते,,,,आपल्याला अध्यास चा अभ्यास करावा लागेल आणि अध्यास म्हणजे ज्ञानाला जे विरोधी आहे ते,,,उदा,,उजेडाच्या विरोध करणारे अंधार आहे,,ह्याला अध्यास म्हणतात,,,पण ह्या अभ्यासातून मला वेगळा अनुभव आला पाहिजे अशी अपेक्षा नको,,,नित्य प्राप्तची प्राप्ती हे अध्यात्माचेमूळतत्व आहे,,,सगळ्या संतांनी अज्ञानाची निवृत्ती केली आणि आत्मतत्वाला जाणले हे मला करता येईल का???जेव्हा मला ज्ञानही हे सुद्धा ज्ञानाच्याच प्रकाशात कळते,,,पण मी आत्मा पहिला हे अज्ञान आहे,,,माझ्या जीवनात ज्या जुन्या गोष्टी ठाण मांडून बसल्या आहेत त्यांना प्रयत्नपूर्वक हलवले पाहिजे,,,ह्यासाठी जुन्या विचारांच्या खोड्या मोडायचा आणि नवीन शास्त्र घड्या बसवून घ्याव्या लागतील,,,,ही जीवन दृष्टी काकांनी आपल्याला दिली आहे,,,ह्यासाठी आपल्यात बदल घडवून आणावा लागेल,,,ह्या घड्या बुद्धीत बसवाव्या लागतील,,,,शास्त्र नियमाप्रमाणे वागले तरच जुन्या खोड्या जातील,,,पण ही बाह्य व्यवस्था नाही बाह्य प्रक्रियाही नाही ती अंतर्गत अवस्था आहे,,,,,स्वस्थ चित्ताने साधना करण्यासाठी ह्या बाबी महत्वाच्या आहे,,,ह्यासाठी डोक्याला थोडा त्रास द्यावा लागेल मग मात्र जीवनाचा त्रास कमी होईल,,,रामकृष्णहरिओम,,,,




३१

# ब्रह्मसूत्र

*(ब्रह्मसूत्रांचे अतिशय सुरेख विवेचन डॉ काका देशमुख ह्यांच्या प्रवाचनावर आधारित डॉ सुनील लुले यवतमाळ ह्यांनी केले त्याचा सारांश)*

काळ ह्या संकल्पनेने आपले जीवन व्यापून टाकले आहे,,,,काळाच्या प्रकाशकांचा विचार केला मी काळापासून दूर होऊ शकतो ,,,काळाचा प्रकाशक आत्मा आहे,,असा विचार केला तर माझे जीवन साधनाभिमुख होईल आणि साधनेचा उद्देश आनंदाची प्राप्ती आहे म्हणून माझे जीवन आनंदांभिमुख असेल,, उद्या जे करणार त्या कल्पनेत असतो तेव्हा मी काळात असतो,,,ह्याचाच अर्थ मी काल ह्या संकल्पनेत मी रमतो,,,पण ज्यावेळी काळ मला स्पर्श करतो तेव्हा काळाचा प्रकाशक आत्मा तो मी आहे,,ह्यानेच काळ माझ्या साधनाभिमुख झाला,,,जीवनाचे ध्येय आनंद आहे म्हणून आनंदांभिमुख,,,आणि जीवनातील प्रत्येक गोष्टीचा उपयोग साधनेसाठी करता येईल म्हणून जीवनाभिमुख ता असावी,,, आपले जीवन आनंदांभिमुख करण्याची जबाबदारी माझीच आहे आणि त्या साठी माझ्यातील खोडा मला मोडव्या लागतील,,, माझ्या मध्ये ५०।५० आशा चांगल्या वाईट बाबी असतील तर माझ्यातील जशा वाईट बाबी मी काढत गेलो तर माझ्यातील चांगल्याची संख्या वाढेलच पण वाईट बाबी कमी कमी होतील,,,आणि स्वत: ला ह्यासारखे घडवता येईल,,,त्यासाठी स्वत: च्याच मनाची सर्जरी करावी लागेल,,,ह्यासाठी मनाला सुंदर बनवावे लागेल आणि मन सुंदर असेल



तर जीवन सुंदर होईलच spiritual naturality ह्यालाच म्हणतात,,,हे सर्व मलाच करायचे आहे,,,मला स्वत: ला घडवावे लागेल,,,आपल्याला आपल्या मनाला मोडता घालून त्याला घडवावे लागेल,,,आपण बाह्य गोष्टी सगळ्या करू पण स्वत: चे मनाची स्वत: सर्जरी करायची वेळ आली तर ती करीत नाही,,,माझ्या मनाचा संताप विकार मलाच घालवावे लागेल,,संत तुकाराम महाराजांना समाजानी खूप त्रास दिला ,पण महाराजांनी ते सहन केले करण त्यांच्यात शक्ती होती असे आपण म्हणतो ,,,मग मी असे करून शकणार नाही का??माझ्या मनाचा संतापाचा निखारा निवला पाहिजे,,,हा संदेश आपण तुकारामांच्या जीवनातून संदेश घ्यायला हवा,,,हा जबाबदारीचा परमार्थ आहे,,जीवन हे साधनाभिमुख बनायला हवे,, भविष्य काळात रंगायचे नाही भूतकाळात रमायचे नाही,,,भूतकाळाचा उपयोग आपले वर्तन योग्य करण्यासाठी करावा,,,पण भूतकाळाला धरून ठेऊ नये,,,भविष्यकाळातील पसारा संपतो भूत काळाचे चितन संपले ह्यामधील जी अवस्था आहे तिला समाधी म्हणतात,,,तीनही काळात स्वरूपाचे चिंतन अनुसंधान कायम राहिले तर जीवन साधनाभिमुख होईल,,,प्रत्येक वेळी काळाचा विचार करताना ही दृष्टी महत्वाची आहे,,,साधनेचे रूपांतर ध्यानात व्हायला हवे,,ध्यानाचे रूपांतर स्वरूप अनुसंधानात व्हायला हवा,,,,पण आपण आपल्या जीवनात वेगवेगळे रस्ते शोधत राहतो आणि स्वरूपाच्या अनुसंधानापासून दूर जातो,,हे आपल्याच हाती आहे,,,आपण अशाच गोष्टींचा पाठपुरावा करावा ज्या माझ्या साधनेसाठी पूरक असतील,,,जे माझ्या साधनेला पूरक नसतील त्या गोष्टींचा खुशाल त्यागकरवा,,,जीवनाची वाटचाल करणे हे आपले काम आहे रास्ता दाखवायला श्रीगुरु समर्थ आहेत,,,,,,आपण ध्यानाला बसल्यावर घरातील आवाजामुळे ध्यानात व्यत्यय निर्माण होतो अशी एक साधकाची तक्रार असते,,,ह्याचाच अर्थ मला

सातत्याने कानाचे स्मरण आहे पण आत्म्याचे नाही आपण Adachan Master  असतो,,,साधनेत आशा असंख्य अडचणी येतात असे आपण सांगतो,,,जीवनात काव काव ऐकू येणार आहेच,, माझीही काव काव इतरांना ऐकू येणार आहे,,ह्या दोन्हीही काव काव थांबविता येईल का??किती आपण इतरांच्या जीवनात हस्तक्षेप करतो???खरच ह्याची गरज आहे का???आपली आपण गुंडशाही चालविण्याचा प्रयत्न करतो ,,,आपले विचार थोपतो आपण,,,मला माझ्या जीवनात हवे नको सगळे ऐकावे लागणारच आहे,,ह्यासाठी माझी मनोभूमी तयार नको का???

माझे first nature  हे ब्रह्म आहे ,,माझे second nature  हे साधना असायला हवे आणि ही साधना ब्राह्मभिमुख असावी,,,मी आनंद रूप आहे हे माझे first nature हे अज्ञानाने झाकले आहे,,,माझ्या second nature  च्या आधारे म्हणजेच साधनेच्या आधारे ह्या आवरणाचा thikness हा कमी कमी होत जाईल आणि एक दिवस हे अवरणही गळून पडेल,,,आणि हळू हळू second nature  हे माझे  first nature  बनेल,,,आणि असे घडले तर जीवनच साधनाभिमुख बनेल, जीवनातील प्रत्येक घटना प्रसंग ह्याचा प्रकाशक आत्मा आहे आणि तो मी आहे मी आद्य आहे मी अनादी आहे हा निर्णय पक्का असावा,,म्हणून मला माझ्या जीवनाबद्दल कालातीत विचार करायला हवा,,परिस्थितीच्या अतीत विचार करायला हवा,,आणि ह्याला प्रकाशित करणाऱ्या तत्वाच्या अनुसंधान कायम असावे,,, मला एकदा खऱ्या आनंदाची प्राप्ती झाली तर भूतकाळात काय झाले भविष्यात काय घडेल हा विचारच संपून जाईल आणि हा विचार संपला की माझा वर्तमान पण चांगला होईल,,,हा डॉक्टर काकांनी आपल्याला शब्द दिला आहे पण ह्यासाठी आपल्याला बदलावे लागेल,,,आपल्याला खूप सुंदर जीवन जगायला आपल्या गुरूंनी शिकविले आहे,,,हे आपणच करायला हवे,,,,,,

३२

# मैत्री?? राहूनच गेली

मैत्री ही पण आता दिखाऊ झाली का??जी नाती ईश्वर बांधायला विसरला त्याच्यासाठी म्हणे त्याने मैत्री घडवली??पण त्याची अभिव्यक्ती करण्यासाठी मला वेगळे काही का करावं लागतं ?आणि आजचा दिवस कुणी ठरविला मैत्रिदिनाचा??इतिहास वाचला का कुणी??नाही न!!असू द्या!!मैत्री ह्या नात्यासाठी आपण एक दिवस देतो आहोत हे ही काही वाईट नाही,,,,

पण मैत्रीचा अर्थ आपण खरच ओळखला आहे का??कोणत्या मैत्रीच्या आदरार्थ आपण आजचा दिवस साजरा करतो??आपल्याला कितीतरी जणांशी अजून मैत्री करायची बाकी आहे,,

ह्या धरतीशी मला मैत्री करायची आहे,,खूप अत्याचार होतात आहेत तिच्यावर ,,ग्लोबल वॉर्मिंग पासून तिला वाचवायचे राहूनच गेले,,,,माझे सोयरे वृक्ष ,,खूप नेस्तनाबूत होत आहेत ती ,,,किती नि:स्वार्थ प्रेम करतात माझ्यावर ,,हा निसर्ग !!!मैत्रीचे नाते शिकावे तर त्याच्याच कडून,,,निर्मिती स्वत: करतो पण उपभोग मात्र मानवाला व अखिल प्राणिमात्राला करायला सांगतो,,,,त्यांना फ्रेंडशिप बेल्ट बंधायचाच राहिला,,,,,सीमेवर माझे बांधव लढतात आहे आपल्याशी नाते निभावतात आहेत, माझ्यासाठी आपले प्राण पणाला लावतात आहेत त्यांना सांगायचेच राहिले की तुम्ही माझे best friend आहात,,,,,माझे म्हातारे आईवडील आहेत त्यांना मैत्रीचे एक गुलाब द्यायचाच राहिला आहे,,खूप अभिमान वाटतो त्यांना माझा,,माझ्यात सकारात्मकता,जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन दिला त्यांनी,,,,,,,माझी कितीतरी अपंग दिव्यांग बालके आहेत त्यांना मी आधार देईल त्याच्या पाठीशी मी खंबीर उभी राहील,त्यांची मैत्रीण म्हणून मी त्यांच्या न्यायासाठी लढेन ह्याबाबत त्यांना आश्वस्त करायचे राहूनच गेले,,,वृद्धाश्रमात माझे कितीतरी माय बाप माझी वाट पाहत आहेत ,,,माझ्या येण्याची ,,,त्यांना माझा फक्त थोडा

वेळ हवा आहे,,त्यांना फक्त थोडा माझा मायेचा स्पर्श हवा आहे,,गेले कित्येक वर्षांपासून प्रेमाच्या स्पर्शासाठी आसुसलेले आहेत त्यांच्या डोक्यावरून हात फिरवायचा राहूनच गेला,,,माझी खूप अनाथ बालके आहेत ,,,आई वडिलांची वाट पाहत आहेत,,त्यांच्याशी मैत्री निभावायची होती,,त्यांना आईवडील मिळवून द्यायचे होते,,त्यांना अगदी माझ्या डोक्यावर आहे तसेच माहेरचे छत्र मिळवून द्यायचे राहूनच गेले,,,माझ्या खूप शेतकरी बांधवांनी आत्महत्या केली,,त्यांची कुटुंब खूप हाल अपेष्टा सहन करतात आहेत,,त्यांना खूप शिकवायचे ,,,त्यांच्यात जीवनाबद्दलचा सकारात्मक दृष्टिकोन विकसित करण्याचे राहूनच गेले,,,आणि हो मैत्रीच्या नावाखाली वापरली जाते आहे माझी मुलगी माझी बहिण,,,मानसिक खच्चीकरण होतंय तीच,,मैत्रीच्या नावाखाली तिची होणारी फसवणूक ,,,तिच्यावर होणारा भावनिक अत्याचार,,तिला सावध करायचे राहूनच गेले,,

माझ्या मुलींना खूप त्रास दिला त्यांच्या मित्रांनी,,अगदी ॲसिड टाकून विद्रुप केले त्यांना,,,कसे सुरू करायचे त्यांचे नवीन जीवन??त्यांना नवीन जीवनाचा मार्ग दाखवायचा राहूनच गेला,,,ज्यांनी माझा अपमान केला,द्वेष केला,राग केला,,,,आशा लोकमुळेच तर आपल्यातील सत्व जागे होते,,आयुष्याचा खरा अर्थ कळतो,,,,आयुष्यात एक नवीन भरारी मारता येते,,,,त्यांना मैत्रीचा गुलाब घ्यायचाच राहिलाखूप सोपं असत का मैत्री करणं??खूप काही सुटलंय का मागे???काही चुकतोय का आपण??? कसा साजरा करायचा मैत्री दिन???आणि तो ही एकच दिवस???आणि तो ही कुणीतरी सांगितला म्हणून???त्यापेक्षा एक करूया न प्रत्येक दिवस मैत्रीचा समजू या न,,,एकमेकांना समजून घेऊ,,

**भूता परस्परे जडो मैत्र जीवांचे!!!!!**कोणाबद्दल राग नाही द्वेष नाही,असूया नाही,,आहे फक्त आणि फक्त मैत्री,,जीव ओवाळून टाकणारी,,,जीवघेणी नको,,,,चला साजरा करूया प्रत्येक दिवस

# ३३ आम्हाला स्पेस द्या

हे स्पेस देणं म्हणजे काय??,,,खूप विधाने मला ऐकायला मिळतात,,आम्हाला थोडी स्पेस द्या,आपल्या मुलांना आपण स्पेस द्यायला हवी!!आई वाडीलांनो आम्हाला जरा स्पेस द्या!!कुणाशी मतभेद झाले की थोडी स्पेस द्या!!आम्हाला मोकळा श्वास घेऊ द्या!!ही सगळी विधाने ऐकली की स्पेस ह्या शब्दबद्दल चे एक उत्सुकता मनात निर्माण होते,,,,मी स्पेस च्या सगळ्या परिभाषा पहिल्या,,,सगळ्या स्पेस च्या परिभाषा विविध विषयाच्या अनुषंगाने निरनिराळी असेल पण आपल्या जीवनासाठी ह्यातील कोणती परिभाषा योग्य ठरेल,




Yesssss ,""Area that is empty and available??""

शेवटी आपल्याला स्पेस हवी म्हणजे कुणाला हवी??अर्थात माझ्या मनाला??कोणती स्पेस हवी जी रिकामी आहे??आणि जी उपलब्ध आहे?? मग ही रिकामी जागा कोणती आणि ती कुणी भरून काढायची??अशी पोकळी जर आयुष्यात निर्माण झाली तर आपण जगू शकू??स्पेस देता देता समोरच्या व्यक्तीच्या मनात पोकळी निर्माण होते आहे ही पोकळी इतकी विशाल बनत जाते की त्या पोकळीत मग आपणच हरवून जातो,,,नाती हरवून जातात ,,,,प्रेम हरवून जातं,,,,

दुसरी एक परिभाषा माझ्या वाचण्यात आली ती अशी की ' free-dom to live,think,and develop in a way that suites one"" ह्या परिभाषेचा पहिला शब्द मला खूपच महत्वाचा वाटतो जगण्याचे

स्वतंत्र म्हणजे काय?? कसेही जगणे ह्याला जगण्याचे स्वतंत्र म्हणता येणार नाही कारण स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नाही ,,,आपल्याला रस्त्याने जाण्याचे अगदी कुठेही जाण्याचे स्वातंत्र्य आहे पण ते डाव्या बाजूनेच ,,,ह्या तत्वांचा वापर आपण केल्यासwrong side आपल्याला जाण्याचे स्वातंत्र्य नाही हा मनावर संस्कार होणे किती आवश्यक आहे ,,,,

आपल्या जगण्यावर अनेकांचे जीवन अवलंबून असते,, जीवन जगताना मला ह्या तत्वांचा वापर करावाच लागणार मग स्पेस देणे म्हणजे शिस्तीत राहून नियमात राहून जीवनाचा विचार करणे असेच होईल नाही का?? freedom to think हा पण एक अर्थ आहे,,,, विचारांचे स्वातंत्र्य बरोबर आहे ,,,,प्रत्येकाचे विचार एकमेकांशी जुळणार नाहीत पण ते परस्पर पूरक तर असलेच पाहिजे न,,, माझे विचार सर्वांना पटतील असे नाही, पण मी जो विचार करेल त्याच्यावर बुद्धीचा पगडा नको का ???जीवनात योग्य निर्णय घ्यावे लागतात ,,विचारांचा परिणाम हा इतरांवर होत असतो ह्याची जाणीव मनामध्ये विकसित व्हायला हवी,,,, आणि ह्या सर्वांच्या माध्यमातून आपल्याला सहज झेपेल त्या पद्धतीने स्वतः चा ,पर्यायाने कुटुंबाचा, समाजाचा विकास करणे इतके अर्थ त्या स्पेस शब्दात आहे ,,,पण हा सगळा आशय हारविला आहे आणि आम्ही स्पेस ची संकल्पना केली की,, आमचे जेवढे विश्व आहे त्या विश्वात आता आम्हाला कुणी नको,आम्हाला जरा मोकळं सोडा ,,,आम्हाला मोकळा श्वास घेऊ द्या ,,,असे म्हणत असताना आपण आपल्याच आयुष्यात न भरून निघणारी पोकळी तयार करीत असतो आणि आपली स्पेस मनाची भावनांची संकुचित करीत असतो ,,,,पण लक्षात घ्या माणसाला सर्वांची गरज असते ,,,,किती जणांची?? ते आपण सांगू शकत नाही ,,,मग मला स्पेस हवी आहे असे तर आपण म्हणूच पण त्याच बरोबर एक पुढचेही वाक्य बोलू की '''मला स्पेस हवी आहे

आणि माझ्या स्पेस मध्ये मला तुम्ही हवे आहात ,,तुमचे विचार, तुमचे अनुभव ,तुमचे प्रेम, ह्या सगळ्या गोष्टी माझ्या विचारांना उंची तर देतीलच पण, त्याच सोबत माझे जीवन सुसह्य समृद्ध करतील ,,,,मी विकसित होईल,,''''

एकमेकांना वेगळी स्पेस देण्यापेक्षा एकमेकांच्या स्पेस मध्ये या न,,, स्वतः ची स्पेस आणि विचारांचा नात्याचा परीघ मोठा करा न,,,, पहा कुणालाही एकटेपणा वाटणार नाही ,,,,प्रत्येकाने प्रत्येकाच्या स्पेस मध्ये राहून बघा न,,, एकमेकांच्या प्रेमाने ही स्पेस इतकी मोठी होऊ द्या,,'''की स्पेस नावाच्या अवकाशालाही वाटेल की मी किती लहान आहे''''',,माझ्या मुलांना मला स्पेस ही संकल्पना आशा पद्धतीने सांगता येईल?? मुलांनो आपल्या स्पेस मधून माणसे नाती वजा करू नका,,, करता आलाच तर गुणाकार बेरीज करा आणि एकाकीपण ने भागून टाका त्यांना,,, हेच तर spece and time चे गणित आहे,नाही का???

हो ठरले मला माझ्या जीवनात स्पेस हवी आणि त्या स्पेस मध्ये मला तुम्ही सर्व जण हवेत,,,माझे विश्व समृद्ध करण्यासाठी,,,मला आनंदाने जगण्यासाठी,,,माझ्या स्पेस मध्ये मला तुमच्यासारख्या समृद्ध लोकांसोबत राहायचे आहे,,,आणि नात्यांना नव्याने जाणयचे आहे,,जेथे समज गैरसमज नाहीत,,जेथे माझे हा शब्द नसेल ,,,जेथे फक्त आपण सर्व हा शब्द असेल,,जेथे संकुचितता नाही विशालता असेल,,,जेथे चांगल्या वाईट सकट आपले म्हणण्याची स्वीकारण्याची भावना असेल,,,हो ह्यालाच तर स्पेस भरणे म्हणतात,,,आणि माझ्या छोट्या आयुष्यात ही स्पेस इतकी मोठी व्हावी की मानवतेची एक साखळी बनवावी,,,जात धर्म संप्रदाय लहान मोठा,गरीब श्रीमंत,,,ह्या सगळ्यांच्या पलीकडे हे समृद्ध असे माझे विश्व,,,,,माझी स्पेस,जी खूप व्यापक आहे,,,

३४

# मन्मथ ,एकदा तरी ये,,!!

आज सकाळी बातमी आली ,मन्मथ चा मृत्यू. आणि सर्वदूर चर्चेला पेव फुटले .मन्मथ ची आत्महत्या?हत्या?की अपघात??काहीही असू दे पण आज एक हुशार इंजिनिअर, जे कदाचित भविष्यात भारताचे खूप मोठे बनले असता तो ह्या जगात नाहीये. मनाला खूप दु:ख झाले .

मुलगा कुणाचाही असू देत पण आई ह्या भूमिकेतून पाहते तेव्हा तो मला माझा मुलगा वाटतो .शिक्षिका ह्या भूमिकेतून बघते तेव्हा तो मला माझा विद्यार्थी वाटतो, आणि सर्वात महत्वाचे की तो युवा पिढीचे प्रतिनिधित्व करतो.

त्याची कौटुंबिक पार्श्वभूमी काय त्याचे शिक्षण काय नेमके काय घडले ह्या कोणत्याच मुद्द्यावर विचार करण्यापेक्षा आज युवकांमध्ये जी मानसिकता निर्माण होते आहे त्याची करण मीमांसा खूप महत्त्वाची आहे जबाबदार कोण ?हा पण प्रश्न उद्भवतोच.

मी तरुण विद्यार्थ्यांच्या वर्गाला शिकविते .मला ही अनेक प्रश्न पडतात..मी आई म्हणून कुठे कमी पडते का?? मी मुलांचे संगोपन करण्यात कमी पडते का?

मी माझ्या मुलांवर संस्कार करण्यात कुठे कमी पडते का?माझ्यामुलामध्ये आत्मविश्वास निर्माण करायला मी कुठे कमी पडते का?

त्यांच्यात सकारात्मक भावना निर्माण करण्यात कमी पडते का?

जीवनाबद्दल ची जगाबाबतची स्वीकृती निर्माण करायला कमी पडली का?

सर्वात महत्वाचे माझ्या बद्दल चा विश्वास निर्माण करायला मी कमी पडले का??

माझ्याजवळ माझ्या मुलाने मोकळे बोलण्याइतकी मी त्यांच्याशी

मोकळी नाही का??

मी त्यांची मैत्रीण होण्यासाठी असमर्थ ठरली का??

आणि मी माझ्याच व्यापात राहिले आणि त्याच्याकडे लक्ष मी देऊ शकले नाही?

माझ्याकडून त्याच्या नेमक्या काय अपेक्षा होत्या हे जाणून घ्यायला मी असमर्थ होती का??

माझ्याजवळ आज सगळ्या प्रकारचे ऐश्वर्य हात जोडून उभे आहे मी त्याच्या काही गरजा पूर्ण करण्यात असमर्थ ठरले का??

माझे निर्णय मी त्याच्यावर लादले तर नाही??त्याचे मित्र कोण होते मला कधीच कसे कळले नाही?

माझ्या मुलाच्या जीवनात काही पोकळी होती का??मग ती मला का नाही समजली?? सर्वांचा सुसंवाद हरवलाय का???

मी त्याच्या मैत्रिणीची जागा का नाही घेऊ शकले??त्याचे शिक्षक त्याला काय शिकवीत होते हे त्याने मला कधी सांगितले का??

सांगितले असेल तरी मला ऐकायला वेळ होता का??आयुष्यात निर्णय घेताना ते कसे घ्यावे हे शिकवायला मी काही कमी पडले का??

माझा मुलगा खूप मोबाईल चा वापर करीत होता मी त्यालाकधीच का नाही टोकले??

त्याचे मित्र कोण मैत्रिणी कोण त्यांच्याशी मला मैत्री करावीशी का नाही वाटली??जीवनात प्रत्येक नात्याचा विचार हा महत्वाचा असतो हे सांगायला मी कमी पडले का??

आपल्या एका निर्णयावर अनेकांचे जीवन अवलंबून असतात हे त्याला कधीच कळले नाही का??हे सांगायला आई म्हणून शिक्षक म्हणून मी कुठे कमी पडले का ??

मी त्याच्यावर प्रेम करायला त्याच्यात विश्वास निर्माण करायला कमी पडले का??मी त्यांची तुलना कुणाशीही करायला नको होती

.मी त्याच्या खऱ्या व्यक्तिमत्वाची ओळख त्याला करून द्यायला हवी होती .तो सर्व पेक्षा किती छान आहे आणि माझे त्याच्यावर किती प्रेम आहे हे सांगायला मी कमी पडली??

खूप प्रश्न आहेत मनामध्ये,ओलावाच आटून गेला आहे की काय??थोडे फार शिक्षणातून ह्या आंतरक्रिया होत होत्या पण आता सर्व डिजिटल शिक्षण आहे आणि शिक्षक तंत्र स्नेही झाला तो विद्यार्थी स्नेही व्हावा ह्यासाठी कोण प्रयत्न करेल??

मनुष्याने तंत्रज्ञान निर्माण केले पण त्याचे मन तांत्रिक होत आहे यांत्रिक होत आहे,शिक्षक विद्यार्थ्यांशी इमेल च्या माध्यमातून बोलत असेल तर तो विद्यार्थ्यांच्या भावना चेहऱ्यावरून कसा ओळखणार??माझ्या मुलाचे कुणी जवळचे शिक्षकही नव्हते का??

मन्मथ बाळा खूप चटका लावून गेलास मनाला आणि खूप प्रश्नही मनात निर्माण करून गेलास,कुठे शोधायची ह्याची उत्तरे??कुणी सांगायचे हे मला समजावून??

लोक तुझ्या जाण्याचा तपास लावतील. अपराधी ना शासन होईल, पण तू येणार नाहीस हे सांगायला ,की आम्ही काही चुकलो का आणि कुठे चुकलो,काही दिवसांनी हे सर्व शांत होईल पण समाजातील माझे कितीतरी मन्मथ माझ्यापासून कायमचे निघून जातील,,आणि मी प्रत्येकवेळी अशांत आणि अस्वस्थ,,,

नाही हे थांबले पाहिजे,माझ्या देशाची ही बौद्धिक संपदा माझा मुलगा माझी मुलगी कुणाचाही जीव जायला नको,पोरानो नका असे टोकाचे निर्णय घेऊ,,काय करावे???मन्मथ ह्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे द्यायला एकदा तरी ये न,,,,



३५

# प,पू,गुरुजी-एक ज्ञान तपस्वी,,(१)

***केशवा माधवा**हे गाणे मी लहानपणापासून ऐकत आले,,आणि ह्यातील केशव आणि माधव कोण ???असा प्रश्न बालसुलभ मनाला पडायचा,,,आजी सांगायची ही दोन्ही नावे कृष्णाची आहेत,,,ज्याने अर्जुनाला कर्तव्यभिमुख बनविले,,,तेव्हा हा प्रश्न पुन्हा मनाला पडायचा की एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तींमध्ये एवढे परिवर्तन घडवून आणू शकतो ???आई ने ह्या प्रश्नाचे उत्तर दिले होते की अर्जुन हे आपल्या सर्व मानव जातीचे प्रतीक आहे आणि कृष्ण हा परमेश्वर,,,,आणि जेव्हा जेव्हा पृथ्वीवर धर्माला ग्लानी येते तेव्हा परमेश्वर अवतरीत होतो,,,मग पुन्हा प्रश्न पडला आणखी कुणी धर्म रक्षणाचे काम केले आहे का ???आजोबांनी सांगितले शंकराचार्य,,शिवाजी महाराज,,विवेकानंद चिन्मयनानंद आशा काही अवतारीत लोकांनी धर्मरक्षणाचे काम केले,,,बाबांनी सांगितले आधुनिक युगात असे कार्य करणारे केशव आणि माधव ह्यांनी धर्म रक्षणाचे कार्य तर केलेच पण ही तत्वे त्यांनी समाजातही रुजवली,,,तेव्हापासून ह्या दोन नावाशी अत्यंत जवळचे नाते आहे केवळ माझेच नाही तर ह्या राष्ट्राचे सुद्धा,,,हिंदुत्वबाबतचे जनजागरण ,,राष्ट्राभिमान,राष्ट्रीय एकात्मता,,व्यक्तिगत चारित्र्य,राष्ट्रीय चारित्र्य ह्या सगळ्या मूल्यांचे केवळ संस्कार केंद्र नव्हे तर विद्यापीठ असणारे युगप्रवर्तक ,,,,संपूर्ण राष्ट्राचा जेव्हा अर्जुन झाला तेव्हा देशाला आपल्या कर्तव्याची जाणीव देणारे,,ज्यांना क्रियाशील संत आपण म्हणू शकू असे महान कर्मयोगी केशव अर्थात डॉ केशव बळीरामपंत हेडगेवार आणि मा माधव सदाशिवराव गोळवलकर अर्थात गुरुजी,,, मे  चा तो दिवस देशाच्या इतिहासातील एक अत्यंत निष्ठुर दिवस म्हणावा लागेल,,,आ, गुरुजींना कर्करोगाचे निदान झाले,,पण कार्य थांबले नाही,,,त्यांच्या जीवनपट अगदी थक्क करून सोडणारा

आहे,,मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातील संगमश्र्वर तालुका आणि त्यातील गोळवली हे गाव,,,आणि ह्या गावातील पाध्ये नावाचे कुटुंब नागपूरला स्थानांतरित झाले आणि त्यांचे आडनाव गोळवलकर,,,,ज्ञानमार्गी वडील सदाशिवराव व भक्तिमार्गी आई लक्ष्मी बाई ह्याचे चौथे अपत्य म्हणजे माधव म्हणजेच गुरुजी,,,अध्यात्माचा समृद्ध वारसा घेऊन १९ फेब्रुवारी १९०६ रोजी जन्माला आलेले हे अपत्य अत्यंत बुद्धिमान,,शिक्षणाच्या प्राथमिक अवस्थेतच त्यांनी संस्कृत ग्रंथ वाचन रामयनासारखे ग्रंथ मुखोद्गत केले होते,,,त्यांचे उच्च शिक्षण काशी येथील हिंदू विश्वविद्यालयात झाले,,ह्या काळात त्यांनी भारतीय तत्वज्ञान अर्थ शास्त्र राजनीतिशास्त्र ह्याचा अभ्यास केला,,,ह्या तरुण वयातच ध्यान धारणेची आवड उत्पन्न झाली,,रामकृष्ण आश्रम मध्ये ही ते जात,,,विवेकानंदांच्या संपूर्ण साहित्याचा त्यांनी अभ्यास केला व ह्या साहित्याचा त्यांच्या विचारावर पगडा पडला,,,काशी विद्यापीठात जेव्हा ते प्राध्यापक म्हणून काही काळासाठी होते तेव्हा ते अत्यंत विद्यार्थी प्रिय होते आणि हे विद्यार्थी त्यांना गुरुजी म्हणत,,,तेव्हापासून ते गुरुजी ह्या नावाने ओळखले जाऊ लागले,,,स्वयंसेवक संघाशी त्याचा जो संबंध आला तो मा, भैय्याजी दाणी ह्यांच्यामुळे,,,,डॉ हेडगेवार जेव्हा काशीला गेले ती गुरुजींची आणि डॉक्टरांची पहिली भेट,,,पण पहिल्या भेटीतच त्यांना परस्परांशी अंतरंग परिचय झाला आणि डॉक्टरांनी गुरुजींना नागपूरचा विजयादशमीच्या कार्यक्रम पाहण्यास बोलाविले,,,काशी च्या संघाचे कार्य पाहणे ही गुरुजींच्या संघ कार्याची सुरवात,,,मग मात्र हा झंझावात थांबलाच नाही,,अकोल्याशी गुरुजींचे नाते असे की १९३४ मध्ये येथे जो संघ शिक्षा वर्ग झाला त्या वर्गाचे त्यांना सर्वाधिकारी म्हणून नेमले होते,,,समाजकार्य राष्ट्र कार्य ह्यालाच सर्वस्व मानणारे गुरुजी ह्यांनी राष्ट्र हितार्थ वैयक्तिक प्रपंचाचा त्याग करीत स्वामी विवेकानंदांचा

आदर्श बाळगत विवाह न करण्याचा निर्धार केला व राष्ट्र कार्य व संघ कार्याला वाहून घेतले,,,१९४० मध्ये ते संघाचे सरसंघचालक झाले,,,निर्भयता हा संघ कार्याचा केंद्रबिंदू त्यांनी मानला,,संघ कार्यकर्त्यांना घाबरून चालणार नाही उलट जेव्हा जेव्हा देशभय ग्रस्त होईल तेव्हा तेव्हा संघ स्वयंसेवाकला ह्या देशासाठी बळकट पणे उभे राहावेच लागेल,,,३३ वर्ष त्यांचा प्रवास अनेक संकटांना झेलत चालूच राहिला,,,,कार्यात अनेक अडचणी आल्यात पण कार्याचा विस्तारही वाढतच गेला,,व्यक्तिगत चारित्र्य व राष्ट्रीय चारित्र्य ह्याबाबत त्यांनी समन्वयात्मक भूमिका मांडली,,,ती कशी हे उद्याच्या भागात पाहूया,,,,,हरिओम,,,,,,,,



३६

# प पू गोळवलकर गुरुजी एक ज्ञान तपस्वी (२)

प,पू,डॉ हेडगेवार आणि गुरुजींना एक खूप मोठी चिंता होती ती अशी ,की आपल्या समाजात व्यक्ती ह्या फक्त स्वतःचा आणि स्वतः च्या कुटुंबाचाच विचार करतात त्यांना समाजाशी राष्ट्रांशी काहीच देणे घेणे नसते,,विविध जाती ,संप्रदाय , विचारधारा ,धर्म, ह्यात समाज विखुरला गेला आहे,,शेजारी राहणाऱ्या व्यक्तीबद्दल आपल्या मनात कृतज्ञता राहिली नाही,,आणि हेच कारण आहे समाजाची अधोगती होते आहे,,सामाजिक व राष्ट्रीय भावना तेथे नाही,,,गुरुजींनी व्यक्तिगत चारित्र्य व राष्ट्रीय चारित्र्यावर भर दिला आहे,,राष्ट्रावर जेव्हा संकट येत तेव्हा ह्या संकटाला पराजित करण्यासाठी सगळे एकजूट होतात ह्या ठिकाणी राष्ट्रीय चारित्र्याची अभिव्यक्ती होतेच पण हे संकटच आपल्यावर येऊ नये ह्यासाठी राष्ट्रीय चारित्र्य पणाला लागले पाहिजे,,,पण तसे होत नाही कारण माणूस व्यक्तिगत स्वार्थाने इतका आंधळा झाला की प्रसंगी तो देश विकायला सुद्धा मागेपुढे पाहणार नाही,,ह्या गोष्टीची चिंता त्याना अधिक होती,,,ही राष्ट्रीय एकात्मतेची भावना नैमित्तिक न होता सातत्य पूर्ण प्रत्येकात असावी,,१९६५ मध्ये भारत पाकिस्तान युद्धात ही भावना प्रत्येकात जागृत होती,,काश्मीर पासून कन्याकुमारीपर्यंतह एकसंघ भारत बघून त्यांच्या मनात धन्यता निर्माण झाली होती,,पण ही राष्ट्रीय चारित्र्याचा आविष्कार हा प्रत्येकाचा स्थायी भाव व्हावा ही त्यांची इच्छा होती,,,राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्थापनाच ह्या हेतूने झाली की ,ह्या देशाला विविधतेतुन एकात्मतेच्या एक धाग्यात बांधता आले पाहिजे,,एकात्मतेची ही सहजस्थिती अशी निर्माण व्हावी कि व्यक्तीगत मान अपमान ह्यामुळे त्यात बाधा याबायस नको,,,व्यक्तिगत आणि राष्ट्रीय चारित्र्य सुदृढ होणे ही काळाची गरज आहे ह्यावर गुरुजींनी भर

दिला,,पण हे चारित्र्य कसे निर्माण होणार त्यावर त्यांनी विशद केलेल्या मानसशास्त्रीय सद्धांतानुसार व्यक्तिगत चारित्र्य निर्माणसाठी तीन गोष्टींची आवश्यकता असते,एक म्हणजे जे आदर्श निर्माण करावयाचे आहे त्याचे चिंतन,,त्यावर अढळ श्रद्धा असणाऱ्या व्यक्तीचा सहवास आणि असे आदर्श निर्माण करणाऱ्या कार्यक्रममधील सतत व्यस्तता,,, ह्या प्रक्रियेतून व्यक्तिगत चारित्र्य निर्माण होईल पर्यायाने राष्ट्रीय चारित्र्य निर्माण करता येऊ शकेल,,,भारत पूनरुत्थान चे ध्येय हाच आदर्श ,आणि त्यासाठी चारित्र्यवान लोकांच्या संगतीत राहून विधायक उपक्रमामध्ये सहभाग हा मार्ग आहे,,,देशातील प्रत्येक कार्यकर्ता हा चारित्र्याने संपन्न असावा असा त्यांचा कटाक्ष होता,,,व्यक्तिगत चारित्र्य चांगले असेल तरच राष्ट्रीय चारित्र्य सक्षम होईल,,,आपली देशभक्ती ही निष्काम असायला हवी,,म्हणजेच जशी एखाद्या भक्तासाठी भक्ती हेच साध्य आणि साधनही असते त्याचप्रमाणे देशभक्तीच्या बाबतीत निष्कमता असावी,,,,नैतिकता व भौतिकता ह्याचा एक सुंदर सिद्धांत गुरुजींनी सांगितला ,ते म्हणतात '''नीतिमत्ता ही वरच्या स्तरावरून खालच्या स्तरावर झिरपत येते तर भौतिकता खालच्या स्तरापासून वरच्या स्तराकडे जायला हवी अर्थातच नीतिमत्तेच्या बाबतीत उच्चस्तरीय व्यक्ती ह्या नीतिमान असायला हव्यात तर जेवढ्याही भौतिक सुविधा आहेत त्या निम्न पातळीवर आधी उपलब्ध करून घ्याव्यात ''',,,केवढे मोठे अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र आहे ह्या विचारात,,,ह्या मुळे समाजाची पुनर्रचना होऊ शकेल,,,समाजात जे कार्यकर्ते आहेत त्यांच्या मनात हा संपूर्ण समाज ईश्वर आहे ही दृढ भावना हवी,,प्रत्येक व्यक्ती हा ईश्वराचीच अंश आहे ही जर कार्यकर्त्यांची भावना असेल तर त्यांच्या कार्यात व पर्यायाने समाजात आंतरिक एकता निर्माण होईल,,,संघ शाखेतून ह्याच तत्वाला अनुसरून कार्यकर्त्यांची निर्मिती व्हावी ही त्यांची दृष्टी होती,,, व्यक्तिगत चारित्र्य व राष्ट्रीय चारित्र्य परस्पराहून भिन्न नाहीत,ते

म्हणतातit is clear that,only when the twin aspect of character are manifest ,that both the individual and society progress and prosper,,,,,,They are like the twin faces of a coin,,,one face having the imprint of national insignia and the other carrying the value,,,Erosion of any one face will render the coin useless कोणत्याही परिस्थितीत व्यक्तिगत चारित्र्य महत्वाचे आहेच,,,,आम्हाला चांगले कार्य करायचे असेल तर आम्हास जनतेचे विश्वासपत्र व्हावेच लागेल,,आणि जनता आपल्यावर तेव्हाच विश्वास करते जेव्हा आपला स्वतः वर शुद्ध विश्वास असतो,,,म्हणून आम्ही आमच्या जीवनात शुद्ध चारित्र्याचे असायला हवे,,,व्यक्तिगत चारित्र्याला स्वार्थापासून धोका असतो,,मग ह्या ठिकाणी स्वार्थ त्याग महत्वाचा ठरतो,,,सार्वजनिक जीवनात कार्य करताना कार्यकर्त्यांना प्रसिद्धी ची हाव असते,,कधी स्वतःचा सन्मान इतरांनी करावा असे वाटते,,काही दिवसांनी तर आपण इतरांहून किती भिन्न आहोत महान आहोत हे दाखविण्याचाही त्याचा प्रयत्न असतो, गुरुजी म्हणतात,,,Man does not live by bread alone,,not by recognition for his work,,not by fulfillment of his desire ,,but by the word of god आशा ह्या कर्मयोग्याने संघकार्य अखंड पणे  वर्ष केले,,निःस्वार्थ निस्पृह कार्य करणारे असे विभूती लाभणे हे खरेच भारताचे थोर नशीब,,जेष्ठ शुद्ध पंचमी जून  हा दिवस अत्यंत शोकाकुल ठरला आणि देशाचे अत्यंत लाडके गुरुजी ह्यांनी आपल्या पार्थिव शरीराचा त्याग केला आणि ब्राह्मलीन झाले,,,व्यक्तिगत चारित्र्य आणि राष्ट्रीय चरात्र्याचा समन्वयात्मक विचार आज समाजात प्रसारित करून राष्ट्र निष्ठा निर्भयता चारित्र्य निर्माण करणे ही त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल,,,आज व्यक्ती व्यक्तीत गुरुजींचे प्रगटन होणे ही काळाची गरज आहे,,,,हम करे राष्ट्र आराधन,,,तन से मन से धन से,,,,तन मन धन जीवन से,,,हम करे राष्ट्र अभिवादन,,,,,

३७

# निकष विवाहाचे

आज मी आपल्याशी आणखी एका मुद्द्यावर बोलणार आहे,,,,मला काही दिवसांपूर्वी एका वरवधू मेळाव्याला मुख्य अतिथी म्हणून बोलाविले होते,,,उद्देश हा होता उपस्थित असणाऱ्या उपवर उपवधुशी काही हितगुज करणे,,त्या सगळ्यांचे परिचय झाले ,,,,,अपेक्षा सांगून झाल्यात,,,मला बदलत्या दृष्टिकोनाचे खूप आश्चर्य वाटले,,,ह्या मुलांना विवाह म्हणजे काय हेच माहीत



नाही,,,पाश्चात्त्य देशात विवाह हा कातड्याचे करार असला तरी भारतात विवाह हा गृहस्थाश्रमातील प्रवेश आहे आणि गृहस्थाश्रमाचा पाया आहे सेवा,,,एकमेकांचे जीवन समृद्ध करणे म्हणजे विवाह,,,हे त्यांना कुणीच सांगितले नाही का ????लग्न ठरविताना आजचे सगळे निकष बदलले आहेत,,,मुलं मुली शिकले स्वतंत्र विचारांचे झालेत पण काही कुठे कमी पडतंय का??? मुलगा मुलगी संस्काराने श्रीमंत हवी ह्याची जागा पॅकेज ने घेतली,,जेथे आपण संसार थाटू तिथे आनंदात राहू या दृष्टिकोनात बदल झाला,,लहान गावातील मुलींना पुणे मुंबई मोठ्या शहरात जायचे आणि मोठ्या शहरातील मुलींना फॉरेन ला,,,मग लहान गावातील उपवारांचे काय???ज्या घरात आईवडील आजी आजोबा आहेत ते कुटुंब समृद्ध ह्याची जागा घेतली तीह्या विचाराने की ‘‘मलाच माझे करायला वेळ नाही मी कुणाचे काय सेवा करू’???मला अगदी दोघांचेच कुटुंब हवे आहे‘‘‘‘ह्या विचाराने घेतली,,,आई वडिलांनी कुठे जायचे???‘‘‘आणि पुढे हाही विचार की‘‘‘‘ह्या माझ्या विचाराशी आपण सहमत नसाल तर मी live in मध्ये पण राहायला तयार आहे

किंवा contract marriage करायला तयार आहे'''''ह्या विचारांचे खूप आश्चर्य वाटले मला,,, आम्ही कुटुंब व्यवस्था नाकारतोय का??? की कुटुंब वत्सल तेचे संस्कार करायला कमी पडतो आहोत,???नक्की काय आहे???संसार हा दोघांचा असतो तसा तो दोन कुटुंबाचे मिलन पण असते न???दोघांनाही एकमेकांचे नातेवाईक मिळतात आणि ते कुटुंब किती समृद्ध होत??? प्रत्येकाला स्पेस हवी असे म्हणता म्हणता आपण स्पेस च्या बाहेर जात आहोत हे केव्हा कळणार,,,एकमेकांना स्पेस देण्यापेक्षा एकमेकांना खूप प्रेम दिले तर नाही का चालणार????'''माझ्या व्यक्ती स्वातंत्र्याची ही अभिव्यक्ती आहे'''असे उत्तर मला काही मुलांनी आणि मुलींनी दिली,,,पण स्वातंत्र्य हे काही शिस्तीत असते हे सांगण्यास आम्ही विसरलो का???रस्त्याने चालण्याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे पण भारतात डाव्याचं बाजूने चालतात व पाश्चात्य देशात उजव्या बाजूने हे सांगायला आम्ही विसरलो का??? फ्लॅट पॅकेज ,न्यूक्लियर फॅमिली,मोठे शहर किंवा फॉरेन हे विवाहाचे निकष असू शकतात???की सुसंस्कारित मुलगा मुलगी,निर्व्यसनी, कर्तृत्ववान,,नातेवाईकांनी समृद्ध,,,(हे दोघांच्याही बाबतीत। कारण स्त्री पुरुष समानता) ही निकष असावी??? स्त्री पुरुष समानतेचा विषय निघाला म्हणून सांगते किती मुली स्वतः पेक्षा कमी शिकलेला मुलगा नवरा म्हणून स्वीकारतील आणि किती मुलं आपल्या पेक्षा जास्त शिकलेली मुलगी पत्नी म्हणून स्वीकारतील???तसेच किती कर्तृत्ववान मुली आपल्या समाजातील गरीब पण कर्तृत्ववान मुलाशी लग्न करून स्त्री पुरुष समानता ह्या तत्वाला न्याय देतील???खूप प्रश्न आहेत डोक्यात,,,आम्ही धड ना भारतीय विचारांचे राहिलो ना धड पाश्चात्य विचार सारणी,,,,,,काय करायचे,,,खूप अस्वस्थता येते,,,कुटुंब संस्था हा राष्ट्राचा खूप मोठा आधारस्तंभ आहे,,,ह्या व्यवस्थेला तडा जाणार नाही ना काय करता येईल????

३८

# आपण हे कराल ???

माझ्या महाविद्यालयात दोन वर्षांपूर्वी मी एक आगळा वेगळा कार्यक्रम घेतला,,कार्यक्रम होता विधवांचे हळदी कुंकू,,,दचकलात न,,,खरच सांगते ,,,,कार्यक्रमकरिता एकूण ५० स्त्रिया उपस्थित होत्या,,सर्वांच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह ???आमच्यासाठी हळदीकुंकू ??असे तर कुणीच करीत नाही,,,खूप उत्सुकता सगळयांच्या चेहऱ्यावर,,,काय होणार,,,महाविद्यालयात सगळे होणारे शिक्षक,,,त्यांच्यासमोर हा कार्यक्रम,,,सगळ्या भगिनी जमल्या,,, वडसवित्री पूजन सुरू झाले,,,सगळयांच्या चेहऱ्यावर एक वेगळा आत्मविश्वास मला जाणवत होता,,पूजन आटोपले आता वेळ होती हळदी कुंकवाची,,,त्यातील काही भगिनी बाजूला झाल्या,,आणि काही जणी चालायला लागल्या तर काही माझ्या अवती भोवती आल्यात,,, माझ्या हाती हळदी कुंकू चे ताट होते,,मी त्यांना कुंकू लावायला गेले आणि त्यांनी कुंकू लावून घेण्यास नकार दिला,,माझ्या मनाला खूप चुट पुटं लागली,,माझे काही चुकले तर नाही ? मी लगेच त्यांना त्याचे कारण विचारले,,त्यातील एक भगिनी पुढे आली तिचे वक्तव्य आजही मला अस्वस्थ करते ,,ती म्हणाली‘‘‘मॅडम आम्ही विधवा,,आम्हाला तुम्ही कुंकू लावाल, वाणही द्याल,,पण हे सांगा तुम्ही आमच्या हातून कुंकू लावून घ्याल ??तुम्हाला चालेल ??अहो ज्योतिबाची सावित्री अनेक वर्षांपूर्वी आपल्यासाठी झगडली,, सत्यावनाच्या सावित्रीने आपल्यासाठी ज्ञानाचा मार्ग सांगितला,,पण आज आपण सवित्रीच्याच लेकी एकमेकींच्या जीवनाचे हक्क नाकारतोय,,,आम्ही विधवा आम्हाला जगायचा अधिकार नाही,,आम्हालाही आजही हळदी कुंकू ला जायचे असते,,देवाचा नैवेद्य करायचा असतो,,तुम्ही साधवा स्त्रिया आमचे जगणे का नाकारता ? आम्ही कुंकू तुमच्या कपाळावर लावलं तर तुम्हाला भीती

वाटते,,,मॅडम जग कुठे चाललंय आणि आम्ही अजूनही ह्या परंपरांच्या कचाट्यात सापडलोय,, पण कधीतरी खूप गुदमरायला होत,,,‘‘‘‘असे म्हणताना ती खूप रडायला लागली,,मी त्यांना सांगितलं,‘‘अग कोण विधवा आणि कोण साधावा ??सौभाग्यवती कोण ? भाग्यवान कोण?ज्याच्याजवळ गुण संपत्ती,ज्ञान,औदार्य,मूल्य ,प्रेम असे चांगले गुण असतात ती सौभाग्यवती,,,कोण म्हणतं तुम्ही सौभाग्यवती नाहीत ??चांगल्या कुळात आपला जन्म झाला,चांगले संस्कार मिळाले,चांगले शिक्षण मिळाले हे सौभाग्याचे लक्षण नाही ???चांगल्या कुटुंबात विवाह झाला हे सौभाग्याचे लक्षण नाही, ???नवऱ्याच्या माघारी तुम्ही समर्थ पणे संसाराचा गाडा चालविता हे सौभाग्याचे लक्षण नाही ???केवळ पती निधन झाले म्हणजे तुमचे जगण्याचे हक्क संपलेत ??चांगला मुलगा मुलगी तुमच्या पोटी जन्माला आली ही तुमचा पती तुमच्यासोबत असल्याची ग्वाही नाही ??तो तुमच्यातून गेलाच कुठे ? तो तर तुमच्यातच सामावला न,??आणि प्रथम तुम्हीच तुम्हाला स्वीकारा,,मनातील ही भावना दूर करा,,स्वत: साठी विधवा शब्द वापरणे सोडा,,,स्वत: वर अन्याय करणे सोडा,,,राहिला प्रश्न कुंकू लावण्याचा,,,अग प्रत्येक साधकाने स्वत: च्या कपाळावर कुंकू लावायचाच हवे,,,का नाकारता तुम्ही हे सर्व,,,आणि मैत्रिणींनो समाजालाही बदलायला वेळ लागेल,,,हळू हळू तो ही बदलतो आहे,,,तुम्ही सहनशीलता सोडू नका,,सुरवात तुमच्यापासून करा,,स्वत: पासून करा,,मागे वळून पाहू नका,,,समोर खूप मोठे जीवन आहे तुमच्या समोर,,,त्याला आनंदाने सामोरे जा‘‘‘म्हणजे आम्ही तुम्हाला कुंकू लावू शकतो ???का नाही ??मला आवडेल‘‘‘‘खूप अश्रूंचा महापूर अनुभवला त्या दिवशी मी,,,,,,,,

# विशेष चिऊ

आज माझ्या खिडकीत एक चिमणी आली,,, जिवाच्या आकांताने ओरडत,,कळेना काय झाले असेल तिला,,तिचाआकांतऐकवेना,,आजूबाजूला पाहिले,,कुणीही नव्हते,,तिचे घरटे पाहिले,,ते ही व्यवस्थित,,,काय झाले असेल बरे ? पाहिलं होते मी काही दिवसांपूर्वी तिचा चिमणा तिला काड्या आणून देताना आणि तिने अतिशय सुबकतेने घरटे बनविताना,,, दोनच दिवसांपूर्वी तिच्या घरट्यात सुंदर अंडी पण बघितली होती,,,वाटले कदाचित तिचे गोजिरवाणे स्वप्न फुटले तर नाही?सहज डोकावले तिच्या घरट्यात,,,एक जीव हे जग पाहण्यासाठी धडपडताय,,अरे ही तर आनंदाची गोष्ट,,चिऊताई चे बाळ ह्या जगात येणार आहे,,आणि ते आलेला ही आहे,,पण चिमणी का जिवाच्या आकांताने ओरडते आहे,,आणि तिचा चिमणा कुठे गेला,,आजपर्यंत तिला साथ देणाऱ्या तिच्या मैत्रिणी इतर सोयरे सगळे गेले कुठे,,,अस्वस्थ झाले मन,,आता मात्र चिऊताईशी बोलायलाच हवं,,चिऊ ताई काय झालं ग?का ओरडते आहेस जिवाच्या आकांताने ? कुणी त्रास दिला का तुला ?काही दुखतंय का तुझं ?आणि हे काय तुझे सगळे सोबती कुठे गेले ? तुझं घर पडलाय का कुणी ?काहीच बोलेना ?आकांत सुरूच राहिला तिचा,,चिऊ ताई बोल न काहीतरी सांग न,,आग लहानपणी तुझी गोष्ट मी ऐकली होती तेव्हा केवढा अभिमान वाटला होता मला तुझा,,,आणि तुझी मेणाचे घर बांधण्याची कल्पना तर खूपच,,,ए तुला कसं कळलं होतं की खूप पावसात मेण घट्ट होईल आणि आपले घरटे वाहून जाणार नाही ?आणि कावळा बुद्दु होता त्याला कळलंच नाही पाण्यात शेण खूपच पसरून जाते,,,पण मला तुझा खूप अभिमान वाटला होता बघ,,आणि कावळ्याला कसा



धडा शिकविलास ग तू,,पण त्याच काऊ दादाने तुला उन्हाळ्यात साथ दिली होती आठवत ?तुझ्या बाळांना आंबे खाऊ घातले होते,,ए काऊ दादांनी तुला किती छान माफ केले होते नाही,,अस माणसांमध्ये नसत ग चीवडे,,,ए काय झालं आता तरी सांग न ? चिऊ बोलली माझ्याशी,,खूप मोकळी,,,सगळ्या भावनांना तिने वाट करून दिली माझ्या जवळ,,म्हणाली अग माझे गोजिरवाणे बाळ,,,,,चिऊ ताई काय झालं बाळाला,,अग माझ्या बाळाचे पंख ईश्वराने जन्मतः छाटले,,, काय?ऐकून खूप धक्का बसला मला,,,म्हणाली खूप गोजिरवाणे पिल्लू आहे माझे खूप सुंदर लोभस,,एकुलते एक,,माझा प्राण आहे ग तो,,पण ईश्वराच्या मनात काय आहे कळेना,,त्याचे पंख छाटले त्याने,,,आता त्याला उडायला कसे शिकवू ?आणि तो उडू शकला नाही तर माझे समस्त जातबंधाव त्याला स्वीकारतील,,त्याला मी जगायला कसे शिकवू,,,त्याला ह्या जगाची रीत नाही माहीत,,त्याची भावंड त्याला स्वीकारतील का ग,,,ए काय करू सांग न,,,आज खूप खचल्या सारख वाटतंय मला,,,कुठे जाऊ त्याला घेऊन,,,बघ ना माझ्या संख्या किती खुश आहेत त्यांच्या पिल्लाना सांभाळण्यात,,,त्या आपल्या पिल्लाना शिकवतील मोठं करतील,,एक दिवस सगळी पिल्ले उडून जातील,,त्या दिवशी त्या हसतील आणि राडतीलही,,,पण माझ्या पिल्लाचे काय,,, तो तर् जग अनुभवू शकत नाही त्याला जगाचे व्यवहार माहीत नाही,,,तो ह्या जगात कसा राहील,,,मी कस स्वीकारू हे सगळं,,,माझे बाळ उडू शकणार नाही,,,इतर सवंगड्या मध्ये मिसळू शकणार नाही,,,तो नुसत्या घरट्यात कसा राहील ग,,,,चिऊ ताईच्या वाक्याने काळीज पिळवटून निघाले माझे,,,हीच का ती खंबीर चिऊ ताई जी मी लहानपणी पहिली होती ? पण लक्षात आलं माझ्या ती चिऊ सशक्त पिल्लांची आई होती,,आज माझ्यासमोर उभी आहे ती दिव्यांग पिल्लाची आई,,पण चिऊ ताईला खचून कसे चालेल,,चिऊ ताई पिल्लाला पंख दे,,त्याच्या चोचीत चारा दे,,पण खचून जाऊ नकोस,,,तुला

खचलेली नाही बघू शकत मी,,,अग आमच्या सर्वांसमोर एक खंबीर आई म्हणून तुझी प्रतिमा आहे त्या प्रतिमेचे काय ? बरोबर आहे,,मला खचून चालणार नाही,,पण मी आई आहे,,जग मला काय म्हणताय ह्याची मला पर्वा नाही पण खरं सांगू का जग मला खंबीर समजतंय न हीच माझी खूप मोठी कुचंबणा आहे,,मी खंबीर जरूर आहे पण माझ्या पिल्लाची उडण्याची हौस आणि अगतिकता मी एकत्र कस पाहू ?त्याला खूप उडायचे आहे,,,त्याला त्याच्या कर्तृत्वाचे आभाळ बघायचे आहे,,मलाही त्याला खूप मोठं झालेलं बघायचं आहे पण कास करू,,,खूप घालमेल होतेय मनाची,,,,माझे पिल्लू

कस समजवायचा ह्या चिऊ ला?तिला बसविले,,प्यायला पाणी दिले,,पण चिऊताई घेईना,,जीवाची तगमग वाढतच होती ''चिऊताई नको हिम्मत हारुस,, अग किती नशीबवान आहेस तू देवाने तुला विशेष पिल्लू दिले'''पण मलाच का ? अग चिऊ तू पण त्या देवाला विशेषच वाटलीस बघ,,तू त्या पिल्लाला छान जीवन देशील हा ईश्वराने विश्वास टाकला आहे तुझ्यावर,,,तो विश्वास सार्थ कर,,आणि बघ तुझ्या सगळ्या नातेवाईकांचे मित्र मैत्रिणी चे पिल्लू उडतील,, आपले जीवन आनंदाने जगतील,,

त्यांच्यासारखे जीवन तू तुझ्या पिल्लुला नाही देऊ शकणार,,,पण विचार कर सगळ्यांची पिल्ले उडून जाणार ,,,सगळ्यांचे घरटी सुने होणार,,पण तुझे पिल्लू किती ग निरागस,,किती प्रेमळ,,,तो कायम तुझ्याच जवळ राहणार बघ,,मज्जा आहे न,,,उठ चिऊताई वाईट वाटून घेऊ नकोस,,,तुझा आत्मविश्वास जागा कर,,तुझी गरज तुझ्यासारख्या असंख्य चिऊना आहे,,तू आनंदी हो आणि त्यांनाही आनंदी राहावयास सांग,,,माझा आणि चिऊ चा हा संवाद सुरू होता ,,,असंख्य सख्या तिच्या भोवती गोळा झाल्यात ,,,,त्यांच्या कुशीत छोटी छोटी निरागस पिल्ले डोळ्यातील निरागस भावाने माझ्या चिऊ कडे पाहत होती,,तिच्या डोळ्यात आता आत्मविश्वास होता,,,,,,,,

# ४० जागतिक महिला दिन २०१८

आज महिला दिन सर्वत्र साजरा होणार,,खूप शुभेच्छा महिलांना मिळणार,कर्तृत्ववान महिलांचा सत्कार होणार,महिलांच्या अधिकाराबद्दल खूप बोलले जाणार,,,हे सर्व होणार,,एक दिवस महिला अधिकारावर बोलणारे आम्ही सर्व एक गोष्ट विसरणार की महिलेचा ज्या ज्या अधिकाराबद्दल आम्ही बोलणार आहोत ते ते तिचे अधिकार तेव्हाच राखले जातील जेव्हा हे सर्व घटक आपली महिलाप्रति कर्तव्य उत्तरदायित्व पूर्ण करतील,,,

अधिकाराबाबत जागृती होत असताना कर्तव्याबाबत account-ability बाबत सुद्धा जागृती व्हावी,,महिला म्हणून मी ज्या ज्या भूमिकेत आहे त्या त्या भूमिकेतील अधिकार तेव्हाच राखला जाईल जेव्हा माझ्या संदर्भातील समोरचा व्यक्ती कर्तव्य राखेल,,स्त्री म्हणून माझा अधिकार जपण्यासाठी समाजाच्या प्रत्येक घटकाला त्यांच्या कर्तव्या साठी जागे करावे लागेल,,

आज कर्तृत्ववान स्त्रियांचा सन्मान होईल, पण माझ्या कितीतरी भगिनी आहेत ज्या फसविले गेल्यात,,कितीतरी मुलीवर बलात्कार झालेत,कितीतरी मुलींना ॲसिड टाकून विद्रुप केले,,कितीतरी भगिनींना प्रेमाचे अमिष दाखवून त्यांची कायम स्वरूपाची फसवणूक झाली,,पण एवढे सर्व होऊनही त्या खांबीरतेने जीवन जगतात आहेत,,अशाही महिलेचा सन्मान व्हायला हवाच,,स्त्री ही कोणत्याही भूमिकेत सन्मानानियच आहे,,,

मुळातच मला असे वाटते की प्रत्येकाने आपले कर्तव्य पार पडले तर आपण कितीतरी जणांचे अधिकार जपत असतो,,ह्या बाबीचे चिंतन आजच्या दिवशी महत्वाचे ठरते,Today’s girls are tomor-row s future of world  असे म्हटले तर वावगे होणार नाही,,,म्हणून स्त्री कडे पाहण्याचा दृष्टिकोन बदला असे म्हटल्यापेक्षा स्त्रीत्व कडे

पाहण्याचा दृष्टिकोन बदला अशी वाक्यरचना प्रचलित व्हायला हवी,,,स्त्रियांची प्रगती होणारच,,कार्यक्षमतेत त्या कमी नाहीच,,पण प्रगती करीत असताना ज्या ज्या अनेक संकटांना तिला सामोरे जावे लागते तो खरच तिच्या स्त्रीत्वाचा अपमान असतो,,,कधी हा अपमान घरी,कधी कामाच्या ठिकाणी,कधी नातेवाईकात, मित्रमंडळीत, समाजात,,,

आणि म्हणून मग आपण म्हणतो स्त्री कुठेच सुरक्षित नाही,,मग विविध कायदे होतात,अपराधी लोकांना शासनही होते,,पण त्याने समाजाची मानसिकता कोठे बदलते???ही मानसिकता बद्दलवायची असेल तर समाजाच्या प्रत्येक घटकाला आधी कर्तव्याची जाणीव जागृती घडवून आणावी लागेल,,आईने आपले कर्तव्य केले की बाळाचे अधिकार राखले जातात,,शिक्षकाने आपली कर्तव्य केली तर विद्यार्थ्यांचे अधिकार राखली जातात,,,आशा प्रत्येक बाबतीत आपण म्हणू शकतो,,,चला तर स्त्रीच्या प्रति आपली सर्व कर्तव्ये पाळण्याचा हा निर्धार दिन आपण साजरा करूया,,,,,



# ४१ खरच मराठी भाषा उपेक्षित आहे का??

आज आपण सर्वत्र मराठी भाषा गौरव दिन साजरा करतोय,,,,आज हा दिवस सर्वत्र सन्मानाने साजरा होणार,,,मराठी भाषेची गौरवशाली परंपरेला मानाचा मुजरा करणारा हा दिवस,,,नवीन भाषिक योगदानाचा संकल्प दिवसही आपण म्हणू शकू,,,मराठी भाषेचा गौरव वाढविण्यासाठीचा हा संकल्प दिन,,,,

आज मराठी भाषेबद्दल बरेच विचारप्रवाह आपणास पहावयास मिळतात,,त्यातील महत्वाचा विचारप्रवाह हा आहे की ''मराठी ही ज्ञानभाषा नाही त्यामुळे ती शिकून काहीही फायदा होणार नाही,,''हा विचारप्रवाह इतका पराकोटीला पोहोचतो की मग मराठी भाषा जाणणारे बोलणारे हे कालबाह्य आहेत का असे वाटावे,,,खूप दैवदुर्विलास आहे,,,

माझ्या मराठीची बोलू कौतुके,,,

परी अमृताचेनी पैजा जिंके,,

असे म्हणणारे ज्ञानदेव आज सातशे वर्षानंतरही वैश्विक आहे हे आपण विसरतो का??ज्या भाषेने आमचे ज्ञानविश्वं भावविश्व समृद्ध केले,ती भाषा ज्ञानभाषा नाही असे म्हणत असताना ज्ञानाचा अर्थ आम्ही माहिती ह्या शब्दात सरमिसळ करतोय हे कधी आम्हाला उमजणार??

माझा ज्ञान भाषेवर अजिबात आक्षेप नाही,,ती तर काळाची गरज आहेच पण त्याचा अर्थ आपली मातृभाषा कमकुवत आहे असे होत नाही,,हो पण मातृभाषा कौशल्य विकसित झाले नाही तर मात्र कुठेतरी आपल्या व्यक्तिमत्व विकासावर त्याचा परिणाम होतो हे आता मानस शास्त्रज्ञांनी शिक्षण तज्ज्ञांनी मान्य केले आहे,,,

भावनेच्या परिपोषासाठी हा भाषिक विकास महत्वाचा आहेच,,,समाजात कितीही भेदाभेद असू देत पण महाराष्ट्रात मराठी

भाषेबद्दल भावनिक एकात्मकता आहेच,,हीच अमृताची पैज मराठीने जिंकली आहेच,,ही एकसूत्रता ही भावनिक एकात्मकता,,हे वैचारिक ऐक्य,हा आमच्या वैभवाचा मानबिंदू आहेच,,,

विविधतेत ऐक्य शिकवणारी माय मराठी ही ज्ञानभाषा नाही हे कसे मानायचे??अखिल विश्वाचे ज्ञान चे भांडार ज्या भाषेमध्ये आहे,,भाषिक दृष्टिकोनातून जी परिपूर्ण आहे,,संस्कृती संक्रमण ,सवहन जी भाषा आजपर्यंत अतिशय समर्थ पणे करते आहे ती ज्ञानभाषा नाही???

भाषाशास्त्राच्या दृष्टिकोनातून अत्यंत शास्त्रशुद्ध असणारी मराठी भाषा आज जगाचे भाषा शास्त्रज्ञांचे लक्ष वेधून घेत आहे,,,मला बरेचदा वाटत की आज आपण वैचारिक गुलामगिरी तर स्वीकारत नाही न??माझा इंग्रजी भाषेबद्दल अजिबात आकस नाही,,विश्व भाषा बोलता येणे ही काळाची गरज आहेच,,पण इंग्रजी न येणाऱ्या व्यक्तीला आज आपण टाकाऊ समजतो आहोत,,त्याला हास्यास्पद ठरवितो आहोत ही मात्र चिंतेची बाब आहे,,आणि ह्याच विचारातून मग मराठी माध्यमातून शिक्षण,,मराठी माध्यमाच्या शाळा दुर्लक्षित होत आहेत,,आणि परिणामी माझ्या बालकांचा भावनिक विकास दुर्लक्षित होतो आहे,,,

आज मराठी राज्यभाषा दिवस साजरा करताना माझी मायमराठी वैभवात आहेच पण आता तिचा डंका वैश्विक स्तरावर नेण्याचा आपला प्रयत्न असायला हवा,,,एक रशियन महिलेने जेव्हा संत तुकारामांच्या साहित्यावर भारतात  पदवी प्राप्त केली आम्हाला किती अभिमान वाटला,,खरच एखाद्या दिवशी विश्वातील सर्व भाषाशास्त्री एकत्र येतील आणि सर्वात शास्त्रशुद्ध भाषा व ज्ञानभांडार असणारी भाषा म्हणून माझ्या मायमराठीला घोषित करतील तेव्हा कदाचित आम्हाला आमच्या भाषेचे महत्व पटेल,,,मराठीभाषा गौरव दिन संकल्प दिन,,,,,सर्वांना शुभेच्छा

४२

# उपक्रमशील शिक्षकानो शिक्षण शास्त्रज्ञ बना

NCTE ने b ed चा अभ्यासक्रम change केला,,एक वर्षाच्या ऐवजी २ वर्षाचा केला,,,आता त्याला एकात्मिकही बनवतील,, वेगवेगळे प्रयोग ह्या बाबतीत सुरू आहेच,,,उद्देश हा की आपल्या देशातील शिक्षक हा ज्ञान कौशल्य आणि अभिवृत्ती युक्त असावा,,,कारण जेवढा शिक्षक चांगला घडेल तेवढा देश चांगला घडेल,,,खूप उदात्त आणि चांगले विचार व प्रयोग होत आहेत,,,पण माझा प्रश्न वेगळाच आहे,,,अनेकदा मी अशी विधाने ऐकते की ह्या संपूर्ण अभ्यासक्रमात सर्व पाश्चात्य विचारधारा आहे,,भारतीय विचारधारा का नाही??प्रश्न बरोबर आहे,,माझ्याही मनात येतात ह्या गोष्टी,,पण एक गोष्ट आपण सर्वजण विसरतो की वास्तविक पाहता भारतात शिक्षणप्रेमी प्रयोगशील शिक्षक खूप आहेत,,,भारतीय तत्वज्ञानी खूप मोठे योगदान शिक्षणशास्त्राला दिलेले आहे,,अगदी शंकरचार्यापासून जरी आपण पाहिले तरी आजपर्यंत अगदी आधुनिक काळातील स्वामी चिन्मयनंदपर्यंत,,शिक्षण शास्त्राचे अधिष्ठान आपण निर्माण केले आहे,,,हे अधिष्ठान तात्विक वैचारिक कृतीयुक्त सुद्धा आहे,,,हे अधिष्ठान आपण स्वीकारले,,,




पण माझ्या मनात हा विचार येतो की जसे विज्ञानिक शास्त्रज्ञ आहेत

ते वेगवेगळे प्रयोग करतात,,तंत्रशास्त्र इतर कोणतेही शास्त्र घ्या त्यात भारतीय वैज्ञानिकांची कमतरता नाहीच,,,शिक्षण शास्त्रातही विविध प्रयोग करणाऱ्या उपक्रमशील शिक्षकांची संख्या आज अजिबात कमी नाही,, पण आपल्या देशात हे प्रयोग फक्त त्यांच्यापुरतेच मर्यादित राहिले,,, आणि आम्ही पाश्चात्यांचे प्रयोग शिक्षण शास्त्रात शिकवीत राहिलो,,,

आमचे शिक्षण शास्त्रज्ञ आजही स्वत: च्याच कार्य क्षेत्रात काम करीत आहे,,,वेगवेगळे उत्कृष्ट प्रयोग करीत आहेत,,,शिक्षण शास्त्रामध्ये विविध परिवर्तन करताना केवळ शिक्षक तयार करणे,केवळ शिक्षणतज्ज्ञ निर्माण करणे हे ध्येय न ठेवता आपल्या देशातील आशा शिक्षणशास्त्रज्ञांचा शोध घ्यायला हवा,,त्यांना एकत्रित आणायला हवे,,त्यांचे प्रयोग जाणून घ्यायला हवे,,


आणि सर्वात महत्वाचे त्यांच्या प्रयोगांची शास्त्रीय मांडणी करायला हवी,,,त्यांचे सिद्धांतात रूपांतर करायला हवे,,,खूप ज्ञानी आणि उपक्रमशील शिक्षक आपल्या देशात आहे,,आज आपण पाश्चात्य theory शिकवितो करण त्यांनी ही शास्त्र शुद्धता जगासमोर आणली,,राबविली,,,

आम्हीही हेच करायला हवे,,कारण ह्या सर्व संकल्पनांचा उदय भारतीय तत्वज्ञान व मानसशास्त्रात आहे,,,आता वेळ आली आहे की भारतीय शिक्षणशास्त्रज्ञांचा शोध व शिक्षण शास्त्रज्ञांची निर्मिती,,,,

NCTE ने सुद्धा हा दृष्टिकोन ठेवावा,,केवळ पाश्चत्या ज्ञानाने समृद्ध शिक्षक तयार करणे हेच ध्येय न ठेवता शिक्षक शिक्षणातून शिक्षणशास्त्रज्ञ निर्माण व्हावयास हवेत,,,व जे प्रयोगशील उपक्रमशील शिक्षक आहेत त्यांना योग्य प्रोत्साहन देऊन शास्त्रनिर्मिती कशी होईल ह्यावर भर द्यावयास हवा,,,,

# ४३ हम करे राष्ट्र आराधन

...‘‘हिंदवी स्वराज्य व्हावे हीच श्रींची इच्छा ‘‘‘हिंदवी स्वराज्याचे स्वप्न पाहून साकार करणारे छत्रपती शिवाजी महाराज व हिंदवी स्वराज्य साठी राष्ट्र यज्ञा साकारून राष्ट्र देवो भव हा महामंत्र देणारे प पू गोळवलकर गुरुजी ,,,राष्ट्रनिष्ठ व धर्मनिष्ठ असणारे दोन्हीही महापुरुष,,,आज आपण सर्व त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करतोय,,,




प पू डॉ हेडगेवार ह्यांनी ज्यांची संघ कार्याचे उत्तराधिकारी म्हणून पाहता क्षणीच निवड केली असे उत्तुंग व्यक्तिमत्वाचे उत्कृष्ट चारित्र्याचे ,ज्वलंत राष्ट्रनिष्ठेचे,आणि उत्कृष्ट संघटन कौशल्य असणारे ,लाखोंच्या जीवनात मनात ज्यांनी नितांत आदराचे स्थान मिळविले,आणि समर्थपणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सारथ्य केले असे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघ चालक प पू गोळवलकर गुरुजी ह्यांची आज जयंती,,,

१९ फेब्रुवारी १९०६,,वत्सल मातृभूमीला सुंदर स्वप्न पडले आणि मूळच्या गोळवल चे रहिवासी असणारे पण नोकरी साठी नागपूरला स्थायिक झालेले श्री सदाशिव गोळवलकर ह्यांच्या घरात पुत्ररत्न

जन्माला आले,,आठ भावंड गेलेली,,आणि सर्वात लहान अपत्य,,इंटर पर्यंत चे शिक्षण नागपुरात घेऊन वैद्यकीय शिक्षण घ्यावयास ते लखनौ येथे गेले,,पण प्रवेश मिळू शकला नाही आणि ते बनारस विद्यापीठातून M. Sc. प्राणिशास्त्र ह्या विषयात झाले,,

पुढील संशोधन करण्याकरिता ते मद्रासला गेले पण प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते शक्य झाले नाही,,तीन वर्षे त्यांनी बनारस विद्यापीठात कार्य केले,,ते खूप विद्यार्थी प्रिय प्राध्यापक होते आणि विद्यार्थी अत्यंत आदराने गुरुजी म्हणत,,भय्याजी दाणी ह्यांच्यामुळे त्यांचा स्वयंसेवक संघाशी संपर्क आला व ते संघ कार्याने प्रभावित झाले,,,,

डॉ हेडगेवार मदनमोहन मालवीय ह्याची ह्याच काळात ते भेट घेत,,डॉक्टरांनी त्यांच्याशी झालेल्या पहिल्याच भेटीत त्यांना जाणले,,आणि त्यांना संघकार्यात सामील करून घ्यावे ही इच्छा प्रबळ झाली,,गुरुजी चे बनारस विद्यापीठाचा अध्यापनाचा काळ संपला आणि गुरुजींनी स्वामी अखंडानंदाची दीक्षा घेतली,,

आपला जन्म हा कशासाठी आहे हे जाणणारे, आणि ह्याची अनुभूती येणारे ,व त्यासाठी आपले जीवन समर्पित करणारे फार थोडे असतात आणि गुरुजी त्यातील एक असामान्य व्यक्तिमत्व होते,,राष्ट्र देवो भव ह्या मंत्राने त्यांच्या मनात जागा मिळविली आणि आपले जीवन त्यांनी राष्ट्र हितासाठी समर्पित केले,,स्वामी विवेकानंदांच्या साहित्याचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता,,

१९४० मध्ये त्यांना नागपूरच्या संघ शिक्षा वर्गाचे सर्वाधिकारी ठरविण्यात आले,,ह्याच वर्गाच्या समारोपाच्या भाषण डॉ हेडगेवार ह्यांचे शेवटचे भाषण ठरले आणि संघाची धुरा गुरुजींच्या खांद्यावर सोपविण्यात आली,,,सातात्याचा प्रवास कार्यनिष्ठा,राष्ट्र निष्ठा,येणारी अनेक संकटे ,कारागृहाच्या वास्तव्य,,संघाचे ३३ वर्ष सारथ्य करणारे गुरुजींच्या संघ जीवनात अनेक चढाव उतार

आलेत,,पण न डगमगता त्यांनी आपला राष्ट्र यज्ञा सुरूच ठेवला,,निर्भयता व राष्ट्रप्रेम हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा गाभा होता,,,

आज ही जाजवल्य देशभक्ती असणारे तरुण राष्ट्राला आजही हवे आहेत,,राष्ट्र यज्ञाची ही ज्वाला आजही तेवते आहे,,प्रत्येकाच्या मना मनात प पू गुरुजींचे विचारधन पेरणे ही काळाची गरज आहे,,,

मला बऱ्याचदा वाटत की कुठे चुकतोय आम्ही की आम्ही अजूनही जाजवल्य देशभक्ती सर्व भारतीयांच्या मनात का निर्माण करू शकत नाही,,डॉ हेडगेवार, गुरुजी, स्वातंत्र्यवीर सावरकर, हे आणि अशा कितीतरी महान लोकांचे आदर्श घेऊन आम्ही ही राष्ट्र यज्ञा व राष्ट्र आराधना कशी करावी ह्याचे भान आम्ही आमच्या तरुण पिढीत कसे निर्माण करू शकू??हेच खरे आत्मभान आहे,,,मातृ देवो भव!!पितृदेवो भव!!आचार्य देवो भव!!हे शिकवीत असताना राष्ट्र देवो भव हा भाव दृढ करायला हवा,,,हम करे राष्ट्र आराधन,,तन मन धन जिवनसे,,,,



४४

# Valentine Week

आता १४ फेब्रुवारी अर्थात valentine day येणार,,,सात तरखेपासूनच सर्व तरुणाईची लगबग सुरू आहे,,खूप लिखाण होतंय ह्यावर,,खूप साहित्यिक कवी कल्पनाही,,आणि हो हे सर्व संस्कृती विरोधात आहे असेही होईलच,,पण थोडा विचार करूया,,,,,

बघा आपण globalisation च्या युगात आहोत,,,सर्वप्रथम आपण global व glocal असायला हवे,global perspective चा विचार करता मला valentine week ची आपल्या देशाच्या युवकांच्या दृष्टिकोनातून जेवढी काळजी नाही तेवढी अँटी- valentine week च्या संदर्भात भय वाटते,,,

महाविद्यालयात कार्य करताना महाविद्यालयीन युवक युवती खूप जवळून निरीक्षण करायला मिळतात,,वेगवेगळ्या कुटुंबातून आलेली ही मुले आणि मुली,,विविध मानसिक जडण घडण असणारे आहेत,,त्यांची कौटुंबिक सांस्कृतिक सामाजिक पार्श्वभूमी निरनिराळी आहे,,,त्याचे भाषा,त्याचे संस्कार भिन्न भिन्न आहेत,,त्यांची स्वप्न भिन्न भिन्न आहेत,,पण सर्वात एक गोष्ट खूप महत्त्वाची बघायला मिळते की ह्या सर्वांमध्ये जबरदस्त कार्यशक्ती आहे,,,त्यांना खूप काही वेगळं करून दाखवायचे आहे,,त्यांना आपले क्षेत्र आपल्या कर्तृत्वाने उजळून टाकायचे आहे,,,,किती छान,,

पण हे सर्व करीत असताना ते मात्र ते स्वत: च्या कुटुंबात कोणताही सण असू देत आमच्या मध्ये हा सण कशा पद्धतीने साजरा होतो ह्यावर मात्र हिरीरीने चर्चा असते,,,ते आपले मित्र मुस्लिम असतील तर अगदी सहजतेने मैत्री राखण्यासाठी अगदी रमझान चा उपवासही करतात,,आपल्या ख्रिश्चन मित्रासाठी ते चर्च मध्ये जातात,,,मुस्लिम ख्रिश्चन विद्यार्थी अगदी सहजतेने पसायदान गातो,,,खूप विलोभनीय असते हे सर्व,,,

हे सर्व मी निरीक्षण करीत असताना माझ्या मनात एक विचार येतो की किती सहजतेने आपण आपल्या मित्र मैत्रिणींसाठी ह्या सगळ्या गोष्टी करतो,,जगाच्या स्तरावर बहुसांस्कृतिक तेचि कितीही चर्चा असू देत पण बहुसंस्कृतीकता ही माझ्या देशाची संस्कृती आहे,,,मग व्हॅलेंटाईन डे हा माझ्या देशात जरी जन्माला आला नसला पण तो माझ्या देशात वाढतोय हे सत्य आहे,,

पाश्चात्य अपत्य माझ्या घरात वाढत असताना त्याचा मूळ स्वभाव मी बदलू शकणार नाही,तसेच त्याला घरातून पण काढून देऊ शकत नाही,,कारण आता ते माझ्या घराचा हिस्सा बनला आहे,,,दरवर्षी केवळ व्हॅलेंटाईन डे आला की खूप कवी कल्पना ,खूप सकारात्मकतेच्या गोष्टी एकच दिवस करणे हा ही त्यावर उपाय असू शकत नाही,,,

प्रेम ह्या उदात्त संकल्पनेभोवती रुंजी घालणारा हा दिवस,,,होय,,,प्रेम तर सर्वांवरच करावे आणि आपण त्याच्यावर प्रेम करतोय हेही सांगायलाच हवे,,,आणि प्रेम हा तर विश्व संस्कृतीचा गाभा आहे,,पण आजची प्रेम अभिव्यक्तीची पद्धत पहिली की मन खिन्न होते ते ही खरेच,,काय करता येईल?? ........(क्रमशः)



# ४५ Valentines day and Human Resource Development

होय ,,,जेव्हा मी प्रेमाची अभिव्यक्ती समाजात पाहते तेव्हा मन खूप दुःखी होत,,,आणि हे खूप आपल्या आसपास घडत,,,आणि ह्यातून मग येणारे नैराश्य व त्याचे दूरगामी परिणाम ची भयानकता,,,,अर्थात ह्यालाही अपवाद आहेतच,,,पण हे सर्व आपणास थांबवता येणार नाही,,,पण त्याची दिशा मात्र निश्चित बद्दलविता येईल,,,

व्हॅलेंटाईन विक साजरा करताना '''आमच्या वेळी अस काही नव्हतं'',,असे म्हणून युवकांना हिनावणे किंवा '''हे आपल्या भारतीय संस्कृतीत बसत नाही'''' म्हणून समाज विघातक कृत्य करणेही योग्य नव्हे,,ह्यामुळे क्षोभ वाढतो,,,आणि संस्कृती बाह्य वर्तन करण्याची प्रवृत्ती वाढते ,,,

आणि हो anti valentine week चे काय??? slap day to breakup day आधीच्या आठवड्यात प्रेमाची कबुली तर जे अपयशी ठरले त्यांच्यासाठी दुसरा आठवडा,,,,नाही पटत मनाला,,,प्रेम ही काय चार दोन दिवसांची गोष्ट आहे???ह्यात अखंडता तर असलीच पाहिजे,,,प्रतिकात्मकताही,,आणि त्याचे रूपांतर द्वेषात तर अजिबात व्हायला नको,,मग प्रेम हे कोणत्याही स्वरूपात समोर येवो,,,

मला लहानपणी शिकलेली कविता आठवते ,,,अपणालाही माहीत आहे,, Soloman Grandi born on Monday,,,,,that was the end of Soloman Grandi ,ह्या काव्याचे मला तेव्हाही खूप आश्चर्य वाटायचे,,, इतक्या लवकर खेळ संपू शकतो??? पण valentine week आणि anti valentine week नंतर खरच आमचाही सोलोमन झाल्याशिवाय राहत नाही,,,आणि मग सुरू होते ते Depression ची मालिका,,,आत्महत्यांची मालिका,,,फसवणुकीची

मालिका,,,

खूप वेदनादायी आहे हे सर्व,,,आणि ह्यापासून आपण आपल्या पिढीला मात्र नक्कीच वाचविले पाहिजे,,,माझ्या मुलामुलींची मने ही फक्त फुलण्यासाठीच आहेत,,,कोमेजण्यासाठी नाहीच,,,,काय करायचे???

बघा एखादी नदी प्रदूषणाने खराब झाली तर आपण ती नदी स्वच्छ करू शकत नाही,,,पण Stop the further Pollution he तत्व तर वापरू शकतोच,,,,,खूप छान उपाय सुचतो आहे आणि हा उपाय आपल्या देशात खरच राबविला गेला न तर पुढच्या वर्षीचा valentine week हा खूप उत्साहात तर साजरा होईलच पण त्यातून खूप काही आम्ही आमच्या मुलांना देऊ शकू हा मला आत्मविश्वास वाटतो,,,आता हे उपाय कोणते ह्याचे एक पत्र स्वरूपात आपल्या माननीय प्रधान मंत्रीजींना मला पाठवायची इच्छा होते,,,पाठवून,,,पुढील भागात,,,



# ४६ मा. प्रधानमंत्री महोदयांना एका सामान्य नागरिकांचे पत्र

माननीय प्रधान मंत्रीजी,,

हरिओम प्रणाम,,,

आज एका वेगळ्या विषयावर मला आपणाशी बोलायचे आहे,,अर्थात हा विषय अत्यंत जिव्हाळ्याचा आहे तसेच ह्या प्रश्नाकडे एक वेगळा दृष्टिकोन देणारा कदाचित ठरू शकतो,,,

महोदय,

सर्वत्र Valentine Week साजरा होतोय सर्व युवा पिढी आणि क्वचित वृद्ध सुद्धा आपल्या प्रेमास्पदला Wish करण्यासाठी उत्सुक आहेत,,,,मी एक सर्वसामान्य नागरिक व Teacher Educator ह्या नात्याने ह्या सर्व घटनांकडे बघते तेव्हा मला प्रकर्षाने एक गोष्ट जाणवते ती ही की माझ्या युवा भारताचा Human Resource ही निश्चित पणे माझ्या देशाची संपत्ती आहे,,आणि ह्या संपत्तीचा विकास हा सकारात्मकतेने व्हावा ह्यासाठी आपणही अग्रेसर आहात ही देशासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे,,,

महोदय आपणही सध्याच्या ह्या आठवड्यातील युवकांच्या अभिव्यक्तीसाठी चिंतीत असालच,,, आता ही केवळ युवकांचीच नाही तर आता शाळकरी मुले मुली सुद्धा ह्याच प्रवाहात आलेले आहेत,,आणि ही अत्यंत चिंतेची बाब आहे,,,मला हे भारतीय संस्कृतीवरील आक्रमण आहे असे अजिबात वाटत नाही कारण भारतीय संस्कृती एव्हढी तकलादू नाही,,,कोणत्याही सांस्कृतिक वादळांना पेलावयास ती समर्थ आहे,,,

पण माझ्या युवकांना त्यांच्या सामर्थ्याची जाणीव करून देण्याची व त्यायोगे त्याच्या अभिव्यक्तीला योग्य वळण देण्याची वेळ निश्चित आलेली आहे,,,कारण आपल्याला आता फक्त आणि फक्त विकास

हवा आहे आणि तो केवळ बाह्य गोष्टीनी होणार नाही तर त्यासाठी युवकांची मने तयार करावे लागतील,,

महोदय,,,एक करू शकू का ministry of human resource development च्या माध्यमातून Education department,,Higher Education Department,,Universities, स्तरावर विद्यार्थ्यांसाठी नागरिकांसाठी विविध ओरिएंटशन वर्ग आयोजित करू शकू का?? असे वर्ग आयोजित करण्याबाबत काही विचारविनिमय व्हावा ही बाब होणे ह्यासाठी आवश्यक वाटते की त्याबाबत समज गैरसमज,त्याची अभिव्यक्ती ह्याबाबत आपल्या युवा पिढीचे उद्बोधन होणे गरजेचे वाटते,,,कारण पाश्चत्या संकल्पना आपल्या घरात वाढते आहे तिच्यावर आपले संस्कार होणे गरजेचे आहे,,आणि ह्या संकल्पनेला योग्य भारतीय वळण देणे गरजेचे आहे human product माझ्या देशाचे हे global असलेच पाहिजे पण त्याचा आत्मा भारतीयच असावा,,,

महोदय आज युवा पिढीचे मनस्वास्थ्य हा कळीचा मुद्दा आहेच,,,त्यांच्यावर टीकास्त्र सोडणे हा उपाय होऊ शकणार नाही,,,पुढील Valentine week पूर्वी आपण आशा प्रकारचे उद्बोधन विद्यार्थ्यांना देऊ शकलो तर काही सकारात्मक बदल आपणास दिसू शकतात,,,

महोदय हा प्रयोग ह्यावर्षी कंबोडिया ह्या देशामध्ये राबविण्यात आला आहे ,,,जेव्हा कंबोडियाच्या शासनाने हा विचार मांडला तेव्हा तेथील HRD Ministry,Education departments,,Higher Education Departments,, विविध शाळा NGO,ह्यांनी पुढाकार घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला,,सर्व स्तरातून ह्याचे स्वागत झाले,,,उत्सव तोच पण अभिव्यक्ती निराळी,,आणि हा उपक्रम यशस्वी ही झाला आहे,,,आपण आपल्या देशात हा प्रयोग करू शकू???ह्यासाठी आपणास शिक्षण तज्ञ व मानसोपचार तज्ञ ह्याची टीम ची मदत घेऊ शकू,,,

मला कल्पना आहे की ह्यावर खूप टीका होईल कुणाला हे स्वप्न रंजन वाटेल पण माफ करा हे अजिबात स्वप्नरंजन नाही,,,तर कुणी अशीही टीका करतील की ‘‘हेच शिकवायचे बाकी होते‘‘,,,पण आपण हा उत्सव करण्यापासून कुणाला रोखुही शकत नाही आणि अध: पतनही पाहू शकत नाही,,आणिआता हा सार्वत्रिक विषय झाला आहे आणि हा आता प्रवाहात यायला काय हरकत आहे??,मग तो अभ्यासक्रमातून ,उद्बोधनातून ,किंवा आणखी वेगळ्या रूपात ,,,पण शाळांमधून ,महाविद्यालयातून ,कुटुंबातून समाजातून,औपचारिक अनौपचारिक पणे ह्या बाबत उहापोह होणे गरजेचे आहे,,आपल्या युवकांना पतनापासून वाचवून त्याची कार्यशक्ती विधायक मार्गाकडे वळविणे आवश्यक आहे,,,होईल शक्य???,,,,,एक नागरिक ,,,



४७

# संन्यस्त वृक्ष

एक संन्यस्त वृक्ष,,धरणीवर उभा स्थितप्रज्ञासारखा,,

आपली सर्व हिरवी पाने त्यागून संपूर्ण जीवनाला पारखा तरीही बहरलेला,,,झेलतोय ऊन वारा पाऊस,,

एकाकी तरीही टवटवीत,,

कितीतरी उन्हाळे पाहिले, पावसाळे पहिले असतील,,,,,त्याच्या जगण्याची पद्धतीचा निराळी,,जगावेगळी,,,

इतकं जगावेगळा प्रेम जगावर करता येत??

आपलं सर्वस्वाचे दान देऊनही फुलता येत??

आपल्या संपण्यातूनही हे त्यागाचे वरदान देता येत???

होय ह्याची जातकुळीच निराळी,,प्रेम असच असत नाही का??वेड!! विचारच नाही करत स्वतः च्या संपण्याचा,,

हो पण विचार करतंय ते काय प्रेम म्हणायचं??

तो तर व्यवहार झाला,,देण्यघेण्याचा,,,

कुणी म्हणत प्रेमाचा रंग गुलाबी असतो,,

तर कुणी म्हणत प्रेमाचा रंग लाल,,,

खूप छटा असू देत,,,पण ह्याची छटाच न्यारी,,,

आपली सर्व अस्तित्व झाडूनही हा किती सुंदर दिसतो,,,आकाशात नुकताच उमलले प्रकाश कमळ आणि हा दोघेही मग सारखीच वाटायला लागतात,,,

हो,,प्रेम असेच आहे,,जीवनाचा अंधक्कार मिटविणारे आणि जीवनाला त्यागाची जोड देणारे,,,कसं जमतंय हे सर्व त्याला,,,

डोकावले त्याच्या जीवनात,,एक अत्यंत समृद्ध तरीही शापित,,अगदी अश्वत्थामा जणु,,,,

आपली जखम भाळी घेऊन जगतोय तरीही फुललेला,,,

कस रे जमत तुला एकाकी फुलण,, आणि ह्याच फुलण्यातून सर्वांचे

जीवन रंगीत बनविणे,,,उत्तर मिळाले ,,,,खूप अनपेक्षित,,सोपं आहे,,

त्यासाठी स्वतः चे रंग फुलणे,हसणे सर्व सर्व सोडून द्यावे लागते,,,जसजसे माझे रंग उडतात तसे तुमचे जीवन उजळत,,,त्यासाठी मला संपावे लागते,,,झाडून जावं लागतं,,,पण जसजसा मी संपतो न तसतसा माझा आनंद वाढतो बघ,,,

हो रे खरंय,,,हेच खरे प्रेम,,,प्रेमच्याही त्यागाला न जुमानता अखंड अबाधित निरंतर चिरंतन,,,अखंड क्षितिजाची आठवण देणारे,,,,



## ४८ साथ ! स्वत: ची स्वत: ला!! भाग १

मी एक स्त्री!!आज माझ्यासमोर एक विषय आला आहे,,''साथ स्वत: ची स्वत: ला:''':विषयाचे शीर्षक वाचून थोडं दचकायला होत,,पण हा विषय खरच चिंतनशील आहे,,ह्या विषयाचे विविध पैलू पण आहेत,,

सुरवातीला फक्त शिर्षकाकडे जरी एक दृष्टिक्षेप टाकला तरी एक गोष्ट प्रथमदर्शनी जी लक्षात येते ती ही की सोबत साथ करायची आहे पण ती स्वत: ची,,मग पुढचा प्रश्न उभा राहतो की



मी आजपर्यंत माझी साथ दिली नाही का??मी स्वत: ची साथ दिली नाही तर मी कुणाची साथ दिली??

मग पुढचा प्रश्न उद्भवतो की ज्यांची साथ मी आजपर्यंत दिली ती मी आता सोडायची का??

पण मी आजपर्यंत त्यांना साथ का दिली??बरोबर हे सगळे प्रश्न डोक्यात येणे स्वाभाविक आहे,,

मी जेव्हा इतरांना साथ देत होते तेव्हा माझे नेमके कोणते निकष होते??

हे माझे साथीदार कोण होते??

त्यांची जेव्हा साथ देत होते तेव्हा मी स्वत: ला विसरून गेली होती का??ओहह!!!हे कदाचित बरोबर आहे,,

मी सगळ्या जगाला साथ दिली पण ह्या सर्वात मी स्वतः कुठे होते??

साथ म्हणजे नेमके काय??

आजवर मी ज्यांना ज्यांना साथ दिली त्यातील किती जण माझ्या जीवनाच्या प्रवासात माझ्यासोबत आहेत??

किती जणांना माझी साथ आवडली??माझ्या साथीचा किती जणांना फायदा झाला??

माझी साथ चांगली होती म्हणून किती जणांनी आपला फायदा करून घेतला??किती विचारात टाकणारा प्रश्न??पण ह्यातील एकही प्रश्नाचे उत्तर मला समाधानकारक नाही मिळाले,,ह्याचे उत्तर मला उपनिषदात सापडले '''आत्मनास्तु कामाय सर्वम प्रियं भवति''' होय जोपर्यंत स्वतः ला एखादी गोष्ट फायद्याची होती तोवरच प्रत्येकाला इतर व्यक्ती प्रिय असते त्यानंतर तिची लोकप्रियता कमी होते ,,,अरेरे किती हा स्वार्थीपणा,,पण हेच सत्य आहे,,हे मला उपनिषदांनी सांगितले आणि मी भानावर आले,,आणि लक्षात आले की कितीही आपण कुणासोबत आहोत ह्यापेक्षा मी माझ्यासोबत किती आहे ही गोष्ट महत्वाची आहेच,,आता इथून सुरू होतो आपल्या विचारांचा प्रवास,,,



# ४९ साथ स्वत: ची स्वत:ला –भाग २

मित्रानो साथ स्वत: ची स्वत: ला ह्या विचारमार्गावरील सर्वात महत्वाचा मुद्दा हा ठरतो की आपण साथ त्यालाच देतो ज्याला आपण ओळखतो,,आणि ज्याचा सहवास आपल्याला आवडतो,,आपण अशी स्वत: ची ओळख करून घेतली आहे का??

मी कोण आहे हा मुद्दा महत्वाचा तर ठरतोच पण त्यापेक्षाही महत्वाचा विचार आहे तो व्यक्ती म्हणून मला माझ्या व्यक्तिमत्वाचे आकलन झाले आहे का??मग त्याची आधी ओळख करून घ्यावी लागेल,, ,माझ्या व्यक्तिमत्वाचे दोन घटक आहे,,माझे स्थूल व्यक्तिमत्व जे देहाच्या रूपात मला मिळाले आहे,,आणि माझे सूक्ष्म व्यक्तिमत्व जे मला मन आणि बुद्धीच्या रूपात मिळाले आहे,

,शरीर व्यक्तिमत्वाचा विचार केल्यास माझे शरीर स्त्री शरीर आहे,,निश्चित पणे एक अद्भुत रसायन आहे माझे शरीर,,,कारण ईश्वराने जे मला बहाल केले आहे ती त्याची शक्ती,,,मला ईश्वराने सृजनशक्ती बहाल केली आहे,,जी सृजनशक्ती माया तत्वाने ब्राह्मतत्वाकडून प्राप्त केली आहे,,ती शक्ती स्वरूपिणी आणि मी आमच्यात साम्य आहेच,,नव्हे आम्ही एकरूपच आहोत,,, आमच्या सूक्ष्म शरीराचा विचार केला तर सदविचाराच्या रूपात असणारे आमचे मन आणि आत्मविकासाच्या निश्चयात असणारी माझी बुद्धी ,,एका उज्वल इतिहासाची साठवण करणारे माझे चित्त आणि शक्तीच्या रूपात सर्व कर्तृत्व गाजवून सुद्धा कर्तृत्वाचा लवलेश नसणारा आणि समर्पणाची भावना असणारा माझा शांत झालेला अहंकार,,,

खरच हे माझे रूप आहे??होय माझ्या शास्त्रांनी माझ्या गुरूंनी जे माझ्या स्वत: ची ओळख मला करून दिली ती हीच आहे,,,त्यांनी मला जो आरसा दाखविला त्यात मला माझे हेच रूप दिसले,,,आणि माझे खरच माझ्यावरच प्रेम जडले,,, किती छान,,,ह्याच स्त्रीच्या तीन शक्तीचे पूजन आम्ही केले,,,संपूर्ण जगताला आपल्या उदरातून जन्म देणारी मातृरूपीणी,, संपूर्ण जगताचे धारण करणारी ,जगतात वाईट प्रवृत्तीचा संहार करणारी,शक्ती स्वरूपिणी आणि प्रत्यक्ष ज्ञान प्रदान करणारी ज्ञान स्वरूपिणी ही रूपे आहेत माझी,,,

# ५० साथ स्वत: ची स्वत: ला–भाग ३

साथ स्वत: ची स्वत: ला ह्या सदरात स्व चा आशय जाणणे महत्वाचे आहेच,,आता हा स्व म्हणजे माझे स्थूल शरीर आणि माझे सूक्ष्म शरीर ,,,हा स्व मला समजला पण एक सिद्धांत आहे की व्यक्तीचा स्व हा कधीच स्वत: पुरता मर्यादित न राहता तो व्यापक होत असतो,,आणि व्यक्ती स्वत: ला कायम व्यापक होताना बघू इच्छिते,,

विचार करा कुणीही शारीरिक स्तरावर काल होता तसा आहे का??हे शरीर प्रत्येक क्षणाला बदलत आहे,,ह्या शरीराचा जन्म होतो,तो वाढतो,त्याला आजार होतात,तो वृद्ध होतो आणि एक दिवस तो नाशही पावतो,,,पण ह्या शरीरावर माझे किती प्रेम असते मला वृद्ध व्हायला आवडत नाही,,मला कुरूप दिसायला आवडत नाही,,सर्वांपेक्षा मी सुंदर दिसावे असे मला वाटते,,पण हा आपल्या शरीराचा अत्यंत वरवरचा विचार झाला,,हा विचार मला माझ्या शरीराशी बांधून ठेवेल पण जेव्हा माझ्या बाबतीत काही विपरीत घडेल तेव्हा मला ह्याच शरीराची घृणा पण निर्माण होईल,,

मित्रानो माझ्या शरीराची साथ मला द्यायचीच आहे,,पण आता थोडी आपली दृष्टी बहिरमुखते पासून हटवू या!!विचार करा मला इतके सुंदर शरीर ईश्वराने का दिले??कितीतरी अपंग मुले आपण पाहतो त्यांची जगण्याची धडपड पाहतो पण ईश्वराने मला छान धडधाकट शरीर दिले हे कशासाठी???ही स्वत: च्या शरीराशी स्वत: केलेली सांगत,,,काही नाही फक्त दृष्टिकोन बद्दलवायचा आहे,,

तुझे कारणी देह माझा पडावा,,,तू म्हणजे कोण?? ज्या कार्यासाठी माझा जन्म आहे,,,कोणत्या कामासाठी माझा जन्म आहे शोधा!!! एवढे मात्र नक्की की ह्याच देहात राहून मी पुरुषार्थ करू शकेन,,ह्याचा शोध घ्यावाच लागेल,,नरेंद्र ने घेतला,,बाळकृष्ण मेनन ने घेतले,,डॉक्टरांनी घेतला,,ज्ञानदेव माउलींनी

घेतला,,शंकराचार्यांनी घेतला,,मी का घेऊ नये??त्यांना सर्वांना प्रयोजन मिळाले,,त्यांना आकलन झाले की माझा देह हा जरी माझा असला तरी ह्या देहाला ह्या जगात येण्याचे प्रयोजन आहे

आणि हे प्रयोजन ओळखणे व त्यानुरूप माझ्या जीवनाची दिशा ठरविणे हे माझे कर्तव्य आहे आणि हे ध्येय पूर्ण करण्यासाठी देह नावाचे माझे उपकरण व्यवस्थित ठेवणे ही खऱ्या अर्थाने मी माझ्या देहाला दिलेली साथ आहे,,

मग प्रश्न असा उद्भवतो की स्त्री म्हणून माझ्या काही मर्यादा आहेत का??स्त्री म्हणून माझे जगणे काही वेगळे आहे का??मित्रानो स्त्री म्हणून मला मर्यादा नाहीतच त्या समाजाने घातल्या माझ्यावर,,पुरुषप्रधान संस्कृतीने घातल्या माझ्यावर,,,पण स्त्री म्हणून माझी एक भूमिका मात्र निश्चित महत्वाची आहे आणि ती भूमिका आहे मातेची,,ही मात्र विसरून अजिबात चालणार नाही आणि हे मातृत्व संकुचित नाही तर विश्वाला गवसणी घालणारे आहे,,आणि म्हणूनच स्त्री ही मातृरूपीनीच आहे,,स्त्री शक्ती ही जेव्हा जेव्हा गरज पडली तेव्हा मातृ शक्तीच्याच रूपात पुढे आली आहे,,कारण मतच आहे समर्पण आणि त्यागाचे मूर्तिमंत रूप,,ह्या रूपात स्वतः ला कमी लेखू नका,,, एका संपूर्ण पिढीला सुसंस्कारित करण्याची जबाबदारी निसर्गाने ईश्वराने ही जबाबदारी माझ्यावर दिली आहे,,,,हरिओम



# ५१ साथ स्वतः ची स्वतः ला –भाग ४

मला सर्वप्रथम माझ्या शरीराची साथ द्यायची आहे आणि त्यासाठी माझे प्रयोजन काय हे मला जाणायचे आहे तर हा विचार सर्वात महत्वाचा ठरतो की एक स्त्री म्हणून मी माझे पाहिले प्रयोजन आहे की मी एक श्रेष्ठ माताच असली पाहिजे,,

माझे मातृत्वच राष्ट्र उभारणी करू शकते,,कारण ज्या तत्वावर आपण कार्य करीत आहोत ते तत्वच असे आहे की समर्पण आणि त्याग भावनेशिवाय राष्ट्र उभारणी शक्य नाही आणि ह्याची उत्तरदायित्व माझ्यावर ईश्वराने दिले आहे,,,हाच आपल्या कार्याचा आधार आहे,,इतिहास साक्षी आहे की जेव्हा जेव्हा ह्या राष्ट्रावर संकट आले तेव्हा ही स्त्रीशक्ती मातृशक्तीच्या रूपात उभी झाली आहे,,राष्ट्र उभारणीचा हा कणा आहे,,म्हणूनच मला माझी साथ करण्यासाठी सर्वप्रथम ही स्त्री शक्ती मातृ शक्तीच्या रूपात जागृत करावी लागेल,,

माता हाच भारताचा आदर्श आहे आणि म्हणूनच आम्ही भारतमाता म्हणतो,,भारतीय विचारधरेत स्त्री हे भोगवादाचे प्रतीक नाही,,आई हा शब्द उच्चारला की तेथे भोगवादी भावना उद्भवतच नाही,,स्वामी विवेकानंदांनी एक ठिकाणी नमूद करून ठेवले आहे की स्त्री ही रूपाने लक्ष्मी आणि गुणांनी सरस्वती आहे,आणि अशा १०० माता जरी मी माझ्या हयातीत घडवू शकलो तर भारताचे भवितव्याचा बदलून जाईल,,,

पाश्चात्य राष्ट्राचा विचार केला तर स्त्री ही पत्नीतत्वात सीमित होते पण भारतात ती मातृत्त्वात विस्तारित होते,,माता सीतेचे उदाहरण एक आदर्श पत्नी पेक्षाही एक माता म्हणून मला खूप भावते,,करण जुळ्या बाळांचे संगोपन करून त्यांना उत्तम संस्कार शिक्षण देण्याचे कसब तिच्या ठिकाणी होते,,रावणाच्या राज्यात ती होती पण माणसे जोडण्याची कला तिच्यात होती,,ती स्वतःचे मत प्रगट करू शकत

होती,,द्रौपदीचे उदाहरण थोड्या वेगळ्या भूमिकेतून घ्या,,द्रौपदी वस्त्रहरणापूर्वी तिने राज्यसभेला निरुत्तर केले आहे,,स्त्रिया ब्राह्मवादिनी होत्या,,इतिहासात डोकावल्यास स्त्रिया लढवैय्या पण होत्या,,आदिम काळात जाऊन बघा समाजात उत्पादन विनिमय बाजारपेठ आर्थिक व्यवहार स्त्रियांकडे होती??

काय घडले की आम्ही ही आमची साथ सोडली??आम्ही स्वतःला उपभोगाचा साधन बनविले??? ह्याला करण आम्ही आमची त्यागाच्या संस्कृतीला तिलांजली दिली आणि भोगला प्राधान्य दिले,,,आम्ही जुने नवे हा समन्वय घालूच शकलो नाही आणि म्हणून आमच्या आदर्शवर पुनरचिंतन करणे महत्वाचे आहे,,आदर्शना युगानुकूल बनवून त्यानुसार चालावे लागेल आणि त्यासाठी माझी ओळख आहे की मी एक आधुनिक स्त्री आहे yeeesss i am knowledge master हे अगदी खरे पण i am wisdom master also हेही विसरून चालणार नाही,,

माझी मला साथ देताना ती दुसऱ्याच्या विचारांनी देता येणार नाही म्हणून ती माझ्या भारतीय विचारधारा नुसारच द्यावी लागणार,,,,,मुळातच स्त्रीत्व हा भाव आहे हेच मी आधी ध्यानात घ्यायला हवे आहे,,,,,,हरिओम,,,,,



# ५२ साथ स्वतः ची स्वतः ला – भाग ५

हरिओम साथ स्वतःची स्वतः ला ह्या विषयांतर्गत स्वतःच्या विचारांना स्वतः ची साथ ही बाब सर्वात महत्वाची आहे,,आणि ह्याचे महत्वाचे कारण आपल्या व्यक्तिमत्वाचा सर्वात महत्वाचा पैलू जर कोणता असेल तर तो आहे आपले विचार आणि ह्या विचाराने अभिव्यक्त करणारे आपले मन ,विचारांचे निवास स्थान असणारे हे मन सतत संकल्प करीत असते विकल्प करीत असते,आणि आपल्या विचारणा आपल्यात असणारे जे विकार आहेत ते कायम दूषित बनवीत असतात,,मला माझ्या स्वच्छ विचारणा साथ द्यायची आहे आणि त्यासाठी माझ्या विचारांचे प्रदूषण होणार नाही ह्याबाबत माझा कटाक्ष असणे आवश्यक आहे,,

आता केवळ विचारांवर लक्ष ठेवून चालणार नाही तर त्यावर हुकूमत करणारी माझी बुद्धी खूप महत्त्वाची आहे,,मनाने कितीही संकल्प विकल्प केला तरी त्यावर निश्चय देणारी बुद्धी असल्यामुळे मी कायम माझ्या मनाला बुद्धीच्या अधिपत्याखाली द्यायला हवे,,आणि ही बुद्धी जीवनात योग्य निर्णय देईल,

आता ही झाली स्व च्या स्तरावर स्वतःची साथ,,,पण माणूस कायम स्वतः ला विस्तारित होताना बघतो आणि म्हणून ह्या स्वचा विस्तार आहे कुटुंब,,,

मैत्रिणींनो,,कुटुंबात माझ्या अनेक भूमिका असतात,,त्यापैकी मला माझ्या कोणत्या भूमिकेची साथ द्यायची आहे??किती महत्वाचा प्रश्न आणि गंभीरही,,,करण स्त्री शिकली मोठी झाली,स्वतः चे न्याय हक्क तिला समजतात,,पण माझ्या वाट्याला आलेले कर्तव्य हे इतरांच्या हक्क असतात ही भारतीय विचारधारा आहे,,

भारतीय कुटुंबात स्त्री चे स्थान माता ह्या रूपात अनन्य साधारण आहे,,कितीही शिकलो आधुनिक झालो विज्ञाननिष्ठ झालो तरी

अजूनपर्यंत पुरुषाकडे मातृत्व नाही गेले,,,नियम हा आहे की ज्याने जे सृजन केले त्याचे त्यानेच संगोपानही करावे,,मग माता अपवाद कशी?? भारतीय संस्कृतीने मातृदेवो भाव हाच संदेश दिला आहे,,माता म्हणून कुटुंबाचा ती कणा आहे हे विसरून चालणार नाहीच,,,म्हणून कुटुंबाच्या स्तरावर मला माझ्यातील मातेला साथ द्यावीच लागेल,,मातृशक्तीच्या जागरण करावेच लागेल,,

मावशी केळकरांनी जेव्हा समिती स्थापनेचा मनोदय डॉ हेडगेवार ह्यांच्याकडे बोलून दाखविला तेव्हा त्यांनी सुद्धा हाच मुद्दा मांडला की राष्ट्र विकासात माता म्हणून स्त्रियांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे,,,मैत्रिणींनो,,जग कितीही पुढे जाऊ दया पण निसर्गाने अद्याप सुसंस्काराचे कार्य हे स्त्रियांकडे ठेवले आहे,,,खूप कर्तृत्व गाजवा,, खूप भराऱ्या मारा पण माझी कुटुंबाबद्दलच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या मला विसरून चालणार नाही,ही माझी स्वतंत्र ओळख मला निसर्गानेच दिली आणखी वेगळी ओळख पाहिजे आपल्याला??आई आहोत आपण,,,शक्तीचे स्रोत आहोत आपण,,एक संपूर्ण पिढीचे शिल्पकार आहोत आपण,,हरिओम,,,,



# ५३ साथ स्वत: ची स्वत:ला –भाग –६

व्यक्ती कायम स्वत: ला व्यापक होताना बघू इच्छिते ,,स्व पासून हा विस्तार होतो आणि स्व ते कुटुंब आणि कुटुंब ते समाज,,,आता व्यक्ती स्वत: ला समाजात स्वत: ला विस्तारित पाहू इच्छितो,,आता जेव्हा समाजाचा प्रश्न येतो तेव्हा सामाजिक दृष्टिकोनातून स्वत: ला साथ द्यायची म्हणजे काय??

आज आपण समाजाची परिस्थिती पाहतो तेव्हा आपल्या लक्षात येते की समाज पुरुष आज एकसंध नाही,,समाज हा पुरुष आहे असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा व्यक्ती हे समाजपुरुषाचे अवयव ठरतात,ह्या दृष्टिकोनातून प्रत्येक व्यक्ती ही सक्षम असणे गरजेचे आहे,,अवयवांमध्ये किती सुसंवाद असतो,,मी समाजात राहत असताना माझी जात कोणती धर्म कोणता?संप्रदाय कोणता??हा प्रश्न स्वत: ला विचारून माझ्यातील मानव्या ला मला साथ द्यावी लागेल,,

अशी साथ देताना मग माझ्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर असेल मानवता,,,जात कोणती?मानवता,,पंथ??मानवता??धर्म ??मानवता,,विचार??मानवता,,आणि सामाजिक स्तरावर माझे हेच नाते आहे माझ्याशी,,,आणि मानवता आली की तिथे लिंगभेदही उरत नाही,,मग स्त्री म्हणून नाही तर समाजात मानव म्हणूनच माझी स्वत: ला साथ हवी,,,कारण व्यक्ती समाजपुरुषाचे अवयव आहेत आणि शरीराच्या स्तरावर प्रत्येक अवयवाचे अनन्य साधारण महत्व आहे,,,

कोणताही अवयव श्रेष्ठ नाही आणि कोणताही कनिष्ठ नाही,,,किती छान,,मग मला समाजात कुणी गौण ठरविले??वास्तविक पाहता आदिम काळात मीच समाजाचे सर्व व्यवहार पाहत होती,,अगदी पिढीला जन्म देणे संगोपन करणे विनिमय करणे शेती करणे हे सगळे व्यवहार माझ्याकडे होते,,तेव्हाही समाजाचे पोषण उत्तमच होत

होते,,,

पण काळ बदलला आणि मला समाजात दुय्यम स्थान मिळाले,,पण त्या इतिहासाला मागे सारून मी पुन्हा सावरली आहेच न,,,प्रत्येक क्षेत्रात मी आघाडीवर आहेच,,,आणि हीच खरी माझी स्वतः ची स्वतः ला साथ आहे,,,मला आकाशात उंच भरारी मारायची आहेच पण त्याच सोबत मला जमिनीशी नाते तोडायचे नाहीये,,,मला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करायचे आहे पण मला पुरुषाळले पणा करायचा नाही,,,हो सर्वात महत्वाचे की मला स्त्रीत्व कडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलायचा आहे.



५४

# गा कोकिळा गा,,,,

कोकिळा उडून गेली पण मनात अनेक प्रश्नांची काहूर निर्माण करून,खरंच परिवर्तन म्हणजे काय?त्याची युगानुकूल परिभाषा काय आहे?हे परिवर्तन करण्यासाठी मला कशा पद्धतीने व्हायचे आहे? मी झालेली समाजाला आवडणार रुचनार पाचणार आहे का?पुरुषप्रधान व्यवस्थेला हे परिवर्तन मानवेल ?माझा नेमका कसा असेल ?माझ्या परिवर्तनाच्या ह्या दिंडीत वारकरी येतील परिवर्तनाचा झेंडा घेऊन?माझे परिवर्तनाबाबत चे विचार अगदी स्त्री वर्गाला रूचतील? कुठून सुरवात करायची आहे मला ह्या परिवर्तनाची? कोकिलेने आपल्या स्वराच्या माध्यमातून आकाशाचे आणि पृथ्वीचे जे नाते जोडले तसा स्वर मला जमेल?तसे एक निर्व्याज नाते मला माणुसकीचे जोडता येईल? एका क्षितिजावर आकाश आणि पृथ्वीचे मिलन बघण्याचे सामर्थ्य माझ्या अंगी निर्माण होईल? कोकिलेचा सुंदर स्वर मला मिळेल?माझ्या जीवनातील वसंत ऋतू कायम बहरलेला असेल? माझ्या बाह्य रुपाकडे न बघता माझा सुंदर स्वराला मला प्राधान्य देता येईल? माझ्या जीवनात अखंड वसंत फुललेला राहील?हे आंतरिक परिवर्तन मला जमेल?हा माझ्या एकटीचा मार्ग आहे पण मला खात्री आहे माझ्या एकटीच्याच पुढाकाराने हे परिवर्तन घडणार आहे,,हळू हळू ह्याचे रूपांतर दिंडीत होईल,,स्त्रीत्वा कडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलेल,,,,कोकिलेचा स्वर मला मिळेल,,,सर्व आसमंत माझ्या मधुर स्वरांनी मी भरून टाकेल,,,मग मला कशाचीही भीती नाही,,,हे सर्व समाज मान्य करेल कारण सर्वप्रथम मी माझ्यात परिवर्तन केलेले आहे,,,मी वाचले आहे ,,,, कोकिळा गा गात राहा परिवर्तनाचा संदेश देत राहा,,,तुझी आणि माझी जातकुळी एकाच

५५

# सदाफुली

आज सकाळी माझ्या बागेत गेले,गुलाब मोगरा पारिजात रातराणी ,जास्वंद आणि कितीतरी फुलांची झाडे अगदी माझ्या स्वागताला तयार होती मला खुणावत होती,,त्या सर्वांची मी सखी न,,,त्याचे ते फुलणे मला मोहवून गेले,,,कारण प्रत्येक झाड मी स्वत: लावलेले ,,,,प्रत्येक झाडावर फुलावर माझे प्रेम,,,कारण त्याच्याशी संवाद साधल्याशिवाय जीवाला चैन नाही पडत माझ्या,,,प्रत्येक झाड आणि त्या झाडावरील फुल मला नित्य संदेश देत असतो

गुलाबाचा टवटवीत पणा ,मोगऱ्याचा शुभ्रता,पावित्र्य,निशिगंधाचा

सुवास,पारिजात चे समर्पण ,जास्वन्दी चे विविधरंगी सौन्दर्य,,हे सगळं इतकविलोभनिय आहे कि जीवन जगण्याची एक उभारी ह्यातून मिळते,माझे मनोगत ऐकणार्या मग ह्या सगळ्या मला माझ्या सख्या आणि सखा वाटायला लागतात,,,खरच किती निरपेक्ष प्रेम आहे त्यांचे माझ्यावर,,,प्रेम मध्ये समर्पण कसे करायचे हे शिकविणारे माझे हे जिवलग ,ह्यांची जातकुलीच वेगळी,,समर्पणाचा आनंद,जीवनाची सुख त्यागता,सर्वांना आनंद देण्याची त्याची वृत्ती,कुणाबद्दल द्वेष नाही,,मी विचारलं मोगऱ्याचा कि तुला गुलाबाचा द्वेष नाही वाटत ?त्याचे उत्तर मला खूप भावले,म्हणाला वेडीच आहेस ,अगं त्याची आणि माझी स्पर्धाच नाही मुळात, मग द्वेष कशाला,,आमच्यातील वेगळेपण आम्ही मान्य केलय आणि ह्या वेगळेपणाचा आदरही आम्ही करतो,,मी जासवंदला विचारले तुला सुगंध नाही तुला वाईट नाही वाटत? तो म्हणतो कसा जे माझ्याजवळ नाही त्याचे कसले ग दु:ख,,पण माझ्याजवळ सगळ्यांना मोहवून टाकणारा रंग आहे आणि त्याचा मला आनंद आहे,,जे नाही त्याचे दु:ख करण्यापेक्षा जे आहे


त्याचा उपयोग जगासाठी मी करतो आणि आनंद घेतो,,,,मी प्राजक्ताला विचारले तू इतकी नाजूक सुंदर जगाला अक्षरश:आपल्या सुगंधाने वेड लावतेस पण ह्या क्षण भंगुर जीवनाचे तुला वाईट नाही वाटत,,,? ,,मला म्हणते कशी अग किती जगले ह्याला काय महत्व?पण कशी जगले हे महत्वाचे नाही का,,? माझे आयुष्य कमी आहे पण जेवढे आयुष्य मला ईश्वराने दिले तेवढ्या आयुष्यात माझ्या सुगंधाने संपूर्ण जग भारावून जाते हे काय कमी आहे,,रात्रीच्या अंधारात हि सुवसाची बरसात करायला मला खूप आवडते,,,संपूर्ण आसमंत मी धुंद करते ,,,, निसर्गाशी बोलताना त्याच्याशी मैत्री करताना मग मैत्रीच्या कक्षा रुंदावत जातात,,,कारण ह्या मैत्रीत द्वेष नाही ,स्पर्धा नाही,फक्त आणि फक्त सपर्पण,,,सर्वांना आनंद देण्याची वृत्ती,त्याग,,ह्या सर्वांना मी विचारले कि ह्या सगळ्या गुणांचा फायदा तुम्ही स्वतः साठी का नाही करून घेत ? तुमचे रूप सौन्दर्य सुवास,ह्या सगळ्या बाबीनी तुम्ही ऐश्वर्यसंपन्न आहात ह्याचा उपभोग तुम्ही स्वतः का नाही घेत ? त्यांच्या उत्तराने मला निशब्द केले,,,अगं हे ऐश्वर्य ईश्वरदत्त आहे,,आमच्या ह्या जीवनाचे काही प्रयोजन आहे आणि ते आम्हाला समजले आहे ते आम्ही स्वीकारले आहे आणि अतिशय आनंदाने,,,जे कार्य ईश्वराने आमच्यावर सोपविले ते करण्यातच पुरुषार्थ आहे न ? मग वाईट कशाचे वाटून घ्यायचे ?जेवढे आयुष्य मिळाले तेच आम्ही सत्कारणी लावतो आहोत,,अगदी संतांच्या भाषेत सांगायचे म्हणजे 'तुझे कारणी देह माझा पडावा'हे आम्ही जाणले आहे ,,हीच आमच्या जीवनाची वाट आहे,,,आणि हि वाट सोडण्याचा प्रश्नच उद्भवत नाही',,,,हा सगळा संवाद मला खूप सुखावत होता,माझ्या जीवनाला एक वेगळी उंची देणारा होता,,,जीवनाच्या प्रति एक दृष्टिकोन तयार करणारा होता,,,,,मनात

विचार आला मला हे सगळं जमेल,,? आता ह्या प्रश्नाचे उत्तरही त्याच संवादात होते,,,,,,,,,हो ,,,,,,,निश्चित,,,,,,,मलाही असेच जीवन जगायचे आहे,,,,,,निःस्वार्थ ,,,,हा संवाद सुरू होता आणि माझे लक्ष गेले ते सदाफुली कडे,,,किती फुलली होती,,माझे संवाद खूप शांततेने ऐकत होती,,खूप टवटवीत दिसत होती,,पण हे काय तिला पाण्याचे सिंचन बरेच दिवसात झाले नव्हते,,,का??मी जरा नाराजच झाले आणि विचार केला की जाणून घ्यावे का तिला???आणि सदाफुली जवळ पोहोचले,,,का ग??तू अजूनही कोरडीच???म्हणते कशी कुठे ?? मग तू एवढी प्रसन्न कशी??माझी उत्सुकता खरच खूप शिगेला पोहोचली,,,आणि खूप वेळ आम्ही खूप गप्पा केल्या अगदी खूप दिवसांनी मैत्रीण मिळावी न तशाच,,,पण सदाफुली खूप ग्रेट आहेस तू,,किती ग सहन करतेस,,,कुठेही फुलतेस,,कुणाचेही लक्ष नाही,,सर्वांचे लक्ष मोगरा गुलाब जाई जुई, ह्यांचे कडे,,,खूप सुवसाचे वैभव आहे न त्यांचेकडे,,,बरोबर आहे,,पण तू कधीच त्याचे दुःख मानले नाही,,तुझ्याकडून शिकले मी बघ की जीवनात शिशिर येणार ग्रीष्म येणार अनेक ऋतू येणार पण फुलण्याचा ऋतू वसंत,,,आणि तो आयुष्यभर फुललेला असावा,,,अनेक प्रसंग येतील,,कस लागेल,,पण मनाचा ऋतू बदलू द्यायचा नाही,,ऊन वारा वादळे अनेक येईल,,आयुष्य उध्वस्त झाल्यासारखे वाटेल,,,कुणीतरी तुला मुळापासून उखडण्याचापण प्रयत्न करेल पण फुलणे सोडायचे नाही,,कोमेजणे ही प्रकृती आहे पण त्याही काळात फुलणे हा पुरुषार्थ आहे,,,जीवन हे जग खूप सुंदर आहे,,फुलणे हीच माझी जात धर्म जीवनदृष्टी ध्येय ,,,सर्व फुलण्यातच एकवटले आहे,,,किती छान,,,तू अशीच हसत रहा फुलत रहा,,,, सदाफुली तुझी आणि माझीही जातकुळी एकच,,,,,

ग्रीष्माची दाहकता
शरदाची शीतलता,
स्थितप्रज्ञ शांत हसते आहे,,,
सदाफुली अजूनही फुलतेच आहे,,,,,

घाव सोसून नियतीचे,
वार झेलून प्राक्तनाचे,,,
उद्याचे स्वप्न फुलवतेच आहे,,,
सदाफुली अजूनही फुलतेच आहे,,

क्षणभंगुरुत्वाचा शाप,,
फुलण्याचा उशाप,,,
परी आनंद उरी ठेवते आहे,,,
सदाफुली अजूनही फुलतेच आहे,,,



ना गंध ना सुगंध,,
नच कुणाचे मन धुंद,,
परी धुंदीत जीवन जगतेआहे,,,
सदाफुली अजूनही फुलतेच आहे,,

सुख दुःखाचे लेणे लेऊन,,
अलवार हलकेच तरंगून,,
अर्घ्य धरेला देतेच आहे,,,
सदाफुली अजूनही फुलतेच आहे,,

असो बाहेरील ऋतू कोणता,,
त्याची नच असे पर्वा आता,,,
परी मनातील वसंत जपतेच आहे,,
सदाफुली अजूनही फुलतेच आहे,,,,

जीवनाचे नावच फुलणे,,
तेच एक मर्म जाणणे,,
दुःखाचा लवलेशही नसणे,,,
सुखदुःखातीत आता होणे,,,
हेच सत्य रुजणार आहे,,,
,सदाफुली नित्य फुलणार आहे,,,,
सदाफुली नित्य फुलणार आहे,,,,
(चिन्मय सदाफुली)



# प.पू. गुरुदेव चिन्मयानंद ह्यांच्या परमपवित्र चरणावर लेखन सेवा अर्पण

डॉ. वसुधा विनोद देव